# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
लोकशाहीचा झाला खून
कायद्याचा पडला मुडदा

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
महाराष्ट्राचा अपमान, हेच दिल्लीश्वरांचे ध्येय

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
महाराष्ट्रातील महाभारत : ‘एका’ भाजपला शरण!

**10**
शरद पवार यांची पत्रकार परिषद
बंडखोरांकडून चूक लपविण्यासाठी
हिंदुत्व,राष्ट्रवादी-काँग्रेसचा मुद्दा

**18**
राष्ट्रवादी काँग्रेस २३ वा वर्धापनदिन

**21**
विधानसभा विरोधी पक्षनेतेपदी अजित पवार

**26**
भारताला खंबीर पाठिंबा देणाऱ्यांपैकी
इस्रायल हा एक देश : शरद पवार

**28**
मराठी साम्राज्यात सरदारांच्या
फितुरीच्या अनेक घटना
- हरि नरके

**32**
भाजपची वाटचाल ‘विरोधी पक्ष मुक्त’ भारताकडे
- व्यंकटेश केसरी

**38**
गोपाळ गणेश आगरकर
- गार्गी राऊत

**44**
अग्निपथ योजना : आगीशी खेळ की
सेनेच्या अस्तित्वावरच आघात?
- अगस्त्य दास

**52**
हिंदवी स्वराज्यातील विज्ञान चळवळ
- प्रा. प्रकाश पवार

**64**
राष्ट्रपतिपदाची सोळावी निवडणूक
- अनंत बागाईतकर

**74**
ग्रंथाली निर्मित तीन खंडाचे प्रकाशन

**84**
घंटाकर्ण- कानोकानी (राजकीय किस्से)

**92**
सुप्रिया सुळे पत्रकार परिषद

**96**
ताटीच्या अभंगांचं काऊन्सिलिंग
- सचिन परब

**98**
बखर अभ्यासक हेरवाडकर
प्रा. गणेश राऊत

**102**
शेवटचे पान-
सत्तेत असणं आणि नसणं हा ऊन-पावसाचा खेळ
-हेमन्त टकले











**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**‘हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.’**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**‘हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.’**
च्या वतीने ओम साई मिलन एंटरप्रायझेस रूम नं. १०९, हाऊस नं. ३२३, सिद्धीविनायक महिमा सेक्टर १९/बी, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.


# राष्ट्रवादी

अध्यक्षीय



# लोकशाहीचा झाला खून कायद्याचा पडला मुडदा

सत्तेसाठी आसुसलेल्या भाजपने शिवसेनेचे आमदार फोडून अनियतीने महाराष्ट्राची सत्ता मिळविली आहे. या कृत्याने लोकशाही आणि कायदा नुसता धाब्यावर बसविण्यात आलेला नाही तर चक्क त्याचा मुडदा पाडण्यात आला आहे. महाराष्ट्राची सत्ता मिळविण्यासाठी भाजपचे नेते अडीच वर्षांपासून पाण्याबाहेर राहिलेल्या माशासारखे तडफडत होते. सत्तेवर येण्याचे रोज नुसते नवनवीन वायदे करीत नव्हते तर त्यासाठी अतोनात क्लृप्त्या व प्रयत्नांचा पाऊस पाडत होते. हे प्रयत्न म्हणजे सरकारी केंद्रीय यंत्रणांचा वापर करून ईडीचा धाक दाखविणे, नोटीसा पाठविणे, जुनी प्रकरणे शोधून काढून चौकशीला बोलाविणे, तासन्तास ईडीच्या कार्यालयात बसवून ठेवणे व प्रश्नांचा भडीमार करणे, शेवटी समाधान झाले नाही व नीट उत्तरे दिली नाहीत त्यामुळे अजून चौकशी करणे बाकी आहे अशी फालतू कारणे दाखवून अटक करणे व तुरूंगाचा कालावधी वाढविण्याची मागणी करणे, प्रसंगी प्रॉपर्टी जप्त करणे व ताब्यात घेणे असे अनेक उद्योग केंद्र सरकारमार्फत भाजप नेत्यांनी चालविले आहेत आणि आपण सारेजण रोज उघड्या डोळ्यांनी ते पाहतो आहोत. ईडी प्रमाणेच प्राप्तीकर विभाग, सीबीआय, केंद्रीय जीएसटी विभाग यांचादेखील विरोधकांना नामोहरम करण्यासाठी जोरदारपणे वापर करण्यात येत आहे. अधिकारी वर्गाचा व प्रशासकीय यंत्रणेचा स्वतःच्या स्वार्थासाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर वापर आजपर्यंत कोणीही केला नसेल जेवढा भाजप नेत्यांनी व सरकारने केला आहे. एवढेच नव्हे तर न्यायालये, निवडणूक आयोग, राष्ट्रपती-उपराष्ट्रपती पदावरील सर्वोच्च स्थानी असणाऱ्या व्यक्ती, राज्यपाल व स्वतंत्र असणाऱ्या अनेक संस्थांची स्वायत्तता खलास केली आहे. त्यांच्या कारभारात प्रचंड हस्तक्षेप आहे. नुसता हस्तक्षेप नाही तर निर्णय काय द्यावा, कधी द्यावा, कसा द्यावा व कुणाच्या बाजूने द्यावा यासाठी प्रचंड दबाव आणण्यात येत आहे. त्यामुळे सगळ्या प्रशासकीय यंत्रणा घाबरून व गोंधळून गेल्या आहेत. कायद्याचे राज्य उरलेले नाही. भारताची राज्यघटना केव्हाच लाल फडक्यात गुंडाळून ठेवली आहे. आणि न्यायदेवतेच्या डोळ्यावर आणखीन पट्टीची पुटे चढविण्यात आली आहेत. याचा विपरीत परिणाम गोरगरिब व सर्वसामान्य लोकांच्या जीवनावर होतो आहे. गुंड, धनदांडगे व श्रीमंतांची कामे झटपट होताहेत. ती कशी होतात हे कळण्याइतकी जनता मूर्ख राहिलेली नाही. सगळे नफ्यातले सरकारी उद्योग खाजगी भांडवलदारांना व उद्योगपतींना विकले जाताहेत. एकंदरीत सत्ताधारी भाजपने देशच विकायला काढलेला आहे. रूपयाचे मूल्य दिवसेंदिवस घसरत जाऊन डॉलर व पौंड वधारतो आहे. त्यामुळे परकीय गंगाजळीचा प्रश्न बिकट बनणार आहे. मोदींनी देशाची पुरती वाट लावली आहे.

भाजपचे खायचे दात वेगळे आहेत आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. पण जनतेला आता हळूहळू ते लक्षात येऊ लागले आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली काम करीत असलेल्या भाजपच्या नेत्यांना हे कसे समजत नाही की त्यांच्या या खोट्या व दुटप्पी वागण्याचा, आचरणाचा लोकमनावर फार मोठा विपरीत परिणाम होतो आहे. शब्दांना आचरणाचे स्वच्छ पाठबळ लाभले, तर जगण्याला नवा सक्रिय अर्थ लाभतो. ज्यांनी जगण्याचा अर्थ ज्ञानातून, वागण्यातून दिला, त्यांच्या मनात पितृत्व आणि मातृत्व सुखाने नांदते म्हणून ते विश्वाशी बोलू शकतात. दुःखाला करूणेची खोली देऊ शकतात. वात्सल्याला जीवाचे मैत्र देऊ शकतात. त्यातून त्यांचा लोकसंग्रह अमर्यादित ठरतो.

आज आपले सन्माननीय पंतप्रधान मंत्रीमंडळातल्या मंत्र्यांशी देखील फारसा संवाद करीत नाहीत. मग मनमोकळी चर्चा तर दूरच आहे. 'हम करे सो कायदा' या वृत्तीमुळे एकाधिकारशाही व तिच्या पाठोपाठ येणारी हुकूमशाही वाढत चालली आहे. ती अधिक वाढू देणे हा देशाच्या एकात्मता व अखंडतेला धोका आहे. तो आपण वेळीच ओळखला पाहिजे. एकदा झालेली फाळणी आता आपल्याला दुसऱ्यांदा नको आहे. देशाची एकता व शांतता टिकवायची असेल तर जातीयवादी व धर्मांध शक्तींना रोखून त्यांचा मोठ्या धैर्याने प्रतिकार करावा लागेल. या कामी सर्व समविचारी पक्ष व कार्यकर्त्यांनी एकत्र ये+ऊन मजबुतीने उभे राहण्याची गरज आहे. शेवटी देशाची लोकशाही टिकली व वाचली तरच आपल्या जीवंत राहण्याला काही एक अर्थ प्राप्त होऊ शकणार आहे. अन्यथा आपण नुसते जीवंत पुतळे राहू! लवकरच आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे. ओबीसींना या निवडणुकीत आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी महाविकास आघाडी सातत्याने प्रयत्न करीत आली आहे. या निवडणुकीत भाजप व बंडखोर सेना नेत्यांना त्यांची जागा दाखविण्याची नामी संधी आपल्याला प्राप्त होणार आहे. तेव्हा त्यांचा करेक्ट कार्यक्रम करण्याच्या तयारीला लागा.


**प्रबंध संपादकीय**



# महाराष्ट्राचा अपमान, हेच दिल्लीश्वरांचे ध्येय

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार पाडण्यात केंद्रातील भाजप सरकार व त्यांच्या पक्षाचे नेते यशस्वी झाले आहेत. आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून त्यांचे सरकार पाडण्याचे प्रयत्न चालू होते. पण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधले आमदार काही केल्या त्यांना दाद देत नव्हते. इतकेच नव्हे तर त्यांच्या धमक्या, ईडी कारवायांची भिती, प्राप्तीकर खात्याच्या धाडी यांना भीक घालत नव्हते. पण अखेरीस साम, दाम, दंड, भेद असे सर्व मार्ग योजून हिंदुत्वाच्या नावाखाली ५५ पैकी शिवसेनेचे ४० आमदार फोडून त्यांनी महाराष्ट्राची सत्ता हस्तगत केली आहे. पण भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने बंडखोर फुटीर गटाचे नेते श्री. एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घालून श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री बनण्याच्या मार्गात पाचर ठोकली आहे. अगदी ऐनवेळी वरून ही पाचर आल्यामुळे श्री. फडणवीस क्षणार्धात हतबल झाले, नाराज झाले. त्यांचा चेहरा पडला आणि बाहेर राहून मंत्रीमंडळाला पाठिंबा देणारे व सरकार चालविण्याची जबाबदारी आपल्या शीरावर घेणारे देवेंद्रजी कधी व कशी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यास तयार झाले ते त्यांचे त्यांनाच कळले नाही. महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचे श्रेय देवेंद्र फडणवीस यांना मिळता कामा नये अशा पद्धतीने दिल्लीतल्या त्रिकुटाने पाऊले टाकली आणि हायकमांडच्या तालावरच तुम्हाला नाचावेच लागेल असा स्पष्ट इशारा देऊन जेवढा फडणवीसांचा अपमान व उपमर्द करणे शक्य होते तेवढा दिल्लीश्वरांनी केला. एक प्रकारे हा महाराष्ट्राचाच अपमान झाला. दिल्लीपुढे महाराष्ट्र झुकत नाही असे आजपर्यंत आपण म्हणत आलो. पण फडणवीसांनी दिल्लीच्या नेत्यांपुढे सपशेल लोटांगण घालून नांगी टाकली. पाच वर्ष मुख्यमंत्रीपद भूषविलेला माणूस सत्तेसाठी लाचार होऊन उपमुख्यमंत्री झाला. यामुळे देशात व समाजात काही चांगला संदेश गेला नाही. मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यापासून महाराष्ट्राला सातत्याने सापत्नभावाची व सावत्रपणाची वागणूक मिळत आहे. महाराष्ट्रावर मागील आठ वर्षांपासून सतत अन्याय दिल्लीश्वरांनी चालविला आहे आणि महाराष्ट्रातील भाजपचे नेते हतबल होऊन मुकाट्याने तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झाले आहे आणि होतेही आहे. महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या कंगाल करून भिकेला लावण्याचे मोदी-शहा जोडगोळीचे स्वप्न आहे. त्याला फडणवीस व त्यांचे भाजपतले सहकारी हातभार लावित आहेत आणि त्यात आता आणखीन भर शिवसेनेतल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर शिवसैनिक आमदारांची पडली आहे. त्यामुळे पहिल्या दिवशी लगेचच आरे शेडचा आणि जलयुक्त शिवार योजनेचा मुद्दा उचलण्यात आला. वास्तविक या दोन्ही गोष्टींमुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसानच होणार आहे. पण केवळ स्वतःचा अहंकार व प्रतिष्ठा यांची भलावण करण्यासाठी फडणवीसांनी या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, जलयुक्त शिवार यांचा महाराष्ट्राला फायदा काय? हे अभ्यासाने कोण सांगणार? कशासाठी हा डाव खेळला जात आहे हे सर्वसामान्य जनतेला अजूनही लक्षात येत नाही. विकासाच्या नावाखाली नको त्या गोष्टी पुढे रेटून आवश्यक व हितकारक गोष्टींना (उदा. महागाई, बेरोजगारी, शेतमालाला भाव नसणे वगैरे.) जाणीवपूर्वक मागे रेटण्याचे व त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे जनतेने वेळीच सावध होण्याची गरज आहे. अज्ञानातून मुक्त झाल्याशिवाय खरी समाजाभिमुखता कळणार नाही. यासाठी मानवी मनात क्रांती करण्याचे कार्य करावे लागेल. शब्दांमधल्या वायफळ बडबडीपेक्षा आंतरिक आवाज प्रमाण मानून, ज्ञानाधिष्ठीत नवीन व्यवस्था निर्माण करण्याचा घाट घातला पाहिजे. जगण्याचे मूळ जगणे समजून घेण्यात आहे. जगण्यातल्या पळवाटा नाहीत, हे जाणून योग्य तो मार्ग निवडणे महत्त्वाचे आहे. ज्ञान, कर्म, निष्ठा, भक्ती, सद्सद्विवेक यातून योग्य मार्ग सापडतात. योग्यता ही, देहाच्या गरजा कमी केल्या आणि विरक्ती बाणवली की येते : दुर्दैवाने योग्यता असलेली व संपूर्ण राष्ट्राच्या उन्नतीचा विचार करणारी माणसे व नेतृत्व आज तरी भाजपत दिसत नाही. त्यामुळे मूळ प्रश्न सोडून नको त्या गोष्टींवर व विचारांवर भर दिला जातो आहे. हिंदुत्वाच्या नावाखाली समाजाला भडकावून मूर्ख बनविण्याचा प्रयत्न सातत्याने चालू आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्याने पोटात उसळणारा भुकेचा डोंब शमणार आहे का याचे उत्तर कोणीच देत नाही आणि देणारही नाही. कारण रोजचा भाकरीचा चंद्र पाहावयास मिळावा असे वाटत असेल तर हातांना काम, रोजगार आणि मजुरी मिळाली पाहिजे. दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या नव्याने निर्माण करू असे सत्तेवर येताना मोदींनी दिलेले आश्वासन अजून दहा टक्के सुद्धा पूर्ण झालेले नाही. उलट नोटबंदी, जीएसटी, कोरोना महामारीपासून लाखो कोट्यावधी लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. त्यांचे संसार रस्त्यावर आले आहेत. जनतेमध्ये फार मोठे नैराश्याचे साम्राज्य आहे आणि त्या पार्श्वभूमीवर येत्या ऑक्टोबर महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महाविकास आघाडी आता सत्तेवर नसली तरी भाजपने बंडखोर शिवसेना आमदारांमार्फत जी सत्ता हस्तगत केली आहे त्याबद्दल जनतेच्या मनात प्रचंड रोष, संताप व घृणा आहे. त्याचा फायदा करून घेणे हे आपल्या कार्यकर्त्यांचे काम आहे. ती संधी आहे. तेव्हा मन लावून काम करा.



संपादकीय



# महाराष्ट्रातील महाभारत : 'एका' भाजपला शरण!

संत एकनाथांचे अभंग सर्वांनीच ऐकले असतील. त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या अखेरीला 'एका जनार्दनी शरण' अशी ओळ असते. जनार्दन स्वामींचे शिष्य असल्याने आपल्या गुरुवरील श्रध्देपोटी त्यांच्या अभंगाची अखेरची ओळ त्यांना अर्पण केलेली असे. अर्थात संत एकनाथ आणि एकंदरीतच महाराष्ट्रातील संतपरंपरा ही अलौकिक अशीच होती. त्यांच्याबरोबर वर्तमानातील लोकांची तुलना करणे हा त्यांचा अपमान ठरेल. केवळ त्यांचे नाव लावणारे किती हिणकस आणि हलके लोक आहेत हे दाखविण्यासाठी केवळ त्या शब्दांचा वापर करुन आणि त्या चालीवर शिंदे आडनावाचे 'एका भाजपला शरण' असा उल्लेख केला आहे. तर, महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेशी फितुरी करुन भाजपशी सोयरीक केली किंवा पाट लावला. त्याचा आधार काय ? त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास तो आधार म्हणजे हिंदुत्व! महाराष्ट्राची प्रगती व विकास हा आधार नाही. या हिंदुत्वाची व्याख्या काय हे या विद्वान मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलेले नाही. याचाच अर्थ कोणत्याही ठोस कार्यक्रमाखेरीज केवळ सत्तेसाठी त्यांनी हा पाट लावला आहे. त्यामुळे ते नामधारी मुख्यमंत्री झालेले असले तरी खरी सत्ता व अधिकार हा भाजपच्या हातीच राहणार आहे. महाराष्ट्राचे जे काही वाटोळे होणार आहे ते भाजपने आखलेल्या कार्यक्रमानुसारच होणार आहे हे स्पष्ट आहे. त्यासाठीच आणि भाजपच्या इतर महाराष्ट्रद्वेष्ट्या कार्यक्रमांची अंमलबजावणी आगामी काळात पाहण्यास मिळाल्यास कुणाला आश्चर्य वाटू नये. एकनाथ शिंदे हे नामधारी मुख्यमंत्री आहेत हे देवेंद्र फडणवीस यांच्या उपमुख्यमंत्रीपदामुळे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ झाली. सत्तापालट झाला. हे अपेक्षित होते का ? होय, अपेक्षित होते. दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना महाराष्ट्रातील सरकार डोळ्यात खुपत होते हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. देशाच्या राजकीय राजधानीत म्हणजेच दिल्लीत आपण पीठासीन असताना देशाच्या आर्थिक राजधानीत दुसरे सरकार कसे ? या एका प्रश्नाने ते गेली अडीच वर्षे बेचैन होते. वेळोवेळी त्यांनी संधी शोधल्या पण त्यात ते यशस्वी झाले नव्हते. दुसरीकडे त्यांच्या बेचैनीचे आणखी एक कारण होते. राष्ट्रपतिपदासाठी निवडणूक जवळ येत चालली होती. भाजपकडे २.२ टक्के मतांची कमतरता होती. त्यांना कसेही करुन मतांची ही तूट भरुन काढणे क्रमप्राप्त होते. केवळ मतांची तूट भरुन काढणे महत्वाचे नसते तर सत्तापक्षाचा राष्ट्रपतिपदाचा उमेदवार हा पुरेशा आणि ज्याला 'प्रतिष्ठित' अशा मताधिक्याने विजयी होणे अपेक्षित असते. त्यादृष्टीनेही दिल्लीतल्या सत्ताधाऱ्यांना अस्वस्थता आलेली होती. महाराष्ट्रातील महाभारतानंतरही भाजपकडे अंदाजे आठ ते दहा हजार मतांची तूट असल्याची माहिती मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील सरकार पाडणे दिल्लीतल्या सत्ताधाऱ्यांसाठी सर्वोच्च प्राधान्याची बाब झालेली होती. महाराष्ट्र हे देशातले दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. महाराष्ट्रात ४८ लोकसभा सदस्य आहेत. उत्तर प्रदेश प्रथम क्रमांकावर आहे. त्यांचे लोकसभेत ८० सदस्य आहेत. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत प्रत्येक मताचे मूल्य ठरविण्यात येत असते. ते संबंधित राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असते. त्यामुळे महाराष्ट्रातील आमदार व खासदारांच्या मतांचे मूल्य हे महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या प्रमाणात असते. त्यामुळे ते मूल्य इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असणेही स्पष्ट आहे. राष्ट्रपतिपदाची निवडणूक कोणत्याही सत्ताधारी पक्षाच्या दृष्टीने महत्वाची व प्रतिष्ठेची असते. सत्तापक्षाचा उमेदवार निवडून न येणे याचा अर्थ सत्ताधाऱ्यांकडे बहुमताचा अभाव असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच केंद्रातल्या सत्ताधाऱ्यांना महाराष्ट्रात उलथापालथ घडवून आणण्यासाठी हे एक महत्वाचे कारण होते. अर्थात हे एकमेव कारण नव्हते. इतरही कारणे असतातच. परंतु एखादे कारण निर्णायक ठरते तसेच काहीसे हे झाले.

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी हा एक प्रयोग

होता. तो अडीच वर्षे चालला हीच महत्वाची बाब आहे. हा प्रयोग करणारे नेते हे जाणकार, अनुभवी व मुरब्बी आहेत. केंद्रातील सत्ताधाऱ्यांना हा प्रयोग रुचणार नाही आणि ते तो नष्ट करण्याचा प्रयत्न करतील याची माहिती या नेत्यांना नसेल असे मानणे हे निव्वळ हास्यास्पद ठरेल. त्यांनाही या संभाव्य घातपाताची कल्पना असणारच आणि त्या मानसिक तयारीनेच ते राज्यकारभार करीत होते. १९९९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवली परंतु महाराष्ट्राचे स्थैर्य, प्रगती व विकास लक्षात घेऊन त्यांनी समझोता केला व निवडणुकीनंतर संयुक्त सरकार स्थापन केले. हा प्रयोग यशस्वी झाला व या आघाडीने लागोपाठ तीन सरकारे महाराष्ट्राला दिली. याचे कारण दोन्ही पक्षांची समान विचारसरणी आणि नेत्यांची परिपक्वता हे होय. भाजप व शिवसेना यांची आघाडी हिंदुत्वाच्या आधारे झाली होती. आता हिंदुत्व ही अशी काही अस्पष्ट संकल्पना आहे की कुणीही मनाला येईल तशी त्याची व्याख्या करु शकतो. त्यामुळे हिंदुत्वाचा आपल्या सोयीचा अर्थ लावत ही आघाडी चालू राहिली. त्याचप्रमाणे भाजप हा जोपर्यंत प्रादेशिक पक्षांवर अवलंबुन असलेला पक्ष होता तोपर्यंत त्यांनी या प्रादेशिक पक्षांना झुकते माप दिले. परंतु भाजपला जेव्हा स्वबळाचे बहुमत प्राप्त झाले आणि प्रादेशिक पक्षांवरील त्यांचे परावलंबित्व कमी झाल्यावर त्यांनी 'मोठ्या भावा'ची भूमिका पार पाडायला सुरुवात केली. या पक्षांना जागच्याजागी ठेवण्याचे तंत्र त्यांनी सुरु केले. साहजिकच शिवसेना असो किंवा अकाली दल असो हे जे भाजपचे सुरुवातीपासूनचे मित्रपक्ष होते ते देखील दुखावले गेले आणि तेही दुरावण्यास सुरुवात झाली आणि पंजाबमध्ये शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने अकाली दल दूर गेला. महाराष्ट्रात शिवसेना आणि भाजपमध्ये सत्तावाटपाच्या सूत्रावरुन मतभेद झाले.

शिवसेनेच्या दुर्दैवाने आता भाजपची सूत्रे वाजपेयी-अडवानी यांच्यासारख्या समंजस नेत्यांकडे नाहीत. त्यांच्याऐवजी सत्तालोलुप व अतिमहत्वाकांक्षेने पछाडलेल्या नेत्यांनी घेतलेली आहे. शिवसेनेच्या म्हणण्यानुसार कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातच ठरल्याप्रमाणे राज्यात भाजपने दुय्यम स्थान पत्करायचे आणि राष्ट्रीय राजकारणात भाजपला प्रथम स्थान द्यायचे असे सूत्र मान्य झाले होते. त्याचप्रमाणे उध्दव ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे २०१९च्या निवडणुकीनंतर द्वितीय पोलादी पुरुष, प्रति वल्लभभाई पटेल केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांनी मुख्यमंत्रीपद शिवसेनेला देण्याचे मान्य करुन आयत्योवळी शब्द फिरवला व त्यामुळे शिवसेनेने भाजपची साथ सोडली. यामधील सत्यता केवळ उध्दव ठाकरे व अमित शहांनाच माहिती आहे. परंतु शिवसेनेने भाजपची साथ सोडल्यानंतर महाविकास आघाडीच्या प्रयोगाला चालना मिळाली. शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देऊन राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाने दुय्यम भूमिका घेतली. यामुळे भाजपची चवताळल्यासारखी अवस्था होणे स्वाभाविक होते. यातूनच सूडाचे राजकारण सुरु करण्यात आले. हे राजकारण केवळ महाराष्ट्रातच झाले असे नाही. केंद्रातल्या राज्यकर्त्यांनी हे सूडाचे राजकारण पश्चिम बंगालमध्ये केले. झारखंडमध्ये केले, राजस्थानात त्यांचे राजकारण सुरु आहे. याचे कारण या राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सरकारे सत्तेत आहेत. तेलंगणातील मुख्यमंत्र्यांनी केंद्राच्या विरोधात भूमिका घेतल्यानंतर त्यांच्याविरुध्दही हेच राजकारण सुरु करण्यात आले आहे. मध्य प्रदेशात काँग्रेसचे सरकार होते परंतु तेथेही महाराष्ट्राच्या धर्तीवरच ज्योतिरादित्य शिंदे यांनी फितुरी केली व काँग्रेसचे सरकार पाडण्यास मदत केली. तसाच प्रयोग महाराष्ट्रात करण्यात आला आणि एकनाथ नावाचे शिंदे भाजपच्या गळाला लागले. त्यांनी फितुरी केली आणि मुख्यमंत्री झाले. त्यांनी त्यांच्या फितुरीसाठी 'हिंदुत्वा'चाच आधार घेतला हे येथे समजून घ्यावे लागेल. देशातील सर्वात सधन व समृध्द पक्ष हा भाजप आहे. त्यांच्याकडे साधनसंपत्तीची मुबलकता एवढी आहे की त्याआधारे ते वाटेल ते बदल करु शकतात. त्यामुळेच महाराष्ट्रात त्यांना हा खेळ करणे सोपे गेले.

महाविकास आघाडीचा प्रयोग शिवसेनेत शेवटच्या तळापर्यंत योग्य रीतीने झिरपू शकला नाही. एकनाथ शिंदे यांची महत्वाकांक्षा आणि नाराजी याचा लाभ भाजपला मिळाला त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नाराजी व महत्वाकांक्षेला भरपूर खतपाणी घातले. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीपर्यंत हे सरकार पडले तर ठीक अन्यथा मध्य प्रदेशात जो प्रकार केला त्याची पुनरावृत्ति महाराष्ट्रात करायची हे भाजप नेतृत्वाने पक्के ठरवले होते व त्या वेळापत्रकानुसार त्यांनी आपला कार्यभाग साधला.

या उलथापालथीतील सर्व टप्पे आता जनतेसमोर आहेत. परंतु त्याचा शेवट एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदात कसा झाला त्याचप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्रीपदासाठी अचानक कसे तयार करण्यात आले यावरही तर्ककुतर्क चालू आहेत. त्याचीही उकल काही तर्कांच्या आधारे करता येईल. एकनाथ शिंदे यांनी त्यांचा गट अद्याप वेगळा राखला आहे. यामागेही एक चाल आहे. शिंदे

यांना मुख्यमंत्रीपद देऊन आणि बहुसंख्य आमदार आपल्याच बाजुचे असल्याचे दाखवून खरा शिवसेना पक्ष हा आपलाच आहे हे सिध्द करण्यासाठी शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाचा वापर करायचा हा विचार त्यामागे आहे. त्यांना मुख्यमंत्री ठेवणे हा या योजनेचा भाग आहे. याचे कारण राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या १८ खासदारांचे देखील महत्व आहे. त्यामुळे न्याययंत्रणा, निवडणूक आयोग यांच्या मार्फत एकदा शिंदे यांचा गट हाच खरा शिवसेना पक्ष आहे यावर शिक्कामोर्तब होणे हे सर्वाधिक महत्वाचे आहे. बहुमत चाचणीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि निवडणूक आयोगाच्या अलीकडच्या काळातील कामकाजाचे स्वरुप लक्षात घेता त्यांच्याकडून निःपक्षपातीपणाची अपेक्षा करणे चूक ठरेल. म्हणूनच शिंदे यांच्या गटाला मान्यता, त्यांचाच पक्ष हा खरा शिवसेना पक्ष म्हणून मान्यता या पुढील गोष्टी ठरल्याप्रमाणे घडवून आणण्यात सत्ताधाऱ्यांना यश मिळवणे आता सहज शक्य आहे. या द्वारे शिवसेना आणि ठाकरे कुटुंब हे आतापर्यंत अस्तित्वात असलेले समीकरण नष्ट करणे भाजपला शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे शिवसेना व ठाकरे कुटुंब या समीकरणाला जे वलय प्राप्त आहे तेही नेस्तनाबूत करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे भाजपला शक्य होईल. याखेरीज निःपक्ष नसलेल्या आणि केवळ सत्ताधाऱ्यांना अनुकूल व धार्जिणे निर्णय करणाऱ्या निवडणूक आयोगातर्फे शिंदे गटाला शिवसेनेचे 'धनुष्यबाण' हे निवडणूकचिन्ह दिल्यानंतर ही योजना किंवा कार्यभाग पूर्ण होऊ शकेल. परंतु हे प्रकरण कोर्टात गेल्यास मात्र निवडणूक चिन्ह गोठविले जाण्याची शक्यताही आहे. त्यामुळे शिवसेनेचे अस्तित्व संपविण्यासाठी टाकलेल्या या डावात भाजप कितपत यशस्वी होईल यासाठी भावी घडामोडींवरही लक्ष ठेवावे लागेल.

केवळ ठाणे परिसरापुरते प्रभावक्षेत्र मर्यादित असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटास खरा शिवसेना पक्ष म्हणून मान्यता मिळाली तरी त्यांना ती प्रतिष्ठा व वलय प्राप्त होणार नाही. म्हणजेच ते कायमस्वरुपी भाजपचे मांडलिक पक्ष म्हणून राहणार हा भविष्यकाळ स्पष्ट आहे. यामुळे भाजपचे आणखी एक स्वप्न पूर्ण होणार आहे. महाराष्ट्रात कै.ठाकरे यांनी शिवसेनेला हिंदुत्ववादी केले. भाजप हाही स्वतःला हिंदुत्ववादी पक्ष मानतो. एकाच राज्यात दोन हिंदुत्वाच्या शक्ति अस्तित्वात कशा राहू शकतात हा प्रश्न आहे आणि खरा हिंदुत्ववादी पक्ष आणि शक्ति म्हणजे भाजप ही हिंदुत्व वर्चस्ववादी भूमिका असल्यानेच भाजपला शिवसेनेचे अस्तित्वच महाराष्ट्रात नकोसे झाले आहे. त्यामुळेच या निमित्ताने त्यांनी हा खेळ खेळलेला आहे. एकीकडे ठाकरे कुटुंब व शिवसेना हे समीकरण, त्या समीकरणाभोवती असलेले वलय नष्ट करणे आणि महाराष्ट्रात हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा केवळ भाजप हा एकमेव पक्ष आहे व त्या हिंदुत्वात अन्य कुणी भागीदार नको हा हेतु देखील या सर्व उलथापालथीमागे आहे.

या परिस्थितीत भाजप हायकमांडने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देऊ केले. यामुळे ते शिवसेनेच्या केडरला म्हणजेच संघटनेला स्वतःकडे ओढू शकतील आणि अद्याप शिवसेनेच्या संघटनेवर ठाकरे कुटुंबियांची असलेली पकड ढिली करतील अशी भाजपला अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपदी ठेवल्यास त्यांच्या विरोधात शिवसेनेला 'एवढ्या खटाटोपानंतर एवढेच पदरात ?' असा प्रचार सुरु होऊन त्यामुळे ठाकरे कुटुंबियांची शिवसेनेवरील पकड ढिली करणे अवघड झाले असते. तसेच या सर्व उलथापालथीचा संबंध राष्ट्रपति निवडणुकीशी आहे तो मुद्दाही येथे लागू होतो. मुख्यमंत्रीपदासाठी आसुसलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या महत्वाकांक्षेवर एकप्रकारे हा पाणी ओतण्याचाच प्रकार होता. त्यामुळे फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत ते स्वतः मंत्री देखील होणार नाहीत असे जाहीर केल्यानंतर अमित शहा वगैरेंना ते अपेक्षित नव्हते. त्यांनी पक्षाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांच्या मार्फत फडणवीस यांना चक्क फर्मान काढले की सायंकाळी होणाऱ्या शपथविधीत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्या. फडणवीसांचा नाईलाज झाला. अर्थात फडणवीस यांना त्यात दुःख मानण्याचे कारण नाही. कारण एकनाथ शिंदे यांना भाजपच्या अजेंड्यानुसारच काम करावे लागणार आहे. परंतु फडणवीस यांना मंत्रिमंडळाबाहेर राहून हे शक्य होणार नसल्याने त्यांचा समावेश मंत्रिमंडळात आवश्यक होता. याचा भाजप पक्षांतर्गत राजकारणाशी निगडितही भाग आहे. महाराष्ट्रातील उलथापालथ ही जणू काही फडणवीस यांच्यामुळेच झाल्याचे एक चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. प्रत्यक्षात ही योजना भाजप हायकमांडकडून संचालित केली गेली होती. त्यामुळे भाजप हायकमांड काय आहे हे दाखविण्यासाठीच फडणवीसांना त्यांची जागा दाखविण्यात आली.

राजकीय पातळीवर शिवसेनेला संपविणे, ठाकरे कुटुंबियांचे वलय नष्ट करणे आणि महाराष्ट्रातील हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करणारा एकमेव पक्ष व शक्ति म्हणून स्वतःला प्रोजेक्ट करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे भाजपला या उलथापालथीतून शक्य होईल असे सर्वसाधारणपणे मानले

जात आहे. परंतु भाजपची 'कार्यक्रमपत्रिका' एवढी मर्यादित नाही. महाराष्ट्रात केंद्र सरकारचे आर्थिक हितसंबंधही मोठ्या प्रमाणात गुंतलेले आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणे भाजपने देशाची राजकीय राजधानी असलेल्या दिल्लीवर कब्जा केलेला असला तरी त्यांना मुंबईवरही पूर्ण कब्जा हवा आहे आणि त्यासाठी महाराष्ट्रात त्यांना त्यांचे स्वतःचे सरकार अनिवार्य असेल. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी दिल्लीत सत्तेत आल्यापासून त्यांनी पध्दतशीरपणे मुंबई व महाराष्ट्राचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न सुरु केले. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा प्रकल्प हा त्याचाच भाग आहे. अत्यंत अव्यावहारिक प्रकल्प म्हणून तज्ञांनी त्यास विरोध करुनही तो न जुमानता मोदींनी तो पुढे रेटलेला आहे. शिवसेनेने साथ सोडून महाविकास आघाडीच्या प्रयोगात सामील होण्याने हा प्रकल्प रखडला आणि स्वातंत्र्याच्या ७५ वर्ष पूर्तीच्या वेळी हा प्रकल्प पूर्ण न झाल्याने मोदी यांच्यासारख्या नेत्याला ते सहन होणे शक्य नव्हते. याच्याच जोडीला कोकणात सौदी अरेबियाच्या गुंतवणुकीतून अवाढव्य असा आरामको रिफायनरी प्रकल्प उभारण्यातही अडचणीही दूर होणार आहेत. सध्या सर्व आखाती देशात नुपुर शर्मांमुळे जी विरोधी प्रतिक्रिया निर्माण झाली आहे ती शमविण्यासाठीही महाराष्ट्रात स्वतःच्या सरकारची आवश्यकता भाजपला होती. सर्वात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रापासून विदर्भ वेगळा करण्याचे ध्येयही त्यांना पूर्ण करायचे आहे. महाराष्ट्र व मुंबईचे महत्व कमी करण्यासाठी दिल्लीचे सत्ताधारी आसुसलेले आहेत. महाराष्ट्राचे तुकडे झाल्यानंतर राजकीयदृष्ट्या ते कमी होईल अशी त्यांची अटकळ आहे. भाजपचे काही वाचाळ नेते मुंबई केंद्रशासित करण्याची आवश्यकता कशी आहे याची सादरीकरणे केंद्रीय गृहमंत्रालयास सादर करीत आहेत. त्यामुळे १९६० मध्ये मुंबई व महाराष्ट्र गुजरातपासून वेगळा झाल्याची अढी मनात कायम राहिली. आता केंद्रात सत्तेत आल्यानंतर त्याची परतफेड करण्यासाठी हे केंद्रीय नेते आता सरसावले आहेत.

इतिहास आणि ऐतिहासिक घडामोडींच्या आधारावर राज्यकारभार करणारे अशी किल्मिषे मनात राखून असतात. त्यांना हाती अधिकार व सत्ता मिळाल्यानंतर ते हे जुने हिशोब पूर्ण करण्याचे सूडाचे राजकारण करू लागतात. तेच राजकारण सध्या महाराष्ट्राबाबत चालू आहे. महाराष्ट्रात सत्तापालटामागे भाजपचे असलेले कारस्थान वरीलप्रमाणे आहे. सारांशाने सांगायचे झाल्यास त्यांनी एक दगडात अनेक पक्षी मारले आहेत. एका बाजुला शिवसेना फोडण्याचे काम त्यांनी केले. याद्वारे त्यांना ठाकरे कुटुंबिय व शिवसेना हे समीकरण नष्ट करायचे आहे. याचाच अर्थ शिवसेना हा मराठी जनतेचा असलेला आवाज कायमचा बंद करण्याचा हा डाव आहे. केवळ 'ठाणे अंमलदार' असलेल्या एकनाथ शिंदे यांनी ज्या पध्दतीने भाजपपुढे शरणागति पत्करली आहे ती पाहता ते आणि त्यांचा गट भाजपपुढे फारसा टिकाव धरु शकणार नाही हे सत्य आहे आणि त्यांना महाराष्ट्रात भाजपचाच कार्यक्रम राबवावा लागणार आहे. दुसरीकडे दिल्लीत बसलेल्या महाराष्ट्रद्वेष्ट्या राज्यकर्त्यांना महाराष्ट्र व मुंबईचे महत्व आणखी कमी करण्याचा त्यांचा पूर्वीपासून सुरु असलेला कार्यक्रम पूर्णत्वाला नेण्याची संधी या निमित्ताने मिळणार आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना अनेक प्रकल्प मुंबईहून गुजरातला हलविले गेले आणि तेव्हा त्यांनी महाराष्ट्राचे हे हनन मुर्दाडपणे सहन केले. आता तीच प्रक्रिया पुढे चालू राहील. नाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पण काम भाजपचे असेल. त्यामुळेच शिवसेनेतील हे फितूर आणि भाजप यांनी स्थापन केलेले हे सरकार महाराष्ट्राच्या कितपत हिताचे आहे, मराठी माणसाला ते किती अनुकूल आहे हे आगामी काळात दिसून येईलच!

शिवसेनेसाठी अजुनही वेळ गेलेली नाही. मराठी माणसाचा आवाज व अस्मिता यांचे प्रतिनिधित्व त्यांनी जोरदारपणे करणे चालू ठेवल्यास त्यांचे अस्तित्व कायम राहील. कारण शिवसेना फितुरांनी महाराष्ट्रद्वेष्ट्यांशी हातमिळवणी केलेली आहे हे शिवसेनेला सतत ध्यानात ठेवावे लागेल. तरच ते या संकटाचा मुकाबला करु शकतील!

आता राहता राहिला प्रश्न काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा. त्यांना प्रखरपणे व सर्व ताकद पणाला लावून विरोधकाची भूमिका बजवावी लागेल. येणारा काळ प्रचंड संघर्षाचा व अडीअडचणींचा असेल. पण त्यावर मात करण्यासाठी सर्व विरोधकांना एकजिवाने राहून एकजुटीने लढावे लागेल. सत्ताधारी व भाजप हे राज्यघटना, कायदे, न्यायसंस्था, निवडणूक आयोग यांसारख्या संस्था व गोष्टी मोडीत काढून यांचे नामोनिशाण पुसण्याचा सातत्याने प्रयत्न करताहेत. त्यामुळे देशात कायद्याचे राज्य कुठेही अस्तित्वात नाही. न्यायसंस्थाही सरकारची बटीक झालेली आहे. त्यामुळे तिच्याकडून न्याय मिळेल अशी अपेक्षा जनतेमध्ये राहिलेली नाही. म्हणूनच सामान्यांच्या हिताकरिता लढण्यासाठी आपल्या पक्षाच्या नेते व कार्यकर्त्यांनी सिद्ध झाले पाहिजे.

आसाम राज्यामध्ये या राज्यातले काही ३८-३९ विधानसभेचे सदस्य जे गेले आहेत, आणि त्याच्यामध्ये जी मागणी असावी, ती मागणी एकतर राज्याच्या नेतृत्व बदलाची आणि त्यानंतर कुणाला तरी त्याठिकाणी त्या पदावर काम करण्याची संधी मिळावी. पण आसाममध्ये जे सहकारी गेले आहेत, त्याचं ज्यांनी नेतृत्व केलं, मला वाटत नाही, की त्यांना अपेक्षा उपमुख्यमंत्रिपदापेक्षा अधिक होती. पण, भारतीय जनता

# बंडखोरांकडून चूक लपविण्यासाठी हिंदुत्व,राष्ट्रवादी-काँग्रेसचा मुद्दा

**शिवसेनेच्या बंडखोर आमदारांमुळे राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा. खासदार शरद पवार यांनी पुण्यात ३० जून रोजी पत्रकार परिषद घेऊन विविध राजकीय घडामोडींविषयी आपले विचार मांडले. त्याचा हा वृत्तांत....**







पार्टीमध्ये आदेश एकदा आला, मग तो दिल्लीचा आदेश असेल किंवा नागपूरचा आदेश असेल, त्याच्यामध्ये तडजोड नसते. आणि त्याच्यामुळं हा आदेश आला, आणि त्याचा परिणाम राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी शिंदेंच्यावर पडली. ज्याची कल्पना कुणालाही नव्हती. कदाचित शिंदेंना सुद्धा नसावी.

दुसरं आश्चर्य हे, तसं आश्चर्य नाही, पण पुन्हा या कार्यपद्धतीमध्ये आदेश हा एकदा दिल्याच्यानंतर तो आदेश तंतोतंत पाळावा लागतो. त्याचं उत्तम उदाहरण जे मुख्यमंत्री होते, पाच वर्षे त्यांनी काम केलं, नंतर विरोधी पक्षाचं नेतृत्व ज्यांनी केलं, त्यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ ही घ्यावी लागली. हा तर आश्चर्याचा धक्का होता. पण, एकदा आदेश झाला आणि सत्तेची कोणतीही संधी मिळाली तर ती स्वीकारायची असते, याचं उदाहरण देवेंद्र फडणवीस यांनी आज घालून दिलं आहे. या दोन्ही गोष्टी आम्हा कुणालाच काय तुम्हालाही माहीत नव्हत्या. पण जर असं घडलं तर ते अंमलात येतं आणि ते अंमलात येण्याच्यासाठी कुणी नकार अथवा प्रतिक्रिया देईल असं कधी वाटलं नव्हतं. आणि ते खरं ठरलं.

तिसरी गोष्टी अशी, की एकदा मुख्यमंत्रिपदावर गेल्याच्यानंतर त्याच यंत्रणेतील अन्य पदे स्वीकारण्याच्या संबंधीची उदाहरणं महाराष्ट्रात यापूर्वी होती. माझ्या मंत्रिमंडळामध्ये शंकरराव चव्हाण अर्थमंत्री होते, शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळात मी मंत्री होतो. पण मी जेव्हा मुख्यमंत्री झालो, तेव्हा शंकररावजी माझ्या मंत्रिमंडळात जॉईन झाले. शंकररावजींच्यानंतर शिवाजीराव निलंगेकर मुख्यमंत्री होते. नंतर मंत्री म्हणून त्याच्यामध्ये ते जॉईन झाले. त्याच्यानंतर अशोकराव चव्हाण, सध्याचे जे मंत्री होते आमचे सहकारी, तेही आपल्याला ठाऊक आहे की मुख्यमंत्री होते. मंत्रिपदाची जबाबदारी त्यांनी इथं स्वीकारली. आणि त्यामुळं अशी उदाहरणं महाराष्ट्रात घडलेली आहेत. त्यामुळं देवेंद्र यांची याठिकाणची स्वीकृती ही मला आश्चर्यकारक वाटली नाही.

एक स्थानिक बाब आहे, ती म्हणजे आत्ता जे मुख्यमंत्री झाले ते ठाण्याचे लोकप्रतिनिधी आहेत. अनेक वर्षे ठाण्यात त्यांचे काम आहे. पण ते मूळ सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील आहेत. योगायोग असा आहे की, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतरचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेब हे साताराचे होते. त्याच्यानंतरच्या काळात मी मुख्यमंत्री झालो, माझेही मूळगाव सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात आहे. तिथूनच आम्ही बारामतीला गेलो. त्यानंतर बॅ. बाबासाहेब भोसले हे सातारा जिल्ह्यातलेच. त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण हे देखील सातारा जिल्ह्यातीलच होते. आणि आत्ता ज्यांनी शपथ घेतली, तेही सातारा जिल्ह्यातीलच आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्याला सुद्धा लॉटरी लागली असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार



नाही.

आज एकनाथ शिंदेंच्यावर जी जबाबदारी पडली, त्यांच्याबरोबर माझं फोनवर बोलणं झालं. मी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि अपेक्षा अशी आहे की, एकदा राज्याचा प्रमुख झाल्याच्यानंतर तो राज्याचा होतो. तो कुठल्या पक्षाचा प्रतिनिधी असेल पण शपथ घेतल्याच्यानंतर तो राज्याचा प्रतिनिधी असतो. राज्याचा प्रमुख होतो. राज्याच्या सर्व घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्याकडून कामगिरी व्हावी, अशी साधारण अपेक्षा माझ्यासारख्याची आहे. मी त्यांना हे बोलून दाखविले, आणि त्यासाठी अंतःकरणापासून त्यांना मी शुभेच्छा दिल्या.

**प्रश्न : राज्यामधलं महाविकास आघाडी सरकार कोसळलं, यामध्ये कुठे चूक झाली, कुठं कमी पडलो असं काही आहे का?**

**शरद पवार :** कमी वगैरे काय पडलेलो नाही. एकनाथ शिंदे हे शिवसेनेतील लोकांना बाहेर न्यायला प्रभावी ठरले. ३८ आमदार बाहेर जातात, ही काय साधी गोष्ट नाही. ती नेण्यासंबंधीची कुवत ही शिंदे यांनी दाखवली याच्यातच त्यांचे यश आहे.

**प्रश्न : मग हे अचानक घडलं का की याच्यामध्ये आधीपासून नियोजित होतं.**

**शरद पवार :** त्याची मला फारशी माहिती नाही. कारण महाराष्ट्राच्या विधिमंडळात पहिल्यासारखा माझा संबंध राहिलेला नाही. पण ऐकायला मिळतं, की त्याची तयारी आधीच होती आणि ती आधीच असल्याशिवाय एकदम इथून सूरतला जाणे, तिथून गुवाहटीला व्यवस्था होणे, त्यानंतर पुन्हा गोव्याला येणे, या सर्व गोष्टी काही एका दिवसात अशा काय घडत नाहीत.

**प्रश्न : या सर्व घडामोडींनंतर शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वावर शंका उपस्थित केली जातेय. एवढे आमदार नाराज असल्याचे त्यांच्या लक्षात आलं नाही.**

**शरद पवार :** माझ्या मते, उद्धव ठाकरे यांच्या कामाच्या पद्धतीनुसार एखाद्यावर विश्वास टाकल्याच्यानंतर त्याच्यावर पूर्ण जबाबदारी ते देत असत. आम्ही लांबून पाहात होतो, की उद्धव ठाकरेंनी संघटनेची आणि विधिमंडळाची सगळी जबाबदारी ही पूर्णपणानं एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केली होती. त्याचा कदाचित हा परिणाम आहे की काय, याबद्दल मला माहिती नाही.

**प्रश्न : शिवसेनेतील बंड मोडून काढण्याचा प्रयत्न झाला का?**

**शरद पवार :** चर्चा झाली. पण ज्यावेळी ३९ लोक राज्याच्या बाहेर जातात आणि त्यांची मतं काही वेगळी असतात तेव्हा त्याच्यात दुरुस्ती करण्यास काही स्कोप राहत नाही.

**प्रश्न : आधी झालेल्या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाबाबत घोषणा करण्यात आली आणि ते एकटेच शपथ घेणार असे ठरले असताना अचानक देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घ्यावी लागली. यामध्ये वरून दबाव आला असावा का.**

**शरद पवार :** मला साधारणत: जे माहिती आहे, त्या माहितीनुसार देवेंद्र फडणवीस यांनी क्रमांक दोनची जागा आनंदाने स्वीकारली असेल असे दिसत नाही. त्यांचा चेहराही हे सांगत होता. ते नाखूष आहेत. पण ते नागपूरचे आहेत आणि नागपूरमध्ये त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे. तिथे एकदा आदेश आल्यानंतर तो पाळायचा असतो. कदाचित त्यांच्यावर असे संस्कार असावेत, त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी हे पद स्वीकारले. दुसरं काय कारण असू शकत नाही.

**प्रश्न : ४५ वर्षापूर्वी महाराष्ट्रात असंच कायतरी घडलं होतं. त्याच्याशी याची तुलना केली जातेय. तुम्हाला काय वाटतंय.**

**शरद पवार :** त्यावेळी इतकी अशी गरज नव्हती. एक दिवशी आम्ही लोकांनी ठरवलं आणि वसंतदादांना सांगितलं, की आम्ही मंत्रिमंडळातून बाहेर जातोय आणि त्यांच्या हातात राजीनामा दिला. दुसरं काय घडलं नाही. ते झाल्यानंतर त्यांनीही राजीनामा दिला.

**प्रश्न : हे सगळं घडत असताना भाजप आणि शिवसेनेच्या आमदारांनी सतत असं सांगितलंय, की राष्ट्रवादीमुळं हे सगळं झालंय.**

**शरद पवार :** त्यात काय अर्थ नाही. ते सगळं खोटं आहे. याच्यात राष्ट्रवादीचा, काँग्रेसचा काही संबंध नाही. पण लोकांना काहीतरी सांगायला हवं म्हणून राष्ट्रवादी व काँग्रेसचे नाव घेतले जात आहे. याला अन्य कारणे असण्याची शक्यता आहे. त्याच्या खोलात जावं लागेल आणि त्याच्या खोलात गेलं तर नाही त्या गोष्टी पुढे येतील. त्यामुळे कुणी खोलात जाऊ इच्छित नाही.




**प्रश्न : शिवसेनेला अजूनही आशा आहेत असं दिसतंय. कारण अजूनही सोळा आमदारांच्या निलंबनाचा निर्णय आलेला नाही. त्याच्यापूर्वीच घाईघाईनं शपथविधी कसा झाला.**

**शरद पवार :** असं आहे, की त्यांच्याकडं आज बहुमत असल्याचे दिसते त्यामुळे इतर विचार करण्यात काही अर्थ नाही. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जेव्हा कळले की त्यांच्याकडे बहुमत नाही, त्यावेळी त्यांनी ग्रेसफुली आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि सत्तेला चिकटून राहण्याची भूमिका त्यांनी घेतली नाही, ही माझ्या दृष्टीनं चांगली गोष्ट आहे.

**प्रश्न : सुप्रिम कोर्टाच्या भूमिकेकडे तुम्ही कसं पाहतांय.**

**शरद पवार :** तुम्ही म्हणताय तसं सोशल मीडियावर या गोष्टी आलेल्या आहेत आणि याची नोंद जे जाणकार आहेत ते घेतीलच. प्रत्येक गोष्टीची सत्यता तपासून घेण्याचा लोक प्रयत्न करत असतात.

**प्रश्न : शिवसेनेमध्ये सध्या जो अंतर्गत कलह आहे त्याला संजय राऊतांना जबाबदार धरलं जातंय. बंडखोर आमदारांचा पण रोष संजय राऊतांवरच असल्याचं बोललं जातंय. संजय राऊतांनी शिवसेनेला बारामतीच्या दावणीला बांधली. त्यामुळे ५६ वर्षांची शिवसेना संपुष्टात आली. याबद्दल तुम्हाला काय वाटतंय.**

**शरद पवार :** माझ्या मते शिवसेना संपुष्टात आलेली नाही आणि येणारही नाही. यापूर्वी भुजबळ यांनी बंड केले



होते, ते आमच्या पक्षात आले. तेव्हाही काही झाले नाही. एवढंच नाही, तर त्या निवडणुकीमध्ये भुजबळांच्याबरोबर जे लोक आमच्याकडे आले, त्यातला एक सोडून सगळे पराभूत झाले. भुजबळ स्वतः पराभूत झाले. त्याच्यानंतरच्या काळात नारायण राणे यांनी बंड केले. त्यांचाही निवडणुकीत पराभव झाला. याचा अर्थ साधारणत: हे शिवसेनेमध्ये आजच झालेलं नाही. याच्या आधीही झालंय. ज्यांनी बंड केलं, त्याच्याबद्दल शिवसैनिकांनी वेगळी भूमिका घेतली. त्यामुळं संघटना अशी संपत नसते. मी माझं उदाहरण सांगतो. १९८० साली माझ्या नेतृत्वाखाली ६७ आमदार निवडून आले. सहा महिन्यांनी मी भारताबाहेर सुट्टीसाठी गेलो होतो. दहा दिवसांनी परत आल्यानंतर ६७ मधील फक्त ६ सहा लोक शिल्लक राहिले होते. मी अचानक पाचच लोकांचा नेता झालो. पण त्यानंतर झालेल्या निवडणुकीत मला सोडून गेलेल्या सर्वांचा पराभव झाला.

**प्रश्न : नव्या सरकारसमोर आव्हान काय असेल असं तुम्हाला वाटतंय.**

**शरद पवार :** राज्यासमोर अनेक प्रश्न आहेत. सगळ्यात पहिलं आव्हान म्हणजे विश्वासार्हता. ही विश्वासार्हता प्राप्त करण्यासंबंधीची जबाबदारी आहे आणि राज्यात प्रश्न खूप आहेत. त्याच्यामुळं साहजिकच त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. कुणीही मुख्यमंत्री झाला, तरी तो राज्याचा मुख्यमंत्री असतो. त्यावेळी राज्याच्या व्यापक हिताच्या प्रश्नावर त्यांना लक्ष केंद्रीत करावंच लागतं. असे काही प्रश्न आहेत.

**प्रश्न : ईडीचा मुद्दा पुन्हा येतोय.**

**शरद पवार :** असं आहे, की ईडी आणि केंद्रीय यंत्रणांची मदत हल्ली मोठ्या प्रमाणात घेतली जाते आणि त्याचे दुष्परिणाम होतात हे आम्हाला दिसतंय. अनेक विधानसभेचे सदस्य चौकशीच्या नोटीसा आल्याचे सांगतात. ही नवीन पद्धत सुरू झालेली आहे.

**प्रश्न : मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत औरंगाबाद आणि उस्मानाबादचे नामांतर झाले आणि त्याला काँग्रेस आणि राष्ट्रवादीने कुठलाही आक्षेप घेतला नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले. तर हे काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या संमतीनं झालं का.**

**शरद पवार :** असं आहे, की मंत्रिमंडळामध्ये जो प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी मांडल्याच्यानंतर त्यासंबंधी वेगवेगळी मतं होती. पण हे राज्य एका क्रायसेसमधनं जातंय. अशावेळेला आघाडीच्या सरकारमध्ये अंतर्गत मतभेद आहेत असं चित्र बाहेर जाऊ नये, सामंजस्यानं निर्णय घ्यावा अशी एक चर्चा त्यांच्यात झाली आणि त्यामुळं हा निर्णय एकमतानं झाला.

**प्रश्न : आगामी काळात महाविकास आघाडीतूनच निवडणुका लढवल्या जातील का.**

**शरद पवार :** अजून काय तो निर्णय झालेला नाही. आम्ही अजून चर्चा केलेली नाही. तुम्ही मघाशी ईडीच्या संबंधी जो प्रश्न विचारला, तर ईडी आणि अनेक एजन्सीमार्फत विधानसभेच्या सदस्यांच्या चौकशा चालू आहेत. खरं सांगायचं म्हणजे पाच वर्षाच्यापूर्वी ईडी हे नाव देखील आम्हाला माहीत नव्हतं. आता ईडी हे नाव



खेड्यापाड्यात सुद्धा सांगतात. लोकांच्यात कटकटी झाल्या तर त्यातला एकजण म्हणतो, की तुझ्या मागे ईडी लावेन असं म्हणतात. ही परिस्थिती आहे. त्याचं कारण या एजन्सीचा उपयोग हा राजकीयदृष्ट्या वेगळ्या विचारांच्या लोकांसाठी केला जातो. हा अनेकांच्या बाबतीत केला जातो. माझ्याकडे इनकम टॅक्सच्या वतीने असेच एक प्रेमपत्र आलंय. हे प्रेमपत्र असं सांगतं, की २००४ साली लोकसभा निवडणूक लढवत असताना प्रतिज्ञापत्रात जी माहिती भरली होती त्याची चौकशी आता करत आहेत. २००९ साली देखील मी लोकसभेला उभा होतो, २००९ नंतर २०१४ च्या निवडणुकीला उभा राहिलो, तसेच २०२० च्या राज्यसभा निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्राबद्दलची नोटीसही आता आलेली आहे. सुदैवाने त्याची सगळी माहिती माझ्याकडे व्यवस्थित ठेवलेली आहे. त्यामुळे माहिती देण्याची मला चिंता नाही. या विभागाच्या कार्यक्षमतेमध्ये गुणात्मक वाढ झाली आहे. इतक्या वर्षाची सगळी माहिती गोळा करण्यासाठी लक्ष केंद्रीत करणं आणि तेही ठराविक लोकांची माहिती गोळा करणे, म्हणजे गुणात्मक बदल झालेला दिसतो. इन्कम टॅक्स, ईडी, सीबीआय या सगळ्या यंत्रणांचा वापर कुठं ना कुठं या सगळ्यांच्या बाबतीत केला जातो ही तक्रार सतत ऐकायला मिळते आणि हे चिंताजनक आहे.

**प्रश्न : भाजपचं सरकार केंद्रात आल्यापासून आपण सतत एक वेगळी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात सुद्धा महाविकास आघाडीच्या माध्यमातून प्रयोग केला गेला. पण आत्ता ज्या पद्धतीनं राजकारण बदललंय, एक नवीन सरकार अस्तित्त्वात आलेलं आहे. हिंदुत्त्वाचा मुद्दा हा विकासाच्यापेक्षाही महत्त्वाचा केला जातोय. त्यामुळे राजकारणाची पुढची दिशा...**

**शरद पवार :** कसं आहे, सरकार काल झालंय. त्यामुळे थोडा अवधी आम्हाला द्यावा लागेल ना. परिस्थितीचं आकलन करावं लागेल. नंतर निर्णय घ्यावा लागेल. ते काय लगेचच्या लगेच होईल असं नाही.

**प्रश्न : हे सगळं घडण्यामागे दिल्लीतलं राजकारण आहे का.**

**शरद पवार :** माहिती नाही. आता कुठल्या निर्णयात दिल्लीवरनं सूचना येतात, येत नाहीत याच्या खोलात जायची गरज नाही. एकच उदाहरण आजच पाहिलं. ते म्हणजे देवेंद्र यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मला वाटत नाही, की त्यांनी स्वत:हून घेतली असेल. कुठनं तरी सूत्रं हलली असणार. त्यामुळं या अदृश्य शक्ती कुठून तरी येतायंत राज्यामध्ये आणि हव्या त्या गोष्टी करून घेतात आणि त्यासाठी अधिकाराचा गैरवापर केला जातो असं लोक बोलतात. दिल्लीवरून धक्कातंत्र कदाचित जाणीवपूर्वक असेल. पण हे दिल्लीतल्या सत्ताधारी नेतृत्वाकडून होतंय असं दिसतंय.

**प्रश्न : निवडणुकीनंतर भाजप-शिवसेना युतीमध्ये मुख्यमंत्रिपदावरून वाद झाला होता. त्यावेळी शिवसेनेने मुख्यमंत्रिपद मागितले. पण भाजपने दिले नाही. मग आता पुन्हा नव्या सरकारमध्ये मुख्यमंत्रिपद नाकारून ते दुसऱ्याला दिले गेले.**

**शरद पवार :** निवडणुका झाल्याच्यानंतर भाजपने जर ही भूमिका घेतली असती, तर जे काय अडीच-तीन वर्षात राज्याच्या राजकारणात घडलं ते घडलंच नसतं. आम्ही जे काय वाचलं, त्याच्यामध्ये अडीच-अडीच वर्षाचं वाटप हे झालं होतं आणि त्याच्यामध्ये काही मतभेद झाले आणि हे घडलं.

**प्रश्न : एकनाथ शिंदेंकडं ४० आमदार आहेत आणि उद्धव ठाकरेंकडं फक्त पंधरा आमदार आहेत. मग खरी शिवसेना कुणाची असा प्रश्न विधिमंडळात निर्माण होईल का.**

**शरद पवार :** कसं आहे,





१९७८ साली शरद पवार यांनी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

की माझा १९८० सालचा अनुभव असा, की माझ्या ६७ आमदारांपैकी ५ आमदार माझ्याबरोबर राहिले. बाकी गेले. पण पक्ष माझाच राहिला. पक्ष संघटना ही गोष्ट वेगळी आहे आणि विधिमंडळ पक्ष हा वेगळा आहे. पक्ष हा तिकिट देतो. पक्ष हा निर्णय घेतो. पक्ष लोकांच्याकडं तुम्हाला नेतो आणि लोकांच्यामधून निवडून द्यायला हातभार लावतो. हा पक्ष असतो. निवडून आलेले लोक पाच वर्षाच्यासाठी असतात. पक्ष हा कायमचा असतो.

**प्रश्न : सर्व आमदारांनी आम्हाला हिंदुत्त्व टिकवायचंय त्यासाठी आम्ही बाहेर पडलो असं सांगितलंय.**

**शरद पवार :** तीन महिन्यांपूर्वी त्यांना हिंदुत्त्व हा शब्द विचारला असता तर उत्तर आलं असतं, की आम्हाला काय माहिती नाही. उगीच काय हिंदुत्त्व, हिंदुत्त्व म्हणून जे सांगतायंत, आपण केलेल्या चुकीसाठी लोकांना काहीतरी मुद्दा सांगायला पाहिजे. म्हणून दोन गोष्टी त्यांनी निवडल्यात. एक हिंदुत्त्व आणि दुसरं राष्ट्रवादी आणि काँग्रेस.

**प्रश्न : महाविकास आघाडी फोडण्यामागे देवेंद्र फडणवीस यांचा हात आहे अशी चर्चा आहे.**

**शरद पवार :** मला माहित नाही.

**प्रश्न : सर, राज्यपालांविषयी काय सांगाल. आमदारांचा जो विषय होता तो त्यांनी मार्गी लावला नाही.**

**शरद पवार :** असं आहे, की राज्यपालांविषयी सहसा बोलू नये. पण, सध्याचे जे राज्यपाल आहेत. पण महाराष्ट्रात मी १९६७ पासूनचे सर्व राज्यपाल पाहिले. प्रत्येक राज्यपालाने महाराष्ट्राची प्रतिष्ठा वाढवली. महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेसंबंधी हल्लीच्या राज्यपालांकडून काय झालं, हा चर्चेचा विषय आहे. या पदाची प्रतिष्ठा राखण्यासंबंधी त्यांनी अधिक प्रयत्न करायला हवे, असा आमचा ते

आल्यापासूनचा अनुभव आहे.

**प्रश्न : शिवसेनेचे लोक परत पक्षात येतील अशी काय शक्यता आहे का.**

**शरद पवार :** असं काय वाटत नाही. त्याचं कारण जी काय देवाणघेवाण झाली असेल, त्याची काय मला फारशी माहिती नाही. पण त्याच्यात ज्या काय कमिटमेंट केल्या असतील, त्या कमिटमेंट झाल्याच्यानंतर परत फिरणं अवघड जातं.

**प्रश्न : लोकांमध्ये अजूनही असा सूर आहे, की शरद पवार अजूनही यामध्ये काहीतरी करू शकतात आणि एक नवीन राजकारण महाराष्ट्र पाहू शकतो.**

**शरद पवार :** कसं आहे, की ते जे विधानसभेचे सदस्य महाराष्ट्रात असते तर काहीतरी करू शकलो असतो. पण गुवाहाटीला त्या हॉटेलच्याभोवती साधारणत: तीन एकशे पोलिस असायचे. कुणाला आत जायला परवानगी नव्हती. कुणाला बाहेर जायला परवानगी नव्हती. आमचे काही सहकारी तिथं बसून होते. पण, त्यांना बाहेर पडता आलं नाही. संपर्क साधता आला नाही.

**प्रश्न : तुम्ही राजकारणाचे अनेक टप्पे पाहिले आहेत. पण आत्ता जो बळाचा वापर असेल, मग तो पोलिस यंत्रणा असेल किंवा अन्य कोणती, जी मुंबईच्या रस्त्यांवर उतरवली गेली आहे. तर या पद्धतीच्या राजकारणाबद्दल काय वाटतं.**



**शरद पवार :** असं आहे, की जिथं लोकांच्यावरती विश्वास नसतो, आपण घेतलेल्या निर्णयाच्यासंबंधीचं समर्थन लोक करणार नाहीत, अशा वेळेला बाकीच्या यंत्रणांचा वापर केला जातो. सीआरपीएफचे लोक काल मुंबईमध्ये तीन विमानं भरून आली, त्याची काय गरज होती. मुंबई पोलिस ही देशातली एक महत्त्वाची यंत्रणा आहे. मुंबई पोलिसांचा नावलौकिक भारताच्या बाहेरसुद्धा आहे. असं असताना तीन तीन विमानं भरून याठिकाणी असे लोक आणणं याचा अर्थ त्यांना आपल्या ॲक्शनच्या संबंधी स्थानिक जनतेची सहमती नाही आणि त्याची प्रतिक्रिया तीव्र होईल असं वाटलं. त्यामुळं ही सगळी उठाठेव केलेली आहे.

**प्रश्न : सर तुम्ही म्हणालात, की बंडखोर आमदार परत येण्याची शक्यता कमी आहे. तर अशा परिस्थिती उद्धव ठाकरे यांनी या आमदारांची हकालपट्टी केली पाहिजे का.**

**शरद पवार :** त्यांचा तो अंतर्गत प्रश्न आहे. आम्ही काय सांगणार, की त्या पक्षाच्या नेतृत्वानं काय निर्णय घ्यावा.

**प्रश्न : शिवसेनेकडे आता पंधरा ते सोळा आमदारांचं बळ असल्याचं पाहायला मिळतंय. पक्ष मोठा कमकुवत झालेला आहे. अशावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि तुम्ही स्वत: पक्ष उभा करण्यासाठी काही मदत करणार का.**

**शरद पवार :** मघाशीच मी सांगितलं, की १९८० साली माझ्या नेतृत्त्वाखाली ६९ आमदार निवडून आले आणि सहा महिन्यांनी त्यातले पाच शिल्लक राहिले. बाकी सगळे गेले. पण त्याच्यानंतरच्या निवडणुकीत पुन्हा माझी सत्ता आली. कारण शेवटी लोकांच्यात जावं लागतं आणि लोकांना असल्या गोष्टी आवडत नाहीत. त्यामुळं आज जरी ठाकरेंच्या बाबतीत हे संकट आले आहे तरी उद्या ठाकरे जेव्हा लोकांमध्ये जातील आणि लोकांना मतं देण्याची संधी मिळेल, तेव्हा उलटं चित्र दिसेल, असे मला वाटते.

■■




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २३ वा वर्धापनदिन १० जून २०२२ रोजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या शुभहस्ते झेंडावंदन करून पक्षाच्या मुंबईतील मुख्यालयात मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. त्या समारंभाचा हा संक्षिप्त वृत्तांत. या झेंडावंदन समारंभाला खासदार सुप्रिया सुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, आमदार एकनाथ खडसे, मुंबई महानगरपालिकेतील गटनेत्या राखी जाधव आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडूनच भावी पिढीला उद्याची आशा

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उद्गार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २३ वा वर्धापन दिन आज मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष ना. जयंत पाटील यांच्या हस्ते राष्ट्रवादी भवन, मुंबई येथे १० वाजून १० मिनिटांनी ध्वजारोहण करण्यात आले. कार्यकर्त्यांच्या एकजुटीने पक्षाला मिळालेल्या उभारीबद्दल जयंत पाटील यांनी सर्वांचे यावेळी आभार मानले. आपला पक्ष तेवीस वर्षांचा झाला आहे. आपल्या पक्षामध्ये महाराष्ट्रातील नव्या पिढीला भविष्यातील आशा दिसत आहे. अनेक तरूण पक्षात काम करण्यास इच्छुक आहेत. आदरणीय शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे काम सुरु आहे, हे पक्ष वाढण्याचे एकमेव कारण आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

तुम्हा सर्वांचे कष्ट, प्रयत्न, जिद्द यातूनच आपला पक्ष इथपर्यंत आला आहे याची आम्हा सर्वांना जाणीव आहे. हा पक्ष आपल्याला महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष करायचा आहे. यासाठी एकसंधपणे प्रयत्न करूया, असे आवाहन प्रदेशाध्यक्षांनी सर्व कार्यकर्त्यांना केले.

पुढे जयंत पाटील यांनी २३ वर्षांपूर्वी पक्ष स्थापन करताना राज्यात पक्षाच्या ताकदीवर आपली सत्ता स्थापन होईल असा निर्धार केला होता, अशी आठवण त्यांनी सांगितली. राज्यातील सर्व घटकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न आपल्याकडून होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच आगामी काळात होणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाच्या मुंबई विभागीय कार्याध्यक्ष श्रीमती राखी जाधव व कार्याध्यक्ष श्री. नरेंद्र राणे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष चांगले चित्र निर्माण करेल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

यानंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. पक्ष स्थापन झाल्यावर प्रांताध्यक्ष होण्याचा मान सर्वप्रथम मला मिळाला. राज्यात पक्षाची कोणतीही बांधणी नसताना काँग्रेस खालोखाल क्रमांक दोनचा पक्ष हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ठरला. तेव्हापासून पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली राज्यातील गोरगरीब जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण काम करत आहोत, असे श्री. भुजबळ म्हणाले. पवार साहेबांनी मंडल आयोगाच्या माध्यमातून राज्यात आरक्षण मिळवून दिले. या आरक्षणाला नख लावण्याचे काम काही शक्तींकडून होत आहे. मात्र त्याविरोधात आपण सक्षमपणाने लढा देतोय, अशी खात्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. देशात निरनिराळ्या प्रश्नांची माहिती असलेले व त्यांची सोडवणूक करण्याची ताकद असलेले नेते म्हणजे आदरणीय पवार साहेब आहेत. आपण पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची वाटचाल अधिक वेगाने करण्यासाठी प्रयत्नशील राहूया, असे ते म्हणाले.

श्री. भुजबळ पुढे म्हणाले की, येणारा काळ अत्यंत संघर्षाचा व आपल्या सर्वांची परीक्षा पाहणारा आहे. सत्ताधारी भाजप हा जाती-धर्माच्या नावाने समाजांमध्ये फूट पाडून हिंदुत्वाच्या नावावर व्होट बँक जमविण्याचा व वाढविण्याचा



प्रयत्न करीत आहे. त्यामुळे अल्पसंख्य समाज भयभीत होऊन आपल्यापासून दूरावला जातो आहे. त्या समाजात असुरक्षिततेची जी भावना निर्माण झालेली आहे ती वाढीला लागली तर या देशाच्या एकतेला आणि अखंडतेला धोका निर्माण होऊ शकतो. १९४७ साली आपल्या देशाची फाळणी झाली. पाकिस्तान निर्माण झाले. धर्म एक असला म्हणून राष्ट्र एक राहू शकते हा सिद्धांत बांगला देश निर्मितीने खोटा ठरविला. भारतातला मुस्लिम समाज आजही शिक्षणात खूप मागे राहिला आहे. त्यामुळे अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरांमध्ये अडकून पडला आहे. त्याला तिथून बाहेर काढून आपल्या बरोबरीने प्रगतीच्या दिशेने नेणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. इतर मागासवर्गीय म्हणजे ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्नही बिकट बनला आहे. मध्यप्रदेशातील ओबीसींना न्यायालय न्याय मिळवून देते, पण महाराष्ट्रातील ओबीसींवर अन्याय करते हे आपण सारे जण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. ओबीसींच्या आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण आणू नये अशी वारंवार आपण भाजप नेत्यांना विनंती केली. पण त्यांच्याकडून पाहिजे तशी साथ मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ओबीसींना आरक्षण मिळाल्याशिवाय नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्या आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत घेता कामा नयेत अशी आग्रही भूमिका आपण मांडली असून पक्षाच्या वतीने त्यासाठी आंदोलने केली आहेत, मोर्चे काढले आहेत व धरणे आणि उपोषणंही केली आहेत. इम्पिरीकल डेटा गोळा करण्याचे काम चालू असून ते लवकरच पूर्ण होईल व ती आकडेवारी न्यायालयाला सादर केली जाईल. त्यानंतरच ओबीसींना आरक्षण मिळेल. हे आरक्षण आपल्या हक्काचे आहे. त्यामुळे ते मिळविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

पुढे वरिष्ठ नेते मा. एकनाथ खडसे यांनी कार्यकर्त्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कोणत्याही व्यक्तीच्या अथवा पक्षाच्या राजकीय जीवनात २३ वर्ष प्रवास करणे व आपला प्रभाव टिकून ठेवणे महत्त्वाचे आहे. आता खऱ्या अर्थाने आपला पक्ष युवा जीवनात प्रवेश करत आहे. या प्रवासात आदरणीय पवार साहेबांनी आपला राष्ट्रीय प्रभाव राखून ठेवला आहे. आपल्याला अजून खूप काम करायचे आहे. राजकीय पक्षाला कोणत्याही वर्षाची मर्यादा नसते. आपल्याला सर्व मर्यादा ओलांडून हा पक्ष टिकवायचा आहे, वाढवायचा आहे. आपल्याला पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडायची आहे, असे श्री. खडसे म्हणाले.

या कार्यक्रमाला खासदार सुप्रियाताई सुळे, आमदार शेखर निकम, कोषाध्यक्ष हेमंत टकले, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, माजी खासदार माजिद मेमन, मुंबई विभागीय कार्याध्यक्ष राखी जाधव, मुंबई विभागीय कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, अल्पसंख्याक सेल प्रदेशाध्यक्ष मोहम्मद खान पठाण, लीगल सेल प्रदेशाध्यक्ष आशिष देशमुख, ग्रंथालय सेल प्रदेशाध्यक्ष उमेश पाटील, सेवा दल कार्याध्यक्ष जानबा म्हस्के, प्रदेश सरचिटणीस अविनाश आदिक, माजी आमदार प्रकाश गजभिये, माजी आमदार संजय दौंड, आयटी सेल राज्यप्रमुख नीरज महांकाळ, महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, मुंबई विभागीय महिला अध्यक्ष सुरेखा पेडणेकर, मुंबई विभागीय युवक अध्यक्ष निलेश भोसले, मुंबई विभागीय अल्पसंख्याक सेल अध्यक्ष सोहेल सुभेदार, तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

■■





# विधानसभा विरोधी पक्षनेतेपदी अजित पवार
# राष्ट्रवादीची निवड अत्यंत सार्थ व समर्पक

विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांची निवड झाली आहे. राज्य विधीमंडळामध्ये काम करण्याचा जवळपास ४० वर्षांचा अनुभव श्री. अजित पवार यांच्या पाठिशी असून उत्तम प्रशासक व जनहितदक्ष नेते म्हणून त्यांची ख्याती आहे. अत्यंत सकारात्मक भूमिका घेऊन विकास कामांसाठी धडाडीने पुढे येणारे व पक्षभेद विसरून चांगल्या कामांना उचलून धरणारे नेते म्हणूनही त्यांचा सर्वदूर परिचय आहे. त्यामुळेच त्यांची सर्व पक्षातल्या नेते, आमदार व पदाधिकाऱ्यांशी जवळीक आहे, सलोख्याचे संबंध आहेत. शब्दाला अत्यंत पक्का आणि विश्वासू अशी प्रतिमा असलेल्या अजित पवार यांची विरोधी पक्षनेतेपदी झालेली निवड अत्यंत सार्थ असून ते आपल्या कामगिरीने या पदाचीही शान उंचावतील असा सर्वांना विश्वास आहे. त्यांचे रोखठोक, सडेतोड, कुरकुरीत व मिश्किल बोलणे सर्वांनाच आवडते व हवेहवेसे वाटते याचा अनुभव विधीमंडळाच्या दोन दिवसांच्या अधिवेशनातून सर्वांना आला आहे. विधानमंडळाच्या अधिवेशनात श्री. पवार यांनी केलेली भाषणे येथे मुद्दाम देत आहोत.

## अजित पवार यांचे ३ जुलैचे भाषण...

**भाजपच्या १०६ आमदारांनी आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून स्वतःला विचारावे की जे घडलंय त्यानं आपलं समाधान झालं आहे का?**

मुंबई, दि. ३ – विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे अभिनंदन करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी आज सत्ताधारी बाकावरील भाजप आणि शिंदे गटाला धू-धू धुतले. फडणवीसांना मुख्यमंत्री केले नाही

## अजितदादांनी भाजप-शिंदे गटाला धू-धू धुतले
## फडणवीसांना मुख्यमंत्री केले नाही म्हणून भाजप नेते ढसाढसा रडतायत!

# मूळ भाजपच्या मान्यवरांविषयी वाईट वाटतं

**अजित पवार पुढे म्हणाले, मी जेव्हा सभागृहात समोरच्या बाजूला पाहतो तेव्हा मूळचे भाजपचे मान्यवर कमी आणि आमच्याकडून गेलेलेच जास्त मान्यवर पाहायला मिळतात. आमच्या मान्यवरांना पदावर बसलेलं पाहून मला मूळ भाजपच्या मान्यवरांविषयी वाईट वाटतं. ते मूळ मान्यवरांना बाजूला सारून तिथं पदावर बसलेत. पहिली रांग पाहिली तरी ते लक्षात येईल. गणेश नाईक, बबन पाचपुते, राधाकृष्ण विखे-पाटील, उदय सामंत हे आमच्याकडून गेलेले मान्यवर पहिल्या ओळीत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मागे बसलेले दीपक केसरकर तर काय चांगले प्रवक्ते झाले आहेत. म्हणजे त्या वेळी आम्ही शिकवलेलं कुठं वाया गेलं नाही," असे अजित पवारांनी म्हटले.**



म्हणून भाजप नेते ढसाढसा रडत आहेत असे सांगतानाच आमच्याकडून गेलेलेच सत्ताधाऱ्यांच्या पहिल्या रांगेत दिसत आहेत, असा जोरदार चिमटा अजित पवार यांनी काढला.

अजित पवार म्हणाले, "अनेक कट्टर काम करणारे मान्यवर थोडेसे नाराज आहेत. देवेंद्र फडणवीस टीव्हीवर बोलत होते आणि त्यांनी मुख्यमंत्री पदाची जबाबदारी एकनाथ शिंदे घेतील असे सांगितले तेव्हा 'पिन ड्रॉप सायलन्स' झाला. कितीतरी भाजपचे नेते तर ढसाढसा रडायलाच लागले. कुणाला काही कळेनाच. महाराष्ट्रासाठीच तो धक्का होता." गिरीश महाजन यांचे तर अजूनही रडणे बंद होईना. त्यांना फेटा बांधायला दिला तर फेटा सोडून डोळ्यात आलेले पाणी पुसण्यासाठी ते फेट्याचा वापर करत आहेत. त्यांना देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री न झाल्याचे फारच वाईट वाटले," असे म्हणत अजित पवारांनी गिरीश महाजन यांना कोपरखळी लगावली.

**कुठं बाकडं वाजवताय?**

यावेळी अजित पवारांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनाही चिमटे काढले. ते म्हणाले, "कुणी काहीही म्हटलं तरी सगळ्यांच्या मनात धाकधूक आहे. भाजपच्या १०६ आमदारांनी आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून स्वतःला विचारा की जे घडलंय त्यानं आपलं समाधान झालं आहे का? चंद्रकांत पाटील यांनी यावर बाकडं वाजवू नये. तुमचं मंत्रीपदच येईल की नाही सांगता येत नाही. कुठं बाकडं वाजवताय? शिवसेनेतून तिकडे गेलेल्या ३९ लोकांपैकी किती लोकांना मंत्रीपद मिळणार आहेत? सगळ्यांना वाटतंय मिळेल. काय होईल काही सांगता येत नाही, असे पवार म्हणताच सभागृहात हंशा उसळला.

## शिंदेंनी नार्वेकरांना आपलेसे करावे अन्यथा...

**राहुल नार्वेकर आदित्य ठाकरे यांच्या जवळचे होते. त्यांच्या बरोबर त्यांनी काम केले. ते ज्या पक्षात जातात त्या पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या अतिशय जवळ जातात. शिवसेनेत आदित्य ठाकरे यांना आपलेसे केले. आमच्याकडे आले आणि मला आपलेसे केले. भाजपमध्ये फडणवीसांना आपलेसे केले. आता शिंदेसाहेब, तुम्ही त्यांना आपलेसे करून घ्या. नाहीतर काही खरे नाही, असा टोलाही अजित पवार यांनी लगावला.**

# यात काहीतरी काळेबेरे आहे हे लक्षात ठेवा!

## अजित पवार यांचा एकनाथ शिंदेंसह बंडखोरांना इशारा

### अजित पवार यांचे ४ जुलैचे भाषण..

भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेलेले ४० आमदार असे सरकार करण्याचे ठरते जेव्हा मुख्यमंत्री करायचे ठरते तेव्हा १०६ आमदार असणारी व्यक्ती मुख्यमंत्री होत नाही; पण ४० आमदार असलेली व्यक्ती मुख्यमंत्री होते यात निश्चितपणे काळेबेरे आहे, हे लक्षात ठेवा. उद्या भाजपचे कोणीही १०५ आमदार जेव्हा एकनाथ शिंदे यांच्या संबंधित मंत्र्यांकडे कामासाठी जातील, तेव्हा आमच्यामुळेच तुम्ही मंत्री किंवा मुख्यमंत्री आहात हे बोलायला कमी करणार नाहीत. हा मनुष्य स्वभाव आहे हे लक्षात घ्या, असा इशाराच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एकनाथ शिंदे यांच्यासह बंडखोर आमदारांना दिला.

अभिनंदन ठरावावर बोलताना अजित पवार यांनी बंडखोर आमदारांचा व त्यांनी केलेल्या आरोपांचा चांगलाच समाचार घेतला. सलग दुसऱ्या दिवशी त्यांनी जोरदार फटकेबाजी केली. ते म्हणाले, एकनाथ शिंदे आपण ज्यांच्यासोबत गेलात त्या भाजपने १९८० साली स्थापना झाल्या वेळेपासून शिवसेनेची मदत घेऊन हळूहळू आपली ताकद वाढवली. आपले आमदार वाढवले आणि टप्प्याटप्प्याने पक्ष वाढवत नेला, असे सांगतानाच त्यांनी रिक्षावाल्यापासून इथपर्यंत पोहोचणे हे येरागबाळ्याचे काम नाही. पण हे सर्व होत असताना आपले नेते उद्धव ठाकरे यांना सोबत घेऊन केले असते तर वेगळे समाधान आपल्या सर्वांना पाहायला मिळाले असते, असाही जोरदार टोला लगावला.

### हे आमदार म्हणून बरोबर नाही!

इकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होणार असा निर्णय झाला आणि तिकडे गोव्यात काही आमदार नाचायला लागले. काही तर टेबलावर उभे राहून नाचले... हे आमदार म्हणून योग्य नाही. सत्ता येते आणि जाते. आपण पाचपाच लाख जनतेचे प्रतिनिधित्व करतो. सर्व जनता आपल्याकडे बघत असते. आपले आमदार कुठे गेले, कशाला गेलेत, काय करताहेत हे जनता पाहत असते, अशा शब्दांत अजित पवार यांनी बंडखोर आमदारांना झापले.

### फडणवीसांना टोला

अनेक वर्षे फडणवीस यांना मी सभागृहात भाषण करताना बघितले पण नेहमीचा जोश तुमच्या भाषणात नव्हता. मुख्यमंत्री असताना आणि विरोधी पक्षनेता असतानाही सर्व पिन ड्रॉप सायलेन्स ठेवून तुमचे भाषण ऐकायचे. आजही तुम्ही वकील असल्याने जे काही घडले ते कसे योग्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. या वेळेस विधिमंडळात आमदार निवडून आलेत त्यात सर्वात नशीबवान कोण असेल तर ते देवेंद्र फडणवीस. कारण आता अडीच वर्षेच झालीत त्यात ते मुख्यमंत्री झाले, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेतेही झाले. कुठलं पद नाही जे त्यांनी अडीच वर्षांत भूषवले नाही. सगळी महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली, असा जोरदार टोला त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

### शिवसैनिक कधीच बंडखोर नेत्यांसोबत जात नाहीत

शिंदे तुमच्याकडून लोकांच्या काही अपेक्षा आहेत. कितीही काहीही झाले तरी तुम्हाला बाळासाहेब ठाकरे यांना दैवत मानूनच पुढे काम करावे लागणार आहे. हे काम करीत असताना एकच लक्षात ठेवा, शिवसैनिक हा कधीच बंडखोर नेत्यांसोबत जात नाहीत हा आतापर्यंतचा शिवसेनेचा इतिहास आहे. आता ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येतील तेव्हा हे चित्र आपल्याला पाहायला मिळेल, असा इशाराही अजित पवार यांनी दिला.

### शिंदे शिवसैनिक, मग सतत सांगण्याची वेळ का?

३०वे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी जबाबदारी स्वीकारली. कोणाला वाटलंही नसेल असं काही घडेल. देवेंद्र फडणवीसांनी सारखं सारखं सांगितलं की, एकनाथ शिंदे हे एक शिवसैनिक आहेत. असं का सारखं सांगावं लागतं आहे. शिवसैनिक आहेत तर सतत तेच सांगण्याची वेळ का येते याचेही आत्मचिंतन करा.

देवेंद्रजी तुमचं भाषण बारकाईने ऐकत होतो. तुम्ही इतके एकनाथ शिंदे यांचे समर्थन करत होतात,मग मागच्या

# राज्यातील साडेबारा कोटी जनतेला न्याय देण्यासाठी विरोधीपक्ष नेता म्हणून अजितदादा पवार काम करतील- जयंत पाटील

**शिवसेना – काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने विरोधी पक्षनेते म्हणून अजितदादा पवार यांनी केलेले काम हे पुढील काळात लक्षात राहिलच शिवाय राज्यातील साडेबारा कोटी जनतेला न्याय देण्यासाठी विरोधी पक्षनेता म्हणून अजितदादा पवार काम करतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विधानसभेत आज व्यक्त केला. अजितदादा पवार यांची विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर सभागृहात त्यांच्या अभिनंदनपर प्रस्तावावर जयंत पाटील बोलत होते. अजितदादांचा स्वभाव रोखठोक आणि स्पष्ट असल्याने सभागृहातील चुकीच्या गोष्टी व शासनाकडून राहिलेल्या त्रुटींवर समर्थपणे बोट ठेवण्याचे काम अजितदादा करतील असेही जयंत पाटील म्हणाले. एखादा निर्णय त्वरीत घ्यायचा असताना ३०–३५ वर्षांचा त्यांचा प्रदीर्घ अनुभव उपयोगी पडेल. अजितदादांनी उपमुख्यमंत्री पद भूषविले आहे. तसेच अर्थमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले आहे. प्रत्येक खात्यातील बारकावे समजण्यात त्यांना यामुळे अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे सरकारच्या बाजूने विषय मांडले जात असताना अजितदादा विरोधी पक्षाची बाजू अतिशय समर्थपणे मांडतील, असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. नवीन सरकार राज्यातील जनतेसाठी जे जे चांगले काम करेल त्याला अजितदादांचे सहकार्य नक्कीच लाभेल. त्याप्रमाणेच कणखर विरोधी पक्ष नेता म्हणून विरोधी पक्षांच्यावतीने सरकारकडे मागण्या मांडण्याचे काम आणि सोबत योग्य मार्गदर्शन करण्याचे काम अजितदादा निश्चित करतील असे सांगतानाच जयंत पाटील यांनी पक्षाच्यावतीने अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.**



टर्ममध्ये एकनाथराव तुमच्या मंत्रिमंडळात होते, पण फक्त रस्ते विकास महामंडळ हे खातेच त्यांच्याकडे का दिले असा सवाल अजित पवार यांनी केला.

### घाईघाईने ठरावाची काय गरज?

अनेक गोष्टी न्यायप्रविष्ट आहेत. ११ तारखेला सुप्रीम कोर्टात तारीख आहे. त्यावर सुप्रीम कोर्ट काय तो निर्णय देईल, परंतु तोपर्यंत विश्वासदर्शक ठराव घ्यायला नको होता तो तुम्ही घेतला. कोर्टातली लढाई कोर्टात चालेल, विधिमंडळातली लढाई विधिमंडळात चालेल. परंतु एक गोष्ट खरी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी शपथ घेतली, सदस्यांच्या अपात्रतेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना ठराव इतक्या घाईघाईने आणण्याची गरज नव्हती, असे अजित पवार म्हणाले.

### राज्यातील जनतेला शंका येतेय

अनेक गोष्टी लांबणीवर टाकण्याचे काम महाविकास आघाडी सरकार असताना राज्यपालांनी केले. विधानसभा

# विरोधी पक्षाचे काम नक्कीच चांगले करू : जयंत पाटील

आता आम्ही विरोधी पक्षात बसलो आहोत तर विरोधी पक्षाचे काम नक्कीच चांगले करू आणि महाराष्ट्रातील जनतेचा पुन्हा एकदा विश्वास जिंकू असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे प्रदेश कार्यालयात आले त्यावेळी माध्यमांशी बोलताना वरील माहिती दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरद पवार साहेबांना आयकर विभागाची नोटीस आल्याचे आम्हाला देखील कालच्या त्यांच्या पत्रकार परिषदेनंतरच कळले. मागच्या चार निवडणुकीत पवारसाहेबांनी भरलेल्या प्रतिज्ञापत्राची माहिती मागविण्यात आली आहे. पवारसाहेबांना नोटीस पाठविण्याऐवजी आयकर विभागाने जर निवडणूक आयोगाकडून ही माहिती घेतली असती तर त्यांना तिथून मिळाले असतीच परंतु जाणीवपूर्वक यंत्रणांचा गैरवापर करुन प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न काही लोकांचा सुरु असल्याची टीकाही जयंत पाटील यांनी केली. महाविकास आघाडी म्हणून आम्ही तीन पक्ष एकत्र होतो. यापुढेही विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी आमचा एकच उमेदवार असणार आहे. सरकार गेल्यानंतर आम्ही एकत्र बसून चर्चा केलेली नाही, पुढील काळात एकत्र बसून पुढील धोरण ठरवू. स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुकीत जिथे – जिथे शक्य होईल, तिथे तीनही पक्ष एकत्र येण्याचा प्रयत्न यशस्वी करु, असेही प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले. संजय राऊत यांना ईडीची नोटीस आली असून ते चौकशीला सामोरे गेलेले आहेत. ते निर्दोष असून त्याबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही. आजच्या चौकशीच्या शेवटी ईडीचे दिल्लीतील अधिकारी काय निर्णय देतात हे पाहावे लागेल. कारण याआधी आमचे देखील नेते दिवसा चौकशीला गेल्यानंतर त्यांची रात्रीपर्यंत चौकशी चालली आणि रात्री उशीरा त्यांच्या अटकेच्या बातम्या येतात. त्यामुळे संजय राऊत यांच्याविरोधात ईडी जाणीवपूर्वक टोकाची भूमिका घेणार नाही, अशी अपेक्षा आपण करुयात असेही जयंत पाटील म्हणाले.



अध्यक्ष निवडीसाठी एकनाथ शिंदे व आम्ही राज्यपालांना भेटायचो. त्यानंतर सगळे गेल्यावर राज्यपाल थांबवायचे आणि काय गोष्टी सांगायचे हे तुम्हाला माहीत आहे. त्यात १२ आमदारांच्या नियुक्तीवरही राज्यपालांनी निर्णय घेतला नाही. पण सध्या राज्यपाल महोदय एकदम ॲक्शन मोडवर आले आहेत. त्यामुळे ज्यांचा राजकारणाशी संबंध नाही अशा राज्यातील लोकांच्या मनात शंका उपस्थित होते. ते विचार करतात की, असे का घडतेय? असे सांगताना अजित पवार यांनी राज्यपालांविषयी नाराजी व्यक्त केली.

### शिवसेना फोडणाऱ्यांचे आमदार पुढे निवडून आले नाहीत.

शिवसेना सोडून ४० आमदार गेले. शिवसेनेचे तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर अविश्वास दाखवून तुम्ही गेलात. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पद सोडावे लागले. त्यातून शिवसैनिकांत काय संदेश गेला याची माहिती घ्या. आता वरवर जरी दिसत असले तरी एक गोष्ट मी या चर्चेच्या माध्यमातून महाराष्ट्राला सांगू इच्छितो की, ज्या ज्या वेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांनी निर्माण केलेली शिवसेना फोडण्याचा प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केला त्यांचा एकही आमदार पुढच्या निवडणुकीत निवडून आला नाही ही वस्तुस्थिती असल्याचे अजित पवार म्हणाले.

### निधीवाटपात भेदभाव केला नाही

राष्ट्रवादीने आमच्यावर अन्याय केल्याचे शिवसेनेमधून गेलेले आमदार म्हणत आहेत. पण मी भेदभाव केला नसल्याचे अजित पवार यांनी सांगितले. नगरविकास खात्याला पहिल्या वर्षी ३०६१ कोटी दिले, २०–२१ला २१७७ कोटी दिले. त्यानंतर २१–२२ला ४०५२ कोटी दिले. आपण सत्तेवर आल्यापासून १२ हजार कोटी दिले. शिवभोजन केंद्रांसाठी संजय राठोड यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधींच्या शिफारशीने १२०० केंद्रांना परवानगी दिली. तसेच एकनाथ शिंदे यांच्या मतदारसंघासाठी ३६६ कोटींचा निधी दिला. संदीपान भुमरे यांना १६७ कोटी, उदय सामंत यांना २२१ कोटी, दादा भुसे ३०६ कोटी, गुलाबराव पाटील ३०९ कोटी, शंभुराज देसाई २९४ कोटी, अब्दुल सत्तार २०६ कोटी, शहाजीराव १७१ कोटी, महेंद्र थोरवे १५१ कोटी दिल्याचे सांगितले.

इस्राायलच्या वकिलातीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा नुकताच सत्कार केला. त्याप्रसंगी त्यांनी केलेले हे छोटेखानी भाषण...



# भारताला खंबीर पाठिंबा देणाऱ्यांपैकी इस्त्रायल हा एक देश : शरद पवार

या महत्त्वाच्या प्रसंगी उपस्थित राहण्यासाठी आम्हा सर्वांना निमंत्रित केल्याबद्दल मी इस्रायल वकिलातीचा अत्यंत आभारी आहे. भारताशी उत्तम संबंध ठेवणाऱ्या व खंबीर पाठिंबा देणाऱ्या जगातील अनेक देशांपैकी इस्रायल हा एक देश आहे. मला एका गोष्टीचा मनापासून आनंद आहे की, मी इस्रायलला विविध पदावर असताना अनेकदा भेट दिली आहे.

एक काळ असा होता की, त्या वेळी भारत-इस्रायल यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झालेले नव्हते. मात्र, कै. इंदिरा गांधी यांच्या सरकारने भारताचे शिष्टमंडळ इस्रायलला पाठविण्याचा निर्णय घेतला व त्यामुळे इस्रायलला जाण्याची व तेथील नेत्यांशी सुसंवाद साधण्याची संधी मला मिळाली.

मला आठवतेय, मी जेव्हा पहिल्यांदा इस्रायलच्या राष्ट्राध्यक्षांना भेटण्यास गेलो होतो, तेव्हा श्री. पेरेस हे राष्ट्राध्यक्ष होते, पंतप्रधान होते, संरक्षण मंत्रीही तेच होते. मी त्यांच्या कार्यालयात गेलो तेव्हा मला त्यांच्या कार्यालयातील टेबलावर महात्मा गांधींचा फोटो पाहायभला मिळाला. इस्रायलच्या राष्ट्राध्यक्षांचे कार्यालय, तेथे महात्मा गांधीचा फोटो असणे, यावरून असे दिसून येते की, इस्रायलच्या मनात भारताबद्दल प्रेम व कमालीचा आदर आहे.

मी दुसऱ्यांदा जेव्हा इस्रायलच्या दौऱ्यावर गेलो, तेव्हा मी भारताचा संरक्षण मंत्री या नात्याने गेलो होतो. यावेळी कृषी खात्याचा कार्यभारही माझ्याकडे होता. त्यामुळे कृषी मंत्री या नात्यानेही माझा तो दौरा होतो, त्यामुळे इस्रायल-

भारत यांच्यात कृषी क्षेत्रातील संबंध अधिक विकसीत व दृढ करण्यासाठी मी प्रयत्नपूर्वक पावले टाकली. दोन्ही देशांपुढे कृषी क्षेत्रातील समस्या सारख्याच होत्या. भारतातील बहुतांश भाग हा दुष्काळाच्या छायेत येतो. या उलट, इस्रायलने पाण्याची उल्लेखनीय अशी बचत करीत कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त पिके घेण्याचे तंत्र त्यांनी विकसीत केले आहे आणि परिणामी, आज ते राष्ट्र कृषी उत्पादनात जगातील अग्रेसर असे राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. जेव्हा मी इस्रायलला भेट दिली होती, तेव्हा मी ते सर्व पाहिले, अनुभवले व त्या देशाशी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पावलेही टाकली. इस्रायलच्या दौऱ्यावर जाणाऱ्या शिष्टमंडळात भारतातील चार मुख्यमंत्र्यांचा समावेश असावा, असा मी आग्रह धरला होता. त्या चार मुख्यमंत्र्यांमध्ये पहिले मुख्यमंत्री गुजरातचे श्री. नरेंद्र मोदी यांचा समावेश होता की, जे आज देशाचे पंतप्रधान आहेत. दुसरे राजस्थानच्या मुख्यमंत्री श्रीमती वसुंधरा राजे, तिसरे मुख्यमंत्री पंजाबचे श्री.प्रकाशसिंग बादल आणि चौथे महाराष्ट्राच्या कृषी मंत्र्याचा समावेश होता.

या शिष्टमंडळाने इस्रायलचा दौरा केला व त्या दौऱ्यात भारत–इस्रायलने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण अशा संयुक्त करारावर स्वाक्षऱ्याही केल्या. ते करार इतके महत्त्वाचे होते की, आजमितीसही त्याचा फायदा उभय देशांना होत आहे, याचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करू इच्छितो.

## भारत–इस्रायल कृषी प्रकल्प

इंडो–इस्रायल संबंध दृढ करण्याच्या माझ्या प्रयत्नांची पावती दिल्याबद्दल मी इस्रायल सरकारचा आभारी आहे आणि माझ्या कार्यकाळात भारत–इस्रायल कृषी प्रकल्प सुरू करण्याच्या उपक्रमाबद्दल मी माझा केलेल्या सन्मानाचा नम्रपणे स्वीकार करतो. इस्रायलधील सर्व देशवासीयांना त्यांच्या ७४ व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देतो . मला खात्री आहे की, देश समृद्ध होईल आणि विकासाची नवी उंची गाठेल. शेती, पाणी, व्यापार आणि गुंतवणूक या सारख्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील निरोगी संबंधांना प्रोत्साहन देण्याची खात्री मी देतो. इस्रायलचा मी जो शेवटचा दौरा केला, तोही खूप मजेशीर असाच होता. आमच्याकडे 'वर्ल्ड मराठी कॉन्फरन्स' या नावाची एक संघटना आहे, हे ऐकून आपल्याला आश्चर्य वाटेल. ही संघटना वेगवेगळ्या देशांत जेथे मराठी बोलणाऱ्यांची लोकसंख्या अधिक आहे, अशा भागात अधिवेशनाचे आयोजन करीत असते. या 'वर्ल्ड मराठी कॉन्फरन्स'चे दुसरे जागतिक अधिवेशन जेरुसलेम येथे आयोजित करण्यात आल होते. तसेच, जेरुसलेम येथून 'मायबोली' नावाचे एक मराठी मासिक (नियतकालिक) प्रसिद्ध होत असल्याचे पाहून व्यक्तिश: मला आश्चर्याचा धक्काच बसला. अशा प्रकारे, इस्रायली लोकांनी विविध क्षेत्रांत आपले हातपाय पसरले आहेत. आपण जर महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागावर नजर टाकली तर, आपल्याला अनेक इस्रायली कुटुंबे, ज्यू कुटुंबे आढळल्याखेरीज राहणार नाही. मी या प्रसंगी अधिक काही बोलू इच्छित नाही. पण, पुन्हा एकदा या समारंभास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिल्याबद्दल मी इस्रायलच्या वकिलातीचे आभार मानतो व आपल्याशी सुसंवाद साधण्याची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन मी थांबतो, धन्यवाद!

■■




शरद पवार यांचा इस्रायल देशातर्फे सन्मानचिन्ह देऊन सत्कार होताना शेजारी राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे व राजशिष्टाचार सचिव मनिषा म्हैसकर

# मराठी साम्राज्यात सरदारांच्या फितुरीच्या अनेक घटना



## -ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांचे उद्गार

**मराठी साम्राज्यात आपल्या राजाशी सरदारांनी फितूरी केल्याच्या अनेक घटना; आपण इतिहासातून काही शिकत का नाही? – ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी उपटले फुटिरांचे कान!**

"मुंबई केंद्रशासित करायची आहे; पण शिवसेना हा मोठा अडथळा आहे. त्यामुळे गुजरात्यांनी "पेशवाई कपटनिती" वापरून काट्याने काटा काढला; १९६० पासून मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे कपट कारस्थान सुरु आहे.

"नव्याचे नऊ दिवस संपले की, भाजप आपला रंग दाखवायाला सुरुवात करेल यात शंका नाही. फितूर झालेले शिंदे आणि फडणवीस तुम्हाला त्यांचा दास बनवतील.


महाराष्ट्राच्या इतिहासात मराठी साम्राज्यात आपल्या राजाशी सरदारांनी फितूरी केल्याच्या अनेक घटना आहेत. शिवाजी महाराजांच्या इतिहासात तसेच पेशव्यांच्या इतिहासात त्याचे अनेक दाखले मिळतात. आपण इतिहासातून काय शिकत नाही, असे मत प्राध्यापक हरि नरके यांनी मांडले आहे. हरि नरके यांनी बंडखोर आमदार एकनाथ शिंदे यांना इतिहासातील घटनांचा दाखला देत झणझणीत सल्ला दिला आहे.

पेशव्यांच्या आदेशावरून दत्ताजी शिंदे ताबडतोब निघून मल्हारराव होळकरांकडे गेले. 'पेशव्यांचे दुश्मन रोहील्याला खतम करायचे आहे, त्वरित निघुन या 'असे होळकरांना म्हणाले होते. त्यावर मल्हारराव होळकरांनी दत्ताजी शिंदेना सांगितले की, शिंदे, जोवर शत्रू जिवंत आहे, तोवर पेशव्यांना तुमची गरज आहे. रोहिले संपले की, पेशवे तुम्हाला भांडी घासायला नी धोत्रे धुवायला ठेवतील. हीच परिस्थिती आज राज्यात घडत आहे. या बंडखोर नेत्यांना मोदी, शहा,

फडणवीस हे गरज असेपर्यंत वापर करून घेतील. त्यानंतर त्यांना हाकलून देतील. केवळ अडीच वर्ष सत्ता उपभोगण्यासाठी त्यांचा वापर करतील. बंडखोर आमदारांवर कृपाकरुन, त्यांच्यावर उपकार करुन त्यांना आपल्या छत्राखाली राबवून घेतील. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर त्यांचा राग आहे. केवळ हे दोन्ही काँग्रेस संपवणे आणि काँग्रेसमुक्त महाराष्ट्र तयार करणे हाच भाजपचा अजंडा आहे. त्यामुळे भाजपने शिवसेनेतील मंत्री फोडण्याचा घाट घातला. त्यासाठी इतिहासातील दाखले विचारात घ्यायला हवे, असे मत प्राध्यापक हरि नरके यांनी व्यक्त केले आहे.

'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या म्हणी प्रमाणे राज्यात महाभारत सुरु आहे. भाजपने आपला शत्रू काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला बाजूला हटवण्यासाठी शिवसेनेच्या आमदारांशी हातमिळवणी करून बंड करण्यास भाग पाडले. त्यानंतर खूप रणकंदन माजले. सरकार अल्पमतात आल्यामुळे मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंना पायउतार व्हावे लागले. तरी देखील 'और लढेंगे'चा नारा शिवसेना प्रमुखांनी दिला आहे. तो केवळ स्वाभिमानी आणि एकनिष्ठ शिवसैनिकांवर विश्वास असल्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंनी आपल्या भाषणात सांगितले.

दोन गुजराती देश चालवत आहेत. तर दोन विकत आहेत. आपला देश मोदी, शहा चालवत आहेत. हे जनतेपासून लपून राहिलेले नाही. तर दोन मोठे



'Our' Glass



गुजराती उद्योजक देश विकत आहेत हे देखील जनतेपासून लपून राहिलेले नाही. त्यांना 'मुंबई' पळवायची आहे. या गुजराती माणसांना मुंबई गुजरातमध्ये न्यायची आहे. पण ते करण्यासाठी शिवसेना अडसर ठरते आहे. बाळासाहेब ठाकरेंनी मुंबई गुजरातमध्ये न नेण्यासाठी लढा दिला होता. त्यावेळेपासून मराठी माणसाला नेस्तनाबूत करण्याचा गुजराती नेत्यांचा प्रयत्न आहे. मुंबई किमान केंद्रशासित करायची आहे. पण शिवसेना हा मोठा अडथळा आहे. त्यामुळे त्यांनी काट्याने काटा काढला.

एकनाथ शिंदेना हाताशी धरुन पक्ष प्रमुख उध्दव ठाकरेंना कमजोर करण्याचा प्रयत्न भाजपने केला. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने तीच्यावर कब्जा करण्याचा गुजराती नेत्यांचा डाव आहे. हे माहित असून देखील एकनाथ शिंदे आणि बंडखोर आमदार शत्रूच्या पक्षात गेले. ही एक प्रकारची फितूरीच आहे. १९६० पासून मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे कपट कारस्थान सुरु आहे. मुंबईला गुजराती उद्योजकांनी ग्रासले होते. त्यांच्याकडे मराठी माणूस नोकरी करत होते. त्याची चाकरी करत होते. मात्र जीआयडी तयार झाल्यानंतर मुंबईतल्या अनेक कंपन्या गुजरातमध्ये गेल्या आणि काही प्रमाणात मराठी माणसांची गुजरातींची चाकरी करण्याचे प्रमाण घटले. हा इतिहास प्रत्येक शिवसैनिकाला माहित आहे. तरी देखील ईडीची कारवाई टळावी. तसेच आणखी मलीदा खायला मिळावा, यासाठी शिवसेनेतील नेत्यांनी बंडखोरी केली.



अनेक नेत्यांना व आमदारांना बंडखोरी करण्यासाठी ईडीचा धाक दाखविण्यात आला व अटकेची धमकी देऊन सर्व मालमत्ता जप्त करण्याची भिती दाखविण्यात आली. तसेच काही आमदारांना मंत्रीपदाचे तर काहींना मोठमोठ्या कोट्यावधी रुपयांचे (काही जण म्हणतात ५० कोटींचे; खरे–खोटे आम्हांला माहिती नाही. ते देणारे आणि घेणारे दोघांनाच

माहित) आमिष दाखविण्यात आले असे प्रसिद्ध झाले आहे. काही पळून आलेले आमदारही हे आकडे जाहीर करीत आहेत. पण अशा पद्धतीने सरकार पाडणे म्हणजे लोकशाहीचा व राज्यघटनेचा गळा आवळण्यासारखेच आहे. केंद्रातील भाजप सरकार सत्ता मिळविण्यासाठी कुठल्याही थराला जाऊ शकते आणि कायदा धाब्यावर बसवून मनमानी पद्धतीने व हुकूमशाही तंत्राद्वारे सत्ता काबीज करू शकते हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. भाजपला विरोधी पक्षच देशात नको आहे हे लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्य, सार्वभौमत्व यावरील मोठे शंका आहे. एकजुटीने आपल्याला त्याचा प्रतिकार करावा लागेल.

नव्याचे नऊ दिवस संपले की, भाजप आपला रंग दाखवायाला सुरुवात करेल यात शंका नाही. फितूर झालेले शिंदे आणि फडणवीस तुम्हाला त्यांचा दास बनवतील. भाजप धार्जिणे धोतर परिधान करून हिंदूत्वाचा आव आणणारे राज्यपाल देखील या फितूरांना सामील आहेत. ही गोष्ट देखील जनतेपासून लपून राहिलेली नाही. राज्यपाल हे संविधानीक पद असून, तो कोणत्याही पक्षाचा नसतो. मात्र राज्यपाल भगत सिंह कोश्यारी आल्यापासून सगळेच बदलले आहे. आता येणारा काळच या आमदारांचे भवितव्य ठरवेल. भाजपने बंडखोर आमदारांना फितूर करुन आपल्या पक्षात ओढून नेले आहे. मात्र आगामी निवडणुकीत यांची भाजप कशी हालत करेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.



**कोण आहेत प्रा. हरी नरके?**

हरि नरके हे मराठी लेखक, अभ्यासू संशोधक वक्ते आणि मराठी ब्लॉगर आहेत. पुणे विद्यापीठात प्राध्यापक आहेत. पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संस्थेवर ते उपाध्यक्ष आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

■■

# भाजपची वाटचाल 'विरोधी



महाराष्ट्रातले सत्तांतर ही राष्ट्रीय घटना बनली. यात नाट्य होते, थरार होता, रहस्य होते, बंड होते, पैसा होता आणि निष्ठा व भूमिका बदलणारी पात्रे होती. या नाट्याला स्वल्पविराम मिळाला तो भाजप श्रेष्ठींच्या धक्का तंत्राने ! पण ही पिक्चरची खरी सुरूवात मानली जाते. या घडामोडीने देशाचे सारे लक्ष महाराष्ट्राकडे वेधले गेले. त्यात राष्ट्रपती पदाचे उमेदवार, त्यांचे नामांकन मागे पडत गेले, झाकाळून गेले.

या घडामोडी महाराष्ट्रापुरत्या मर्यादित नाहीत, त्या मागे एक सूत्र आहे, धोरण आहे आणि भाजपचा आक्रमक विस्तारवाद आहे हे विरोधी पक्षाने ओळखले आहे. त्याप्रमाणे आगामी काळात डावपेच आखले जातील. जे मैदानात आहेत ते 'रणछोडदास' ठरणार नाहीत, त्यांना ते राजकीयदृष्ट्या परवडणारही नाही.

'काँग्रेस मुक्त' भारतानंतर 'विरोधी पक्ष मुक्त' भारत करण्याची मोहिम भाजपने छेडली आहे. त्यासाठी 'घराणेशाही'वर त्याने आपला हल्ला तीव्र केला आहे. कारण भाजपच्या विस्तारवादात खरा अडसर प्रादेशिक पक्षांचा आहे. भाजपचे 'हिंदुत्व' कार्ड त्यांना कमजोर करू शकत नाही हे पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आंध्र, तेलंगणा, बिहार, झारखंड, ओरिसा, दिल्ली, पंजाब आदी राज्यांनी दाखवून दिले आहे तर कर्नाटक, राजस्थान, महाराष्ट्र आदी राज्यात भाजपची सत्तेसाठी दमछाक होताना दिसते.

प्रादेशिक पक्षांच्या 'घराणेशाही'वर हल्लाबोल करणाऱ्या भाजपने पाच प्रादेशिक पक्षांच्या सहाय्याने आपला विस्तार केला. याचे ढळढळीत उदाहरण महाराष्ट्र, बिहार,

# पक्ष मुक्त' भारताकडे


**व्यंकटेश केसरी**
ज्येष्ठ पत्रकार, नवी दिल्ली



**महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचा प्रयोग हा राष्ट्रीय स्तरावर आगामी काळात होणाऱ्या अशा सरकारच्या प्रयोगाची नांदी समजली जाते. उद्धव ठाकरे यांचे सरकार भले आता पाडण्यात आले तरी गैर भाजप सरकार वाचविण्याचे प्रयोग आता थांबणार नाहीत. महाराष्ट्राच्या सत्तांतरात भाजपने, या पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने पक्षांतर बंदी कायद्याची उघडपणे ऐशीतैशी केली. प्रलोभने दाखविली, गैरव्यवहारात अडकलेल्यांना अभय दिले, शिवसेनेतील फुटीरांना मुख्यमंत्रीपद दिले आणि राज्याच्या विकासापेक्षा सत्तेचे राजकारण महत्त्वाचे आहे दे देशाला दाखवून दिले. महाराष्ट्राला स्थिर सरकार द्यायचे असते तर भाजपचा मुख्यमंत्री झाला असता. कारण या पक्षाकडे सर्वाधिक आमदार आहेत. पण हे पद शिवसेनेतील फुटिरांना दिले आणि त्यांना भाजप आता हाताच्या बोटावर नाचवेल.**

# खुज्या नेत्यांना ताकद देण्याचे भाजप हायकमांडचे धोरण

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री टी अंजय्या यांचा काँग्रेस श्रेष्ठींनी जाहीरपणे पाणउतारा केला. त्यातून आंध्राची अस्मिता फुलली, तेलगू देशम पार्टीचा जन्म झाला आणि काँग्रेसच्या एकछत्री अंमलाला आव्हान मिळाले. पण महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजप हाय कमांडने जाहीरपणे दरडावले /फटकारले पण त्याची प्रतिक्रिया या पक्षात उमटली नाही. पक्षाबाहेरच्या लोकांनी सहानुभूती व्यक्त केली याचा अर्थ काय? भाजप हाय कमांडला दुसरा प्रमोद महाजन तयार करायचा नाही, असा आहे. कारण महाराष्ट्रातून नवे नेतृत्व तयार झाले तर आपल्याला धोका आहे हे ते जाणून असल्याने महाराष्ट्रासकट इतर राज्यात खुज्या नेत्यांना ताकद देण्याचे भाजप हाय कमांडचे धोरण आहे. म्हणून गुजरात, हरियाना, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, गोवा या राज्यात 'होयबा' मुख्यमंत्री दिसतात. पण उत्तर प्रदेश ही त्यांची मजबुरी आहे. योगी आदित्यनाथ यांना हात लावला तर दिल्लीतील आपले स्थान डळमळीत होईल आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा दोन जागेवरून लढावे लागेल हे त्यांना पक्के ठावूक आहे.


टी अंजय्या



पंजाब, हरियाणा, आसाम, पश्चिम बंगाल, कर्नाटक या राज्यात पाहायला मिळते. शिवसेना, समता पार्टी/जनता दल (युनायटेड), शिरोमणी अकाली दल, इंडियन नॅशनल लोकदल, आसोम गण परिषद, तृणमूल काँग्रेस, जनता दल (सेक्यूलर) यांची साथ नसती तर या राज्यांत भाजप कुठे राहिली असती? पण प्रादेशिक पक्षांचा शिडीसारखा वापर केल्यानंतर त्यांच्या मूळावर भाजपच्या नव्या दमाचे सेनापती उठले आहेत. त्यामुळे या पुढच्या काळात निवडणुका चुरशीच्या होतील. हिंदुत्वावरुन निवडणुका जिंकता येत नाहीत हे लक्षात आल्यानंतर राजकीय विरोधकांच्या विरोधात ई.डी., इन्कमटॅक्सचे हत्यार उपसण्यात आले. ज्यांनी शरणागती पत्करली त्यांना अभय दिले. पण या हत्याराचे भाजपचे हिंदुत्व, त्यांच्या 'विश्वगुरूचे' अपील, चाणक्याचे डावपेच याच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत. हा पक्ष सत्तेत असताना लोकांचे मुख्य प्रश्न – रोजगार, महागाई नियंत्रण सोडवू शकत नाही, त्याच्याकडे विकासाचे 'व्हिजन' नाही, सुडाचे राजकारण करतो हे लोकांना कळून चुकले आहे.

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचा प्रयोग हा राष्ट्रीय स्तरावर आगामी काळात होणाऱ्या अशा सरकारच्या प्रयोगाची नांदी समजली जाते. उद्धव ठाकरे यांचे सरकार भले आता पाडण्यात आले तरी गैर भाजप सरकार वाचविण्याचे प्रयोग आता थांबणार नाहीत.

महाराष्ट्राच्या सत्तांतरात भाजपने, या पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने पक्षांतर बंदी कायद्याची उघडपणे ऐशीतैशी केली. प्रलोभने दाखविली, गैरव्यवहारात अडकलेल्यांना अभय दिले, शिवसेनेतील फुटीरांना मुख्यमंत्रीपद दिले आणि राज्याच्या विकासापेक्षा सत्तेचे राजकारण महत्त्वाचे आहे दे देशाला दाखवून दिले. महाराष्ट्राला स्थिर सरकार द्यायचे असते तर भाजपचा मुख्यमंत्री झाला असता. कारण या पक्षाकडे सर्वाधिक आमदार आहेत. पण हे पद शिवसेनेतील फुटिरांना दिले आणि त्यांना भाजप आता हाताच्या बोटावर नाचवेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपयुक्तता ते शिवसेनेला विधि मंडळात व बाहेर किती कमजोर करतील यावर अवलंबून आहे. त्यात ते कमी पडले तर त्यांच्या बचावासाठी भाजप आपली ताकत खर्ची घालणार नाही, मुदतपूर्व निवडणुका होतील. भाजपच्या जिवावर सत्तेत आलेले शिंदे सरकार एक तर केविलवाणे दिसेल नाही तर भाजपच्या हातातले बाहुले !

महाराष्ट्राची गणना देशातील प्रमुख राज्यांत गणली जाते. आर्थिक, कृषी-औद्योगिक विकासात हे अग्रेसर तर



आहेच पण उत्तर प्रदेशानंतर सर्वाधिक खासदार या राज्यातून लोकसभेत निवडून येतात. या राज्याच्या मुख्यमंत्र्याचे देशात एक स्थान आहे, रुतबा आहे, दबदबा आहे. सबब प्रभावहीन, कणाहीन व्यक्तीला मुख्यमंत्री करण्यावर सत्ताधारी पक्षाचा भर राहात आला आहे. भाजपच्या ---- 'हाय कमांडला' 'होयबा' मुख्यमंत्री पाहिजे. या शिवाय त्यांना मुंबई महाराष्ट्रात आहे हे सलत आहे. महाराष्ट्राचे विभाजन होणार, विदर्भ व मुंबई त्यापासून स्वतंत्र करणार, असा गौप्यस्फोट भाजपच्या एका मंत्र्याने कर्नाटकात केल्याचे वृत्त प्रकाशित झाले आहे. मुंबईचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न २०१४ पासून सुरू आहेत त्याला शिंदे सरकार कसे विरोध करणार !

'सही दिशा, स्पष्ट निती' हे एकेकाळी भाजपचे घोषवाक्य होते, त्याचा खरा अर्थ आता स्पष्ट होताना दिसतो. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यात भाजप आपल्या ताकदीवर निवडून येत नाही कारण येथील बुद्धीवंतांना तो आपला पक्ष वाटत नाही. त्याची व भाजपच्या संस्कृतीतील भिन्नता स्पष्ट दिसते. तर दक्षिणेतील राज्यात भाजप उपरा म्हटला जातो.

भाजपचा महाराष्ट्रातील प्रयोग अंगलट येईल काय? प्रादेशिक पक्षांच्या विरोधातील एलगाराने या पक्षाची उलटी गिनती सुरू होईल काय? दोन व्यक्ती नोकरशहाच्या सहाय्याने हा खंडप्राय देश कसा आणि किती काळ चालवू शकतील या बद्दलचे अदमास राजधानी दिल्लीतील वेगवेगळ्या वर्तुळात बांधले जातात. देवेंद्र फडणवीस यांचा जाहीररित्या पाणउतारा भाजपच्या हाय कमांडने केल्याने या पक्षातील गटबाजी पुन्हा उफाळून वर येईल. ती कर्नाटक, राजस्थानमध्ये तर आहेच पण महाराष्ट्राही त्याला अपवाद राहणार नाही असे दिसते. मुंबईसह इतरत्र होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकातील भाजपची उमेदवारी दिल्लीत ठरेल हा मेसेज कार्यकर्त्यांना मिळाला आहे.

■■




# लोकसभेला मोदी कार्डावर महाराष्ट्रात विसंबून राहणे धोक्याचे

गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आदी राज्यात निवडणुकांना सामोरे जाताना भाजपला मित्र पक्षांची गरज लागत नाही, तोंडी लावायला काहिंशी हा पक्ष निवडणूकपूर्व युती करतो. पण महाराष्ट्र, बिहार, तामिळनाडू या राज्यात हा पक्ष आपल्या पायावर अजूनही उभा राहात नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सारखे उत्तुंग व्यक्तीमत्व, अमित शहा यांच्यासारखे चाणक्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कमिटेड व्हेंडर असताना महाराष्ट्रात लोकसभा, विधान सभेच्या निवडणुकात युती करण्यासाठी यांत मित्र पक्ष लागतात यावरून या पक्षाचा पाया अजूनही तकलादू कसा ते दिसते. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकांत भाजपने शिवसेनेशी युती केली. त्यानंतर झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत एकदा तोडली व दुसऱ्यांदा आपण मेहरबानी करतो या आर्विभावात केली. याचा अर्थ स्पष्ट आहे. लोकसभा निवडणुकीत मोदी कार्डावर महाराष्ट्रात विसंबून राहणे धोक्याचे आहे याची जाणीव भाजप हाय कमांडला आहे. शिवसेनेने पानवाले, टपरीवाले, नाकेवाले, रिक्षावाले, दारुवाले, गुन्हेगार, तडीपार गुंड, सिक्युरिटी गार्ड व अशा अनेकांना म्हणजे 'गावावरून ओवाळून टाकलेल्या अनेकांना' मंत्री, मुख्यमंत्री व आमदार, खासदार केले; पण भाजप अजूनही तळागाळापर्यंत पोहोचू शकली नाही. शहरी पाया असलेल्या भाजपला ग्रामीण भागात व खेडोपाडी अजूनही पाहिजे तसा जनाधार प्राप्त झालेला नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील मतांसाठी ते शिवसेनेला हाताशी धरत आले. पण आता शिवसेनेलाही कात्रजचा घाट दाखवून स्वतःचा सवता सुभा बंडखोर शिंदे गटाच्या मदतीने उभा करण्याचा प्रयत्न भाजपे नेते करणार आहेत. पण त्यांचा हा हेतू कट्टर, स्वाभिमानी व कडवे शिवसैनिक किती यशस्वी होऊन देतील हा प्रश्नच आहे. हे शिवसैनिक बंडखोर नेत्यांना सळो की पळो करून सोडतील हे आपल्याला लवकरच पाहायला मिळेल.



भारताच्या जडणघडणीतील एक महत्वाचे व्यक्तिमत्व, अर्थात गोपाळ गणेश आगरकर यांच्या जयंतीनिमित्त येत्या १४ जुलै रोजी तब्बल १६६ वर्षे पूर्ण होणार आहेत. आज आपण ज्या समाजात रहातो त्या समाजाच्या निर्मितीची मुळे आगरकर यांच्या विचारांत आणि कार्यांत दिसतात. आजच्या समाजाचा स्वतंत्र, विकसनशील, प्रगत आणि आधुनिक समाजाचे भाग असणारे आपण सर्व लोक त्यांचे ऋणी आहोत.








१४ जुलै १८५६ ला सातारा जिल्ह्यातील एका लहानश्या गावी, टेंभू येथे गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण तसे हलाखीतच गेले. घरची परिस्थिती बेताचीच असली तरीही शिक्षणाची विशेष गोडी असणाऱ्या आगरकरांनी विशेष प्राविण्य आणि शिष्यवृत्तींच्या जोरावर आपले एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण हीच बदलाची जननी आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांचे वाचन अफाट होते. भारतीय तसेच अनेक पाश्चात्य साहित्यिकांचे साहित्य त्यांनी वाचले होते. त्याचमुळे त्यांच्या विचारातील पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक सुधारणांतूनच देशात बदल घडवणे आणि देशास स्वातंत्र्य मिळवून देणे शक्य आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

डेक्कन कॉलेजमधून एम.ए. करत असतानाच त्यांची भेट टिळक यांच्याशी झाली. विचारांच्या आदानप्रदानातून या भेटींचे पर्यावसन घट्ट मैत्रीत झाले. जनकल्याण आणि समाज-सुधारणेचा वसा हाती घेत त्यांनी देशोन्नतीचा मार्ग स्वीकारला. याचीच पहिली पायरी म्हणजे 'न्यू इंग्लिश

# गोपाळ गणेश आगरकर

## आधुनिक समाजाची पायाभरणी करणारे व्यक्तिमत्त्व

**थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या १६६ व्या (१४ जुलै) जयंतीनिमित्त विशेष लेख. भारताच्या जडणघडणीतील एक महत्वाचे व्यक्तिमत्व, आज आपण ज्या समाजात रहातो त्या समाजाच्या निर्मितीची मुळे आगरकर यांच्या विचारांत आणि कार्यांत दिसतात. आजच्या समाजाचा स्वतंत्र, विकसनशील, प्रगत आणि आधुनिक समाजाचे भाग असणारे आपण सर्व लोक त्यांचे ऋणी आहोत.**

- गार्गी राऊत








स्कूल' या शाळेची उभारणी होय. या कार्यातील विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे योगदान देखील थोर तरुण पिढीस सुशिक्षित, सक्षम आणि सज्ञानी बनवणे तसेच त्यांच्यात देशप्रेमाचे बीज रुजविण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या या शाळेची स्थापना १ जानेवारी १८८० रोजी झाली. टिळक, आगरकर आणि चिपळूणकर यांच्या कल्पनेतून साकारलेली न्यू इंग्लिश स्कूल मोरोबादादा यांच्या वाड्यात सुरु झाली. शे– दीडशेची विद्यार्थी संख्या कालानुक्रमे वाढतच गेली. सुरुवातीला केवळ पाचवी, सहावी आणि सातवी इतके मर्यादित स्वरूप असणाऱ्या शाळेचा विस्तार वाढत गेला.

त्यातूनच पुढे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' आणि 'फर्ग्युसन' महाविद्यालयाची स्थापना झाली. आगरकर यांना अध्यापनाची विशेष गोडी. ते स्वतः 'न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. देशाची भावी पिढी घडवण्याच्या कार्यात त्यांनी मोलाचा हातभार लावला. ते इतिहास मोठ्या रंजक पद्धतीने शिकवत तसेच त्यातून देशप्रेम, देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा यांसारख्या राष्ट्रविकासास उपयुक्त बाबींची



विद्यार्थ्यांत रुजवण करीत.

टिळक आणि आगरकर यांनी केवळ शाळेवरच समाधान मानले नाही तर आता त्यांच्या डोक्यांत नवनवीन कल्पना जोर धरू लागल्या. सामाजिक प्रश्न आणि समाज सुधारणांची गरज तसेच महत्व या गोष्टी व्यापक पातळीवर मांडण्यासाठी आणि सामान्य नागरिकास या कार्यात सामावून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी वृत्तपत्र काढायचा निर्णय घेतला. समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठीचे सर्वोत्कृष्ट माध्यम म्हणजे वृत्तपत्र होय त्यामुळे 'मराठा' आणि 'केसरी' यांच्या माध्यमातून समाज सुधारणेचे कार्य सुरु झाले. देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती, विविध तत्कालीन घडामोडी आणि त्यावरील भाष्य, इंग्रजांची राजनीती, देशप्रेमाने भारलेले विचार आणि देशाच्या विकासातील जनसामान्यांचा सहभाग, समाजावरील टीका–टिपण्णी तसेच विविध घटनांचा उहापोह या आणि अश्या अनेक विषय या वृत्तपत्रांमध्ये हाताळले जात होते. 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकाची जबाबदारी टिळक यांच्याकडे होती तर 'केसरी' या मराठी वृत्तपत्राचे कामकाज आगरकर पहात होते. स्पष्ट, मार्मिक आणि परखड लेखणीच्या जोरावर केसरी वृत्तपत्र लवकरच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. या वृत्तपत्राच्या माध्यमाने आगरकर यांनी समाजातील चुकीच्या रूढी– अंधश्रद्धा यावर हल्ला चढवून समाजात बौद्धिक प्रबोधन घडवून आणले. त्यांचे विचार समाज परिवर्तनास कारणीभूत ठरले. अनेक मंडळी आगरकर यांना येऊन मिळाली आणि अशाच पद्धतीने केसरीतून विविध विषयांना हात घालत लोकशिक्षणाचे कार्य विस्तृत पातळीवर सुरु झाले. 'केसरी'च्या माध्यमातून आगरकर लोकांच्या हाता–पायांतील बेड्या सोडवत आणि त्यांच्या बुद्धीला लागलेली जळमटे साफ करत. सामन्यांच्या डोळ्यांवरील तर्कहीन अंधश्रद्धांच्या पट्ट्या सोडवत समाज उद्बोधानाचे कार्य करत होते. टिळक देखील 'मराठा' साप्ताहिकाच्या माध्यमातून पत्रकारिता करीत होते.

पुढे पुढे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'मध्ये दोन मत प्रवाहांतून गट पडले. यामध्ये आगरकर हे सुधारणावादी दृष्टीकोनातून विचार करणारे तर टिळक हे सनातन विचारसरणीचे. रखमाबाई प्रकरण, हुजूरपागेतील फिमेल हायस्कूल शिक्षण उपक्रम, स्त्री–पुरुषांना एकच आणि एकत्र शिक्षण, संमती वयाचा कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा, बालविवाहविरोधी कायदा अश्या विषयांतून दोन गटांमध्ये खटके उडू लागले. सनातनवादी गटास भारताच्या अंतर्गत बाबी तसेच धार्मिक बाबींमध्ये ब्रिटीशांची ढवळाढवळ मान्य नव्हती. सुधारणावादी गटातील आगरकर आणि इतर सदस्यांचा याकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा होता. त्यांच्या मते भारतीय समाजास प्रबोधनाची आवश्यकता आहे. हे केवळ समाज परिवर्तनातून आणि सामाजिक सुधारणांतूनच शक्य आहे. या बाबी आपोआप होत नाहीत तर त्या घडवून आणाव्या लागतात. जनजागृती हा त्याचा पहिला टप्पा असला तरी कायदे केल्याशिवाय त्या बदलांची समाजात




अंमलबजावणी होणे अवघड आहे. सरकारी कायद्यान्वये सामाजिक सुधारणा घडवून आणणे शक्य असल्याची बाब आगरकरांच्या लक्षात आली होती. कायद्याने केलेली सक्ती हि समाजात बदल घडवून आणू शकते त्यामुळे या पद्धतीचा सरकारी हस्तक्षेप आवश्यक असल्याची भूमिका ते मांडतात.

टिळकांना सामाजिक सुधारणा या महत्वपूर्ण वाटत होत्याच मात्र इंग्रजांविरुद्ध सर्व भारतीयांनी संघटित होऊन संघर्ष देणे आणि देशास स्वातंत्र्य मिळवून देणे ते त्यांचे प्रथम ध्येय होते. आगरकर यांना सामाजिक सुधारणा हि स्वातंत्र्याची पहिली पायरी वाटत होती तर सुधारणांशिवाय मिळालेले स्वातंत्र्य किती काळ टिकेल याविषयी ते साशंक होते. ध्येय समान असले तरीही विचारसरणीतील फरकांमुळे या दोन गटातील मतभेद वाढीस लागले. त्यामुळे 'केसरी' चे कार्य थांबवून त्यांनी 'सुधारक' हे नवीन वृत्तपत्र सुरु करायचा निर्णय घेतला. १८८८ रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर 'सुधारक'चा श्री गणेशा केला. 'सुधारक'च्या माध्यमातून



आगरकरांनी आपले देशकल्याणाचे आणि सुधारणांचे कार्य अखंड चालू ठेवले. त्यांची परखड वाणी आणि समाजातील दोषांवर अचूक बोट ठेवण्याचे कौशल्य तसेच निर्भीड टीका-टिप्पणी यांमुळे समाज मनावर परिणाम होत असे. अविनाश कोल्हे आपल्या आगरकर चरित्रात आगरकरांचे विचार मांडताना नमूद करतात, आगरकर यांनी उच्चवर्णीय हिंदुंच्या दांभिकतेवर नेमके बोट ठेवले. एका बाजूने स्वतःला गोऱ्या साहेबांच्या तोडीचे समजणारे उच्चवर्णीय हिंदू स्वतःच्या समाजात मात्र शेकडो वर्षांपासून दलितांना छळत आलेले आहेत. साहेब अस्पृश्यता पाळत नव्हता, तरी उच्चवर्णीयांना गुलामगिरीचा त्रास होत होता. साहेब इंग्रजी शिक्षण देत होता, प्रसंगी नोकऱ्या सुद्धा देत होता. तरी त्यांच्या सत्तेविरुद्ध उच्चवर्णीय कुरकुरत होते., तक्रारी करत होते. उच्चवर्णीय हिंदू दलितांना गुलामासारखे वागवत होते. शिक्षण नाही, आर्थिक उन्नतीच्या संधी नाहीत, असे असून उच्चवर्णीयांच्या मनात काही तुरळक अपवाद वगळता पाझर फुटला नव्हता. तेच उच्चवर्णीय मात्र साहेबाच्या सत्तेविरुद्ध तक्रारी करायला सर्वात पुढे! यातील विसंगती आगरकर यांना मान्य नव्हती.' हिंदू धर्मातील स्पृश्या-अस्पृश्याची कल्पना, जातीची उतरंड, कर्मकांड व अनिष्ट रूढी-परंपरा या आगरकर यांना अमान्य होत्या. व्यावसाईक भिन्नतेतून जन्मास आलेल्या जातीच्या विभागण्या समाजकल्याणास मारक असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. धर्म व जातीच्या राजकारणातून समाजात पडलेली फुट, शैक्षणिक मागासलेपण, धर्मांधता आणि त्यातून येणाऱ्या अनिष्ट प्रथांचा विषारी विळखा, इंग्रजांकडून होत असलेले शोषण, आर्थिकदृष्ट्या मागास समाज या आणि अश्या अनेक बाबी पारतंत्र्यास कारणीभूत आहेत. या सगळ्याची चर्चा ते 'हिंदुस्थानास क्षय लागला' यातून करतात. ज्ञान, शिक्षण, सामाजिक सुधारणा, परिवर्तन हीच स्वातंत्र्यसमरातील खरी शास्त्रे आहेत असे आगरकरांचे स्पष्ट मत होते.

स्त्री शिक्षणाची गरज आणि त्यातून होणाऱ्या विकासाची आस आगरकर यांना होती. स्त्रियांच्या दयनीय परिस्थितीस त्यांचे बालविवाह, सती प्रथा, केशवपन प्रथा, शिक्षणापासून वंचितता तसेच पतीवरील परावलंबत्व कारणीभूत असल्याचे विधान त्यांनी केले. स्त्री विकासाशिवाय समाज विकसनशील होणार नाही याची त्यांना कल्पना होती. या बाबी लक्षात घेऊन स्त्री पुरुष यांना एकाच पद्धतीचे आणि एकत्र शिक्षण देण्याची कल्पना त्यांना सुचली. त्याच बरोबर स्त्रियांना चरितार्थासाठी उपयोगी पडेल



असे शिक्षण देण्याविषयी ते आग्रही होते. ज्या काळात स्त्रियांचे शिक्षण हे धर्म बुडविण्याचे कार्य मानले जात होते त्या काळात इतक्या आधुनिक विचारसरणीचे हे व्यक्तिमत्व क्रांतीची मशाल घेऊन समाजकार्य करीत होते.

आगरकर हे केवळ एक समाजसुधारक नव्हते तर त्यांनी विविध विषयांचा सखोल अभ्यास केलेला होता. भाषाशास्त्रापासून ते भाषांतरापर्यंत विविध क्षेत्रातील त्यांचे योगदान मौल्यवान आहे. भाषा आणि संवादाचे मूळ हे वाक्य आहे. अर्थपूर्ण शब्दसमूहाने वाक्य निर्मिती होते आणि त्यायोगे विचारांचे आदान-प्रदान करणे शक्य असल्याचे ते नमूद करतात. आगरकर यांनी डोंगरीच्या तुरुंगात शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे मराठीत 'विकारविलसित' या नावाने भाषांतर केले. जास्तीत जास्त मराठी वाचकांना साहित्याचा आस्वाद घेता यावा हेच त्यामागील उद्दिष्ट होय.

आगरकर यांनी धर्माचा बारकाईने अभ्यास केला होता,याची प्रचीती त्यांचा लेख 'आमचे काय होणार?' यातून होते. यामध्ये ते तत्कालीन समाजाचे चित्र उभे करतात त्याच बरोबर समाजास उपयुक्त बदलांचे स्वरूप, त्यांची गरज यांविषयी चर्चा करतात. आधुनिक विचारप्रणाली



आणि कल्पनांच्या जोरावर उभ्या राहणाऱ्या समाजाची रचना कशी असेल या विषयी लिहितात. 'देवता' या लेखात ते 'देव' या संकल्पनेच्या उगमाबद्दल तर्कशुद्ध पद्धतीने विवेचन करतात. तर्कशुद्धता, विज्ञानाधिष्टीत दृष्टीकोन आणि बुद्धिप्रामाण्यवादास त्यांनी सर्वाधिक महत्व दिले.

म.दा.आळतेकर आगरकर यांच्याबद्दल लिहितात,' आगरकर यांनी लेखणीच्या जोरावर एक नवी विचारसरणी महाराष्ट्रात आणली यात शंका नाही; किंबहुना सामाजिक व इतर सर्व व्यवहारांना त्यांनी विचारांची जोड दिली असे म्हणणे रास्त होईल. एखादी गोष्ट चांगली का तर आजपर्यंत चालत आलेली आहे म्हणून, परंपरागत आहे म्हणून; मग तिचे परिणाम सुष्ट असोत की दुष्ट असोत, हा प्रकार त्यांना मान्य नव्हता. जर एखाद्या गोष्टीचे परिणाम दुष्ट असतील, तर ती परंपरागत का असेना टाकून द्यावी आणि एखाद्या गोष्टीचे परिणाम कल्याणकारक आहेत, तर मग ती नवीन असली, परंपरेच्या बाहेर असली, तरीसुद्धा तिचा स्वीकार करावा, अशी आगरकर यांची शिकवण आहे.' संस्कृतीतील उद्धारक गोष्टींबरोबरच पाश्चात्यांच्या संस्कृतीतील चांगल्या बाबींचे अनुकरण करण्यास त्यांचा पाठींबा होता. पाश्चात्य संस्कृती, तेथील इतिहास,तेथील समाजात घडून आलेली क्रांती व समाजसुधारणा, आधुनिक विचारमुल्ये यांच्या अभ्यासाने आपला समाज देखील प्रगतीपथावर चालू लागेल असा विश्वास त्यांच्या ठायी होता. त्यांच्या या पद्धतीच्या विचारसरणीस बराच विरोध झाला. अगदी त्यांच्या समोरून त्यांची प्रेतयात्रा काढण्यापर्यंत लोकांची मजल गेली. परंतु या विरोधास न जुमानता समाजाच्या उन्नतीसाठी ते लढत राहिले.

१८९४ पासूनच आगरकर यांची प्रकृती ढासळू लागली तरी देखील प्राचार्य म्हणून फर्ग्युसन कॉलेजचे कामकाज ते पार पाडत होते. अखंड कार्यभार आणि साथ देत नसलेली प्रकृती यामुळे अखेर १७ जून १८९५ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. १९३८ मध्ये 'स्त्री' मासिकात यशोदाबाई गोपाळराव आगरकर यांनी आगरकर यांनी सांगितलेल्याआठवणींवर लेख लिहिला. आजच्या आधुनिक समाजाची पायाभरणी करणारे थोर व्यक्तिमत्व म्हणून आगरकर यांचे नाव इतिहासात सोनेरी अक्षरात लिहिले गेले.

■■

सरकारने विरोधाला न जुमानता ही योजना सुरु ठेवलेली असली तरी काही सेनाधिकाऱ्यांनी मात्र उघडपणे त्याला विरोध केला आणि या योजनेतील त्रुटींवर कटाक्ष केला. या योजनेचा अधिकृत पुरस्कार आणि प्रचार तसेच समर्थन करण्यासाठी तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या तोंडून काही वावगे जाऊ नये यासाठी संरक्षणमंत्री राजनाथसिंग हेही या पत्रकार परिषदेला उपस्थित राहिले. या पत्रकार परिषदेबाबत प्रतिक्रिया देताना एका लष्करी अधिकाऱ्याने चक्क म्हटले की राजनाथसिंग यांच्या चेहऱ्यावर आत्मतुष्टतेचे(कसे तिन्ही सेनाप्रमुखांना पत्रकार परिषद घ्यायला लावले) असे भाव होते. त्यात दंभ दिसला तर तिन्ही सेनादलप्रमुख मात्र भांबावलेले आणि अवघडलेले दिसून आले. सेनादलांचे प्रमुख पद भूषविणाऱ्या या उच्चाधिकाऱ्यांना चक्क लिखित निवेदन वाचून दाखविण्यास सांगण्यात आले आणि माध्यमांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील त्यांनी लिखित स्वरुपात वाचून दाखवली. संरक्षण सचिवांनी तर तोंडही उघडले नाही.

# अग्निपथ योजना :
## आगीशी खेळ की सेनेच्या अस्तित्वावरच आघात?

अगस्त्य दास









सैन्यदलात ‘अग्निपथ’ किंवा ‘अग्निवीर’ नावाने एक भरती योजना राबविण्यात येत आहे. या विरोधात उत्तर प्रदेश, बिहार, हरयाना यासारख्या मोठ्या राज्यांसह अनेक राज्यांमधील युवक या योजनेच्या विरोधात केवळ रस्त्यावरच उतरले नाहीत तर त्यांच्या निषेध आंदोलनाला ठिकठिकाणी हिंसक वळणही लागले. सरकारी मालमत्तांवर त्यांचा विशेष कटाक्ष राहिला होता. म्हणजेच त्यांच्या तीव्र अशा रागाचे एकमेव लक्ष्य केंद्र सरकार होते. या नोकरीसाठी आतुरलेल्या युवकांना एवढा राग येण्याचे कारण काय होते ? त्यांच्या रागाचे स्वाभाविक कारण





या नोकरीच्या स्वरुपात होते. सामान्य भाषेत या नेकरीचे वर्णन करायचे झाल्यास ते असे .......! आता जी भरती केली जाणार आहे त्या भरतीतून उत्तीर्ण झालेल्यांना तिन्ही सेनादलांमध्ये नोकरी मिळेल. सेनादलाची नोकरी ही सामान्य नोकरी नसते आणि त्यासाठी विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण प्राप्त करावे लागते. त्यानुसार या उत्तीर्ण युवकांना प्रशिक्षित केले जाईल. परंतु त्यांचे प्रशिक्षण आणि त्यानंतर केवळ चार वर्षेच नोकरीत ठेवले जाणार आहे. चार वर्षांनंतर या सर्व युवकांची चाचणी किंवा परीक्षा घेतली जाईल आणि त्यातून केवळ पंचवीस टक्के युवकांनाच कायम ठेवले जाईल आणि उर्वरित ७५ टक्के प्रशिक्षित युवकांना चक्क नोकरीतून बाहेर करण्यात येणार आहे. केवळ ११ लाख रुपयांची ग्रॅच्युईटि तोंडावर फेकून या युवकांना नोकरी-बाहेर केले जाणार आहे. त्यांना सेवानिवृत्तीचे कोणतेही लाभ नाकारण्यात आले आहेत. त्यांना चार वर्षांचा सेनादलांमध्ये कामाचा जो अनुभव प्राप्त होईल त्या आधारे त्यांना कोणतीही नोकरी मिळू शकेल अशी अत्यंत बेजबाबदार, बेमुर्वतखोर आणि मस्तवाल विधाने भाजपच्या नेत्यांनी यासंदर्भात केलेली आढळतात. पूर्वी सेनादलातील जवान श्रेणीसाठी साडेसतरा ते एकवीस वयोगटातील युवकांना भरती केले जात असे. तीच वयोमर्यादा या योजनेसाठीही कायम ठेवण्यात आली. परंतु करोनामुळे दोन वर्षे भरतीच बंद असल्याने त्या वाया गेलेल्या दोन वर्षांचा विचार करुन सरकारने वयोमर्यादेत सवलत देण्याची युवकांची मागणी होती. निगरगट्ट व कोडग्या सरकारने प्रथम त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु युवकांच्या संतापाचा विस्फोट होताना दिसल्यावर ही वयोमर्यादा शिथिल करुन तेवीस वर्षे करण्यात आली. या बाबी लक्षात घेतल्यास तेवीस वर्षाच्या युवकास भरतीनंतर केवळ चार वर्षांचा कालावधीच मिळणार असेल तर सत्तावीसाव्या वर्षी तो पुन्हा बेकार होणार आहे. म्हणजेच त्याच्या डोक्यावर अनिश्चिततेची तलवार

ही टांगतीच राहणार आहे. त्यावेळी ११ लाख रुपयांची ग्रॅच्युईटि त्याला कितीकाळ दिलासा देऊ शकणार आहे हा मुद्दा विचारात घ्यावा लागेल. म्हणजेच चार वर्षांनंतर सरकार त्यांना नोकरीतून काढून टाकणार आहे. अशा अनिश्चित परिस्थितीत कोणता युवक हा चार वर्षांचा जुगार खेळेल आणि आपले आयुष्य पणाला लावेल ? परंतु केंद्र सरकारने जराही किंवा तसूभरही पाऊल मागे घेण्याचे नाकारले. मात्र युवकांना नाराज करायला नको म्हणून वेगवेगळ्या प्रकारची मधाची बोटे लावण्याचे प्रकार सुरु करण्यात आले. त्यामध्ये प्रचाराचा भाग अधिक होता. सरकारने

माजी नौदल प्रमुख तसेच इतरही अनेक वरिष्ठ माजी सेनाधिकाऱ्यांनी या योजनेबाबत प्रतिकूल मत व्यक्त केले. परंतु हल्लीच्या राजवटीत विधायक विरोधही शत्रुत्वासारखा मानला जातो आणि तशी मते व्यक्त करणाऱ्यांवर पाळीव सरकारी यंत्रणांना सोडले जाते व प्रतिकूल मत व्यक्त करणाऱ्यांना सळो की पळो केले जाते. त्यामुळे बडेबडे अधिकारी देखील मौन पाळणे पसंत करतात अशी दहशत निर्माण करण्यात आली आहे. परंतु बेरोजगार व बेकार युवकांनी असल्या दहशतीला न जुमानता निषेध आंदोलन केले. त्यानंतर सरकारने नमते घेत असल्याचा देखावा केला





त्यांच्या मित्र असलेल्या भांडवलदारांकडून म्हणजेच बड्या उद्योगपतींकडून या योजनेची प्रशंसा सुरु केली. सरकारकडे जशी पाळीव माध्यमे आहेत तसेच पाळीव उद्योगपति देखील आहेत. त्यांनी या योजनेचे कौतुक करतानाच चार वर्षांनंतर लष्करी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या युवकाला नोकरी देण्याची हमी या पाळीव उद्योगपतींनी देण्यास सुरुवात केली. एका माजी सेनाप्रमुखांनी तर महिंद्रा आणि महिंद्रा उद्योगाच्या प्रमुखांना जाहीरपणे प्रश्न करुन त्यांनी यापूर्वी अशा निवृत्त लष्करी जवानांना नोकऱ्या दिल्या त्याची माहिती जाहीर करावी असे आव्हान दिले.

आहे. त्यानुसार चार वर्षांनंतर नोकरी गेलेल्या युवकांना निमलष्करी दले, पोलिस, अन्य सुरक्षा यंत्रणांमध्ये सामावून घेण्याबाबत आरक्षणाची तरतूद करण्याचे आश्वासन देण्यात आले. अशा अनेक आश्वासनांनंतर युवकांनी त्यांचे आंदोलन तूर्तास मागे घेतल्याचे दृष्य दिसत आहे. त्याचबरोबर तिन्ही सेनादलांमध्ये भरतीची प्रक्रियाही पुन्हा सुरु करण्यात आली आहे. सत्तेची नशा व घमेंड माणसाला किती खालच्या थरावर नेऊ शकते याचे दर्शन या युवकांच्या आंदोलनावर ज्या भाजपनेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या त्यावरुन स्पष्ट झाले. मध्य प्रदेशातील भाजपचे एक मोठे नेते व राष्ट्रीय सचिव कैलास


विजयवर्गीय यांनी चार वर्षांनंतर बेकार होणाऱ्या युवकांना देशातल्या भाजपच्या कार्यालयांमधील सुरक्षा रक्षकांच्या नोकऱ्या द्यायला आपल्याला आवडेल असे विधान या महाशयांनी केले.तर एका केंद्रीय मंत्री महोदयांनी या बेकार झालेल्या जवानांना विविध मंत्रालयांमध्ये संत्री किंवा दरवाज्यांवरील सुरक्षा रक्षकाच्या नोकऱ्या मिळू शकतात असे विधान केले. ही अत्यंत उर्मट आणि बेमुर्वतखोर विधानांमुळे युवकांमधील संताप अधिकच वाढणे अपरिहार्य होते.



पत्रकार परिषदेत संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांच्यासमवेत तीनही दलांचे प्रमुख

विशेषतः खुद्द सेनादलांमध्येच या विधानाच्या प्रतिक्रिया होऊ लागल्या. आपल्याच बेजबाबदार व सत्तेने मदांध नेत्यांमुळे अडचणीत आलेल्या केंद्र सरकारने तातडीने माघार घेण्यास सुरुवात केली. केंद्रीय गृहमंत्र्यांनी या युवकांना निमलष्करी दलांमध्ये सामावून घेण्याबद्दलचे नियम तयार केले जातील असे आश्वासन दिले.

सरकारने विरोधाला न जुमानता ही योजना सुरु ठेवलेली असली तरी काही सेनाधिकाऱ्यांनी मात्र उघडपणे त्याला विरोध केला आणि या योजनेतील त्रुटींवर कटाक्ष केला. या योजनेचा अधिकृत पुरस्कार आणि प्रचार तसेच समर्थन करण्यासाठी तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या तोंडून काही वावगे जाऊ नये यासाठी संरक्षणमंत्री राजनाथसिंग हेही या पत्रकार परिषदेला उपस्थित राहिले. या पत्रकार परिषदेबाबत प्रतिक्रिया देताना एका लष्करी अधिकाऱ्याने चक्क म्हटले की राजनाथसिंग यांच्या चेहऱ्यावर आत्मतुष्टतेचे(कसे तिन्ही सेनाप्रमुखांना पत्रकार परिषद घ्यायला लावले) असे भाव होते त्यात दंभ दिसला तर तिन्ही सेनादलप्रमुख मात्र भांबावलेले आणि अवघडलेले दिसून आले. सेनादलांचे प्रमुख पद भूषविणाऱ्या या उच्चाधिकाऱ्यांना चक्क लिखित निवेदन वाचून दाखविण्यास सांगण्यात आले आणि माध्यमांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील त्यांनी लिखित स्वरुपात वाचून दाखवली. संरक्षण सचिवांनी तर तोंडही उघडले नाही. या योजनेचा सेनादलांना लाभ होणार आहे. तसेच संरक्षण विभाग व सेनादलांच्या सुधारणांच्या प्रक्रियाचा भाग म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे समर्थन राजनाथसिंग यांनी केले. या योजनेच्या संदर्भात सरकार आणि सरकारचे प्रतिनिधी समर्थनाची भूमिका घेणे क्रमप्राप्त आहे. परंतु काही स्वतंत्र आणि निःपक्ष सेनाधिकाऱ्यांनी देखील या योजनेच्या सरसकट अंमलबजावणीबाबत प्रतिकूलता व्यक्त केली आहे. काही लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अलीकडेच सेवानिवृत्त झालेले लष्कर प्रमुख जनरल एम.एम.नरवणे यांनी ही योजना सुरुवातीला पथदर्शी पध्दतीने(पायलट) राबवून पहावी आणि त्या अनुभवावर आधारित तिची व्याप्ती किती वाढवायची हे ठरविण्यात यावे असे सरकारला


जनरल मनोज नरवणे

सुचविल्याचे समजते. त्यांनी सर्वप्रथम मर्यादित संख्येत म्हणजेच १०० अधिकारी आणि १००० जवानांचा समावेश करुन ती राबविण्यात यावी असे सुचविल्याचे समजते. सरकारने मात्र त्यांचा सल्ला जुमानलेला दिसत नाही.

सरकारने सरसकट जवानभरती सुरु करुन स्वतःचे म्हणणे खरे केलेले दिसून येते. या सार्वत्रिक स्वरुपामुळे योजनेत विचका निर्माण होण्याची शक्यता अधिक असल्याची शंका अनेक वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. काहींनी तर याबाबत थोडी तीव्र स्वरुपाची प्रतिक्रिया व्यक्त करताना 'ही योजना म्हणजे समाजाचे लष्करीकरण करण्याची प्रक्रिया आहे' असे म्हटले. व्यावहारिक

**हिटलर व स्टॉर्मटूपर्स नावाची तरुणांची संघटना**






जनरल बक्षी

पातळीवरील अडचणींचा उल्लेख करताना काही सेनाधिकाऱ्यांनी या योजनेचा काळ चार वर्षांचा असला तरी प्रारंभिक प्रशिक्षण आणि शेवटचा सहा महिन्याचा समाप्तीचा सेवाकाळ लक्षात घेता केवळ अडीच वर्षेच संबंधितांना नोकरीची कालावधी उपलब्ध होणार आहे आणि तो अत्यंत अपुरा आहेच पण या योजनेचे जे काही उद्दिष्ट आहे त्याची पूर्तता देखील यामुळे होणार नसल्याचे मत नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सरकारने सेनादलांवर पगार आणि पेन्शनचा जो अवाढव्य खर्च होतो तो वाचविणे हे एकमेव उद्दिष्ट ठेवून या योजनेचा विचार करु नये असे म्हटले आहे. भाजपचे आणि विशेषतः पंतप्रधानांच्या विविध धोरणांचे भक्त मानले जाणारे निवृत्त जनरल जी.डी. बक्षी यांनी तर या योजनेचे तपशील पाहिल्यानंतर ते 'अवाक्' झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी देखील त्यांच्या प्रतिक्रियेत ही योजना प्रथम प्रायोगिक तत्वावर राबविण्याची त्यांची कल्पना होती असे म्हटले आहे आणि आकस्मिक व अचानकपणे ही योजना सरसकट व सार्वत्रिक पध्दतीने अमलात आणण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाबद्दल अचंबा व्यक्त केला.

अशा पध्दतीने अल्पकालीन मुदतीची सेनादले तयार करणे हा चीनच्या लष्कराच्या धर्तीवर आहे आणि भारतीय सेनेचे रुपांतर चिनी सैन्यासारखे करु नका असे सरकारला विनवले आहे. यामुळे सेनेचे भले होणे दूर परंतु पाकिस्तान व चीनकडून आधीच भारतीय सीमांना धोका असताना अशा प्रकारचे बदल करणे म्हणजे भारतीय सेनेचे अस्तित्वच नष्ट करण्यासारखे आहे अशी अत्यंत तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. जनरल बक्षी हे मोदींचे घोर भक्त व अनुयायी मानले जातात. त्यांनी तर पुढे जाऊन असा इशाराही दिला आहे की सेना प्रशिक्षित या युवकांना चार वर्षांनंतर कुठे नोकरी न मिळाल्यास ते समाजकंटक, दहशतवादी असे काहीही होऊ शकतात. मोदीभक्त जनरल बक्षी यांची ही प्रतिक्रिया असेल तर या योजनेतील संभाव्य धोक्यांची कल्पना केलेली बरी. निवृत्त लेफ्टनंट जनरल विनोद भाटिया यांनी तर सेनादलांचे अस्तित्व नष्ट करणारी ही योजना आहे. प्रायोगिक तत्वावर योजना अमलात न आणता थेट तिची सार्वत्रिक अंमलबजावणी करणे म्हणजे समाजाचे लष्करीकरण करण्याचा हा प्रकार आहे अशीही अत्यंत कडवट प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. लष्कराच्या निवृत्त परंतु वरिष्ठ अशा अधिकाऱ्यांनी या योजनेला विरोध दर्शविताना जे मुद्दे मांडले आहेत त्यामध्ये या योजनेमुळे सेनादलांच्या 'ऑपरेशनल कॉंपिटन्स' म्हणजेच युध्दमोहिमांच्या क्षमतेमध्येच दुर्बळता व कमकुवतपणा

येईल अशी भीती व्यक्त केली आहे. हे मत जवळपास सर्व सेनाधिकाऱ्यांनी समानपणे व्यक्त केल्याचे आढळून येते. याचाच अर्थ या योजनेमुळे सेनादलांची युध्दक्षमता मोठ्या प्रमाणात कमजोर होणार असेल तर ही बाब सेनादलांच्या मुळावर आल्याखेरीज राहणार नाही असा याचा अर्थ होतो. त्यामुळेच एवढी प्रतिकूल मते व्यक्त होऊनही मोदी सरकार ही योजना कोडगेपणाने पुढे रेटण्यामागचे रहस्य काय आहे ? कारण ही राजवट आणि हे राज्यकर्ते कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही योजना विशिष्ट हेतु मनात ठेवून करीत असतात. त्यामागे त्यांची सत्ता या देशात कायमस्वरुपी कशी राहील हा विचार प्रमुख असतो. त्याचे आकलन करणे अनिवार्य ठरते.

वर्तमान राज्यकर्ते आणि राजवटीने सत्तेत आल्यापासून देशातील अनेक महत्वाच्या लोकशाही संस्थांचे अस्तित्व नष्ट केले, काही संस्थांच्या स्वरुपात अमूलाग्र आणि वर्तमान राज्यकर्त्यांना धार्जिण्या राहतील असे बदल केले, तर काही संस्था दुर्बळ व कमजोर केल्या. त्याचप्रमाणे या देशावर आपली सत्ता कायमस्वरुपी रहावी आणि अपघाताने जरी एखादी भिन्न राजवट सत्तेत आली तरी त्या नव्या राजवटीला राज्यकारभार करणे अशक्यप्राय करुन सोडण्यासाठी देशातील सर्व प्रमुख यंत्रणा पोखरुन टाकण्याची मोहिम त्यांनी हाती घेतली आहे. या पोखरलेल्या यंत्रणा व संस्थांमधील वर्तमान राज्यकर्त्यांचे हस्तक नव्या राजवटीला नीटपणे काम करु देणार नाहीत आणि त्यासाठीच ही पोखरण्याची मोहिम सुरु करण्यात आली आहे. या योजनेचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने स्वागत केले आहे ही बाब येथे विशेषत्वाने नमूद करावी लागेल. ही बाब समजून घेतल्यानंतर आता जरा इतिहासावर नजर टाकावी लागेल. जगाच्या इतिहासात आणि सध्याच्या काळात देखील 'पीपल्स मिलिशिया' ही संकल्पना प्रचलित आहे. याचाच अर्थ समाजाचे लष्करीकरण हा होतो. हिटलरने 'स्टॉर्मट्रूपर्स' नावाने तरुणांची संघटना उभारली होती आणि ही संघटना थेट हिटलरला जबाबदार होती. या संघटनेने जर्मनीत दडपशाही आणि दहशत निर्माण केली होती. चीनमध्ये माओ त्से तुंगने देखील 'रेडगार्डस्' ही युवकांचीच संघटना उभारुन आपल्याच पक्षातील तसेच समाजातील विरोधकांची तोंडे बंद करण्यासाठी तिचा वापर केला होता.

चीनमध्ये चिनी लष्कराचे नावच 'पीपल्स लिबरेशन आर्मी' असे आहे. चीनमध्ये आजही अर्धवेळ किंवा अंशतः लष्करी प्रशिक्षण घेतलेल्यांना विशेष दर्जा प्राप्त आहे. त्यामुळेच वर ज्या काही वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांनी मोदी राजवटीच्या या योजनेला विरोध दर्शविला आहे त्यामागे त्यांच्या मनात हा संशय, शंका आहे. आता जी भेसूर किंवा भयावह शंका निर्माण होते ती ही की वर्तमान राजवटीला भारतात अशी काही भीतीदायक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासकीय दहशत निर्माण करणारी संघटना उभारायची आहे काय ? ज्याअर्थी रा.स्व.संघाने या योजनेला पाठिंबा दर्शविला आहे. त्याअर्थी यामागे वर्तमान राजवटीचा हेतु साफ आणि चांगला असावा असे वाटत नाही. त्यामुळेच वरवर जरी वर्तमान सेना प्रमुखांनी त्याचे समर्थन केलेले असले तरी या योजनेच्या हेतुबद्दल शंका कायम राहणार आहेत.



माओ त्से तुंग व त्यांची रेडगार्डस् ही संघटना


राजकीय पातळीवर देखील विरोधी पक्षांनी या योजनेला विरोध केला आहे. रा.स्व.संघासाठी ही योजना आखण्यात आल्याचा थेट आरोप या विरोधी पक्षांनी केला आहे.

वर्तमान राजवटीने त्यांची सत्ता कायमस्वरुपी राहण्याच्या दृष्टीने प्रशासनिक पोखरण आणि त्यांच्या विचारसरणीची माणसे मोक्याच्या ठिकाणी नेमणे हे प्रकार योजनाबध्द रीतीने सुरु केले आहेत. गुजरात केडरच्या अधिकाऱ्यांना मोक्याच्या पदांवर नेमण्यात आले आहे. राज्यसभेच्या महासचिवपदी राज्यसभा सचिवालयातीलच सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्यास बढती देण्यात आली. परंतु राज्यसभा सभापति व उपराष्ट्रपति वेंकय्या नायडू यांनी केलेली ही नेमणूक राज्यकर्त्यांना पसंत पडली नाही. त्यांनी महिन्यातच त्या अधिकाऱ्यास महासचिवपदावरुन हटविले आणि त्यांच्या जागी पंतप्रधानांचे विश्वासू व सीबीडीटीचे संचालक म्हणून निवृत्त झालेले पी.सी.मोदी यांची नेमणूक करण्यात आली. हे मोदीसाहेब महसूल सेवेचे अधिकारी आहेत. त्यांचा संसदेशी तसा थेट संबंध नाही. संसदेत महासचिव पदावर शक्यतोवर कायदा मंत्रालय आणि संसदीय सचिवालयातीलच सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. परंतु सर्वत्र 'आपली माणसे' असली पाहिजेत या अट्टाहासानुसार या पी.सी.मोदी यांची राज्यसभेत वर्णी लावण्यात आली. हे एक उदाहरण आहे. दिल्लीच्या पोलिस आयुक्तपदी देखील गुजरात केडरच्या भारतीय पोलिस सेवेचे अधिकारी व वादग्रस्त ठरलेल्या राकेश अस्ताना यांची नेमणूक करण्यात आली. ही केवळ वानगीदाखलची उदाहरणे आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. सांगण्याचा मुद्दा हा की वर्तमान राजवटीची आणि राज्यकर्त्यांची मनोवृत्ती कशी आहे याचे दर्शन यावरुन घडते. मोक्याच्या पदांवर स्वतःच्या माणसांची वर्णी लावणे आणि कदाचित सत्तेवरुन पायउतार व्हावे लागलेच तर नंतर आलेल्या राज्यकर्त्यांना या माणसांनी सळो की पळो करुन काम करणे अशक्यप्राय करावे या हेतुनेच हे केले जात आहे. यालाच प्रशासन पोखरणे असे म्हटतात. केवळ पोखरण्यापुरता हा खेळ मर्यादित नाही. आपल्या घट्ट विचारसरणीची माणसे पेरुन ठेवणे हाही त्यामागे हेतु असतो. एकाधिकारशाही मनोवृत्तीचे राज्यकर्ते असे खेळ करीत असतात. संसदीय लोकशाही व्यवस्थेत सैन्यदलांना नागरी आणि राजकीय व्यवस्थेपासून अलिप्त राखण्यात येते. भारतात त्याच व्यवस्थेचे अनुसरण यशस्वीपणे करण्यात येत होते. मुलकी किंवा नागरी राजवटीपासून स्वतंत्र आणि विशिष्ट अंतरावर ठेवण्यात आलेल्या सैन्यदलांनी गेल्या पंच्याहत्तर वर्षात आपली युध्दक्षमता सिध्द केलेली आहे. पाकिस्तानला धूळ चारली आहेच पण बांगला देश मुक्तिलढ्यातही भारतीय सेनेने आपले वैशिष्ट्य सिध्द केले. परंतु सेनादलांचे राजकीयकरण करण्याचा प्रकार २०१४ नंतर जाणीवपूर्वक सुरु करण्यात आला होता. त्यातून काय घडले ? ज्या भारत-चीन सीमेवर पंचेचाळीस वर्षांहून अधिक काळ बंदुकीची एक गोळीही झाडली गेली नव्हती आणि शांतता व स्थिरता राखण्यात आली होती त्या सीमेवर वेड्या साहसवादी भूमिकेमुळे चीनने आक्रमक धोरण स्वीकारले आणि गलवान खोऱ्यात भारताच्या वीस जवानांना मृत्युमुखी पडावे लागले. या सर्व गोष्टी फार जुन्या नाहीत. त्या सर्व नुकत्याच घडलेल्या आहेत आणि स्मरणातून गेलेल्या नाहीत एवढ्या ताज्या आहेत. त्यामुळेच वर्तमान राज्यकर्ते व राजवटीने सुरु केलेला हा 'अग्निवीर' किंवा 'अग्निपथ' योजनेचा खेळ हा साधासुधा नाही. तो 'आगीशी खेळ' ठरणार नाही एवढीच आशा !



**गलवान खोऱ्यात चीनच्या सैन्याने मारलेले वीस भारतीय जवान**

# हिंदवी स्वराज्यातील विज्ञान चळवळ



**प्रा.प्रकाश पवार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्री शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

हिंदवी स्वराज्य ही संकल्पना सतराव्या शतकातील होती. तेव्हा मध्ययुग अस्तित्वात होते. मध्ययुग म्हणजे अंधार युग मानले जाते. दुसऱ्या शब्दात तेव्हा वैज्ञानिक ज्ञान नव्हते असा एक सर्वसाधारण अर्थ घेतला जातो. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. तो म्हणजे हिंदवी स्वराज्यात विज्ञान होते की नव्हते? हिंदवी स्वराज्य आणि विज्ञान यांचे संबंध कोणते होते? या प्रश्नाचे उत्तर सविस्तरपणे व चिकित्सक पद्धतीने आजपर्यंत दिले गेले नाही. या प्रश्नाचे सरळ सरळ उत्तर म्हणजे हिंदवी स्वराज्याची संकल्पना विज्ञान चळवळीच्या पायावर आधारित उभी केली होती. विज्ञान चळवळीने हिंदवी स्वराज्याला प्रचंड मोठी ताकद दिली. हिंदवी स्वराज्याच्या प्रत्येक घडामोडींमध्ये विज्ञान हे मध्यवर्ती होते. विज्ञानाचा विचार हिंदवी स्वराज्यातील प्रत्येक घडामोडीच्या पाठीमागे होता. विज्ञानाच्या संकल्पनेमुळे हिंदवी



**शिवरायांनी भूविज्ञान आणि पर्यावरण विषयक माहितीचे रूपांतर राजकीय ताकदीमध्ये केले होते. या संदर्भातील काही उदाहरणे बोलकी आहेत. एक, भूविज्ञान व पर्यावरण विषयक ज्ञानामुळे त्यांनी सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्यांमध्ये एक प्रकारची निसर्गाची ताकद स्वतःमध्ये सामावून घेतली होती. सह्याद्रीच्या कडेकपारीतील परिसंस्था आणि शिवराय एकजीव झाले होते. तसेच कोकण आणि समुद्र यांच्या पर्यावरणाशी देखील शिवराय एकजीव झाले होते. गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे या परिसरात शिवरायांच्या आयुष्यातील जवळपास अठरा टक्के कालखंड गेलेला होता. यामुळे त्यांना या परिसरातील भूविज्ञानाचे अतिसुक्ष्म ज्ञान होते. आरमार व बंदराची उभारणी यामध्ये भूविज्ञानाचे अतिसुक्ष्म ज्ञान होते.**



स्वराज्याचा विस्तार होत गेला. वैज्ञानिक क्ल्पृत्यांच्या आधारे हिंदवी स्वराज्य सभोवतालच्या प्रतिस्पर्ध्याबरोबर संघर्ष करत राहिले. प्रचंड मोठ्या सम्राटाला देखील हिंदवी स्वराज्याचा पराभव करता आला नाही. याची अनेक कारणे आहेत. परंतु त्याबरोबरच एक अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे विज्ञानाची दृष्टी हिंदवी स्वराज्याला होती. हे एक कारण आहे. हिंदवी स्वराज्य अंधश्रद्धेवरती आधारित उभारले गेले नव्हते. हिंदवी स्वराज्याने विज्ञानाचा एक वटवृक्ष लावला होता. हिंदवी स्वराज्याची ताकद आणि आत्मा विज्ञानामध्ये होता.

## हिंदवी स्वराज्य विज्ञानाचे मंदिर

हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाचा वटवृक्ष कोणी लावला? हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाच्या वटवृक्षाची जोपासना कोणी केली? हे साधे परंतु महत्त्वाचे प्रश्न आहेत.


मालोजीराजे भोसले


सिंदखेडराजा येथील चांदणी तलाव


लखोजी जाधवराव

हिंदवी स्वराज्यामध्ये विज्ञानाची चळवळ मालोजीराजे भोसले व लखोजी जाधवराव यांनी सुरू केली होती (तळ्यांचे बांधकाम). विज्ञानाची चळवळ संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराबाई यांच्या काळातही प्रभावी होती. या नंतर ही चळवळ छत्रपती शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी ओळखली होती. त्यांनी ही विज्ञानाची कास धरली होती. हिंदवी स्वराज्य म्हणजे विज्ञानाचे एक सुंदर मंदिर होते. दुसऱ्या शब्दात हिंदवी स्वराज्य म्हणजे विज्ञानाची प्रयोगशाळा होती. शिवरायांच्या जीवन चरित्रातील सर्वात मोठा भाग विज्ञानाच्या घडामोडींनी व्यापलेला होता. शिवरायांच्या जीवन चरित्रातील वैज्ञानिक घटना आणि इतर घटना असे वर्गीकरण केले तर जवळपास पंच्याहत्तर टक्के घटनांचा संबंध वैज्ञानिक विचारांनी व्यापलेला दिसतो. इतर घटना देखील समाज विज्ञानाशी संबंधित होत्या. भुविज्ञान, भौतिकशास्त्र, बांधकामशास्त्र, पर्यावरणशास्त्र, रसायनशास्त्र, समुद्रशास्त्र, समाजशास्त्र या बद्दलचे ज्ञान शिवरायांना आणि मावळ्यांना उत्तम होते. आजच्या अर्थाने विज्ञानाचे ज्ञान त्यांच्याकडे नव्हते. परंतु त्यांच्या काळातील विज्ञानाच्या संदर्भात त्यांच्याकडे वैज्ञानिक ज्ञान होते. त्यांचा स्वभाव आणि वर्तन वैज्ञानिक स्वरूपाचे होते. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विज्ञानाचा गुण होता. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक गुण होते. परंतु यापैकी एक अतिशय महत्त्वाचा गुण वैज्ञानिक पद्धतीचे निरीक्षण करणे हा होता. संपूर्ण भूप्रदेशाचे भूवैज्ञानिक पद्धतीने निरीक्षण त्यांनी केले होते. शिवरायांच्या पत्रव्यवहारात व निर्णयात त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची छाप दिसते (पवार सुधाकर, १९७८). त्यामुळे हिंदवी स्वराज्याची इमारत विज्ञानाच्या घटनांवर आधारित बांधली गेली होती. हिंदवी स्वराज्याच्या विज्ञानाची मशागत वणगोपाळ निंबाळकर, लखोजी जाधवराव, मालोजीराजे भोसले यांनी केली होती. शहाजी महाराज व जिजाऊ यांनी विज्ञानावर आधारित निर्णय घेतले होते. त्यांनीच विज्ञानाचा वटवृक्ष लावला. हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाची देखभाल शिवराय व मावळ्यांनी केली. शिवरायांनी विज्ञानाचा वटवृक्ष वाढविला होता. त्यानंतर संभाजी महाराजांनी विज्ञान विकसित केले.



संभाजीराजे महाराज


राजाराम महाराज



ताराबाई

हिंदवी स्वराज्यात विज्ञान वाढविले गेले. या गोष्टीचे पुरावे कोणते आहेत? असा एक प्रश्न उभा करता येईल. या प्रश्नाचे उत्तर शिवरायांच्या जीवन चरित्रात मिळते. हिंदवी स्वराज्यातील जवळपास सर्वच घटनांमधून विज्ञानाचे पुरावे मिळत जातात. त्यांचे स्वतंत्रपणे विश्लेषण करण्याची गरज आहे. दुसऱ्या शब्दात शिवरायांचे जीवनचरित्र विज्ञानाच्या चौकटीत फुलत व खुलत जाते. नेतृत्वाला विविध गोष्टींचे ज्ञान असते. सहाजिकच विज्ञानाच्या बद्दलचे ज्ञान शिवरायांना होते. शिवरायांच्या जीवनचरित्र बरोबरच हिंदवी स्वराज्याच्या जीवनात देखील विज्ञान बहुपदरी पध्दतीने कृतीशील झाले होते. दस्तुरखुद्द शिवरायांनी हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाला अकार दिला

होता. त्यांनी विज्ञानाला ताकद पुरवली होती. शिवरायांनी धार्मिक श्रद्धांचा आदर केला. त्यांनी स्वतः धार्मिक श्रद्धा पाळल्या होत्या. परंतु तरीही त्यांच्या धार्मिक श्रद्धांच्या पाठीमागे एक प्रकारचे शास्त्र होते. शिवरायांनी अंधश्रद्धांचा पुरस्कार केला नाही. त्यांनी विज्ञान स्वीकारल्यामुळे अंधश्रद्धांचे निर्मूलन होत गेले. यामुळे शिवरायांच्या जीवन चरित्रात एक प्रकारे अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ देखील अनुस्यूत असल्याचे दिसते. तसेच त्यांच्या जीवन चरित्रात विज्ञानाची जवळीक देखील पूर्ण ताकदीने व्यक्त झाल्याचे दिसते. दुसऱ्या शब्दात हिंदवी स्वराज्यात अंधश्रद्धा निर्मूलन आणि विज्ञान या दोन चळवळी शिवराय आणि मावळ्यांनी राबविल्या होत्या. शिवरायांची धर्मावर पूर्ण श्रद्धा होती. परंतु धर्माची साधनवादी संकल्पना त्यांना मान्य नव्हती. धर्म उन्नतीवरच राष्ट्र उन्नती अवलंबून आहे. अशी शिवरायांची धारणा त्यांच्या कागदपत्रांत व वेगवेगळ्या प्रसंगात व्यक्त झालेली दिसते. ही परंपरा आधुनिक काळात महात्मा गांधी यांची देखील होती. ही विज्ञानाची एक प्रचंड मोठी सत्यकथा हिंदवी स्वराज्यातील होती. हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाची



शाहू महाराज



सयाजीराव गायकवाड

चौकट स्थूलमानाने सारासार विवेक, बांधकामशास्त्र, रसायनशास्त्र, समुद्रशास्त्र, पर्यावरणशास्त्र, भूविज्ञान या स्तंभावर उभी राहिली होती.

## सारासार विचारशक्तीची चौकट

सारासार विविध शक्तीची चौकट हिंदवी स्वराज्याला लाभली होती. सारासार विवेक हा शिवरायांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा घटक होता. सारासार विवेक ही संकल्पना विज्ञान संकल्पनेच्या फारच जवळची आहे. सारासार विवेकाच्या प्रांतातूनच विज्ञानाकडे जाता येते. यासंदर्भातील नोंदी शिवरायांच्या चरित्राबद्दलच्या वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या आहेत. एक, कॉस्मे डी गार्डा या पोर्तुगीज लेखकाने पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकामध्ये पंधरा वर्षाचा शिवाजी मोठा विचारमग्न दिसे अशी नोंद केलेली आहे (पगडी सेतु माधव, २०१२: १३). ही नोंद शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन विचारमग्न असे करते (Rational). विशेष म्हणजे शिवराय योजकबुद्धीचा जास्तीत जास्त उपयोग करत होते. अशी नोंद केली गेली आहे. त्यांनी विवेकी ज्ञान उपयोजित ज्ञानात रुपांतरित केले होते. अशी देखील नोंद केली गेली आहे. याचा



शिवरायांनी बांधलेला किल्ला


अर्थ सारासार विवेक हे शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट होते. यामुळे हिंदवी स्वराज्यात विज्ञानाचा वटवृक्ष वाढला. दोन, शिवरायांना खून वगैरे क्रूर प्रकार मनापासून आवडत नसत. त्यांनी आपल्या सौजन्याने, दक्षतेने व ममतेने सर्व लोकांची मने आपल्याकडे आकर्षून घेतली. अशी नोंद शिवरायांच्या मानवी स्वभावाची सरदेसाई यांनी केलेली आहे. खाफीखान यांनी शिवरायांच्या मानवी स्वभाव विषयी लिहिताना स्पष्ट नोंद केलेली आहे की आपल्या राज्यातील लोकांचा शिवराय मान (status) राखण्यासाठी सतत प्रयत्न करत होते. शिवरायांनी अनेक शहरे व गावे लुटली. परंतु लुटीसाठी कोणाचा जीव घेतला नाही. तसेच कोणास मारहाण केली नाही. थोडक्यात शिवराय मग्रूर लोकांचा काळ (हिंसा) व गोरगरिबांचे मायबाप (अहिंसा) होते. याचा अर्थ शिवरायांनी मानसशास्त्र व वैज्ञानिक शास्त्राच्या तत्त्वानुसार मानवी व्यवहार केला होता. या शिवरायांच्या मानवी स्वभावात मानवतावाद (Humanism) सुस्पष्टपणे दिसतो. दुसऱ्या शब्दात विज्ञान कोणासाठी? या प्रश्नाचे उत्तर मिळते. त्यांनी विज्ञान माणसाच्या कल्याणासाठी उपयोगात आणले होते. त्यांनी विज्ञान माणसाच्या विरोधात उपयोगात आणले नाही. यामुळे शिवराय विज्ञानाचा विचार मानव केन्द्रित करत होते. शिवराय विज्ञानाचा विचार साधनवादी पद्धतीने करत नव्हते. यामुळे शिवरायांचा विज्ञानाचा विचार अस्सल देशीवादी ठरतो. शिवरायांनी विज्ञानाचा विचार पाश्चिमात्य पद्धतीचा अमान्य केला. तसेच शिवरायांनी विज्ञानाचा विचार मोगल पद्धतीचा देखील अमान्य केला. शिवरायांनी विज्ञान आणि अहिंसा, विज्ञान आणि मानवता यांची सांधेजोड केली होती. या अर्थाने शिवरायांचे विज्ञान मानवतेचे गीत गात होते. म्हणजेच त्यांच्या विज्ञानाचा उद्देश मानवतावादाचा विकास करणे हा होता. तीन, शिवराय नेहमी सावध राहून सुयुक्तीने आपली कामे करत होते. अशी नोंद सरदेसाई यांनी केलेली आहे (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: ३४८). या नोंदीचा अर्थ शिवराय सतत निरीक्षण करत असत. ते सातत्याने अवतीभवतीच्या राज्यसंस्थांची, भुविज्ञानाची, आणि परिस्थितीची माहिती ठेवत असत. माहितीचे संकलनामध्ये ज्ञान असते ही गोष्ट त्यांनी विकसित केली होती. म्हणजेच शिवराय अंधश्रद्धांवर अवलंबून नव्हते असा एक अर्थ स्पष्ट होतो. चार, अभिजन आणि जनसमूह यापैकी जनसमूहाच्या (Masses) विवेक बुद्धीवरती शिवरायांचा विश्वास होता. यासंदर्भातील नोंद सेतू माधव पगडी यांनी केलेली








आहे (पगडी सेतु माधव, २०१२: १६-१७). शिवरायांनी सर्वसामान्य मावळ्यांच्या नाविन्यपूर्ण आयडियांना प्रत्यक्ष कृतीत उतरवले. ही नाविन्यपूर्ण आयडिया स्वीकारण्याची घडामोड शिवचरित्राच्या सुरुवातीपासून शिवचरित्राच्या समाप्तीपर्यंत दिसून येते. पाच, शिवरायांनी त्यांच्या काळातील अभिजन वर्गातील लोकांच्या काही आयडिया स्वीकारल्या होत्या. त्यांच्या अष्टप्रधान मंडळांमध्ये ही गोष्ट दिसून येते. म्हणजेच थोडक्यात सर्वसामान्य मावळ्यांच्या नाविन्यपूर्ण आयडीया आणि अभिजन वर्गाच्या आयडिया यांचा मेळ शिवरायांनी सारासार विवेक बुद्धीच्या आधारे घातला होता. दुसऱ्या शब्दांत शिवरायांनी सर्वसामान्य मावळ्यांच्या नाविन्यपूर्ण आयडिया आणि अभिजन वर्गाच्या आयडिया यांना विज्ञानाच्या आधारावर स्वीकारले होते. तसेच शिवरायांनी विज्ञानाशी व समाज विज्ञानाशी संबंध नसणाऱ्या आयडियांना नाकारले देखील होते. अभिजन वर्गाच्या आयडियांबद्दल शिवराय सातत्याने सावधान होते. ही नोंद देखील सेतू माधव पगडी यांनी केलेली आहे. सहा, शिवाजी महाराजांना आणि मावळ्यांना पर्यावरणशास्त्र, व्यापारशास्त्र आणि संरक्षणशास्त्र यांच्यातील सहसंबंध लक्षात आलेले होते. हे ज्ञान शिवरायांना शहाजी महाराजांकडून देखील मिळालेले होते. कारण इराण, इराक, पोर्तुगीज, इंग्लंड येथून व्यापारासाठी आलेले व्यापारी लोक आणि त्यांचे व्यापार शास्त्र हे शहाजी महाराजांना व शिवरायांना अवगत होते. विशेषता याबद्दलची एक महत्वाची कहाणी पुराव्यादाखल महत्त्वाचे ठरते. मिरजुमला हा एक प्रसिद्ध व्यापारी होता. मीरजुमला हा आजच्या कर्नाटक भागात राहत होता परंतु त्याचे व्यापारी संबंध फार दूरवर पसरलेले होते. मीर जुमला यांची जहाजे ब्रह्मदेश, मलाया, पेगु येथे जात होती (पगडी सेतूमाधव, २०१२: ४०). देशावरील भाग, डोंगराळ भाग, कोकण किनारा आणि समुद्र अशा प्रकारचे ज्ञान त्या काळात शहाजी महाराजांना आणि शिवाजी महाराजांना होते. यामुळे पर्यावरणशास्त्र, व्यापारशास्त्र आणि संरक्षणशास्त्र या तीनही गोष्टी शास्त्रीय अर्थाने शिवरायांना आणि मावळ्यांना समजलेल्या होत्या. सात, गती हे विज्ञानाचे तत्त्व आहे. शिवरायांनी गतीसाठी चपळ मावळ्यांची निवड केली होती. तसेच शिवरायांनी गती आणि वेळ यांचा मेळ घालण्यासाठी घोडदलाला अग्रक्रम दिला होता. शिवरायांनी उंट आणि हत्ती यांच्या तुलनेत घोडे आणि घोडदळ यांना जास्त महत्त्व दिले. यामध्ये गतीचे तत्व महत्त्वाचे दिसते. मावळे ऐसी ऐसी मैलांच्या मजला मारत होते. या कथा सांगितल्या जातात. या कथांमध्ये गतीही महत्त्वाचे आहे. तिचा संबंध विज्ञानाशी येतो हेही तितकेच खरे आहे.



सेतू माधवराव पगडी



गोविंद सखाराम सरदेसाई



कॉस्मे डी गार्डा

## रसायनशास्त्राची चौकट : बंदुक, तोफ, दारुगोळा

हिंदवी स्वराज्याला दारुगोळा, तोफ, बंदूक, शस्त्रास्त्रे, टाकसाळ या रूपाने एक प्रकारची रसायनशास्त्राची चौकट होती. राज्यसंस्थेचा मुख्य आधार रसायनशास्त्रामध्ये दडलेला असतो. बंदुक, तोफ, दारुगोळा, तोफखाना यांचा थेट संबंध रसायनशास्त्राशी येतो. पुरंदर, सिंहगड, पन्हाळा, फोंडा, दाभोळ अशा अनेक ठिकाणी शिवरायांचा संबंध दारुगोळ्याशी आला. रघुनंदन सक्सेना हा औरंगजेबाच्या तोफखान्याचा हिशोबनिस व सुपरिटेंडेंट होता. त्याने तोफखान्याची व तोफांची पाहणी केली व त्या तोफा शाहिस्तेखानकडे पाठवायच्या आहेत अशी नोंद केली होती. तेव्हा शाहिस्तेखान पुण्यामध्ये होता (सेतू माधव पगडी, २०१२ :








४३). तेव्हाची दारूगोळ्याच्या बद्दलचे संपूर्ण गोपनीय माहिती शिवाजी महाराजांना होती. विशेषतः दारूगोळ्याचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले होते. रसायनशास्त्र म्हणजे प्रयोगशाळाच असा अर्थ नव्हे. रसायनशास्त्राशी संबंधित अनेक घटनांच्या नोंदी शिवरायांच्या संदर्भात नोंदवल्या गेल्या आहेत. त्यापैकी काही चित्तवेधक नोंदी पुढील प्रमाणे आहेत. एक, फायरचे हिंदी राज्यकर्त्यां विषयीचे उदगार आहेत. त्यामध्ये फायरने बंदुकांचा उल्लेख केलेला आहे. बहुदा घोडदळांत मुसलमान व पायदळात हिंदू असून त्यांच्या जवळ बंदुका असतात (शेजवलकर, १९६४ : ५०६). असाच उल्लेख वा.शी. बेंद्रे यांनी छत्रपती संभाजी महाराज या पुस्तकात केलेला आहे. बंदुकीसाठी वापरला जाणारा दारुगोळा हा रासायनिक प्रक्रियेतून तयार होत होता. यामुळे शिवराय आणि शिवरायांच्या मावळ्यांना दारूगोळ्याच्या संदर्भातील रासायनिक प्रक्रिया माहित होत्या. दोन, किल्ल्यांचे बांधकाम करताना शिशाचा वापर केल्याची उदाहरणे सापडतात. शिशाचा वापर करताना रासायनिक प्रक्रिया घडल्या होत्या. यामुळे शिवरायांच्या काळात अनेक किल्ले बांधले गेले. त्यामुळे प्रत्येक घटनेत रासायनिक प्रक्रिया घडली याचे त्यांना आत्मभान होते. तीन, किल्ल्यांचे बांधकाम करताना शिशाच्या खेरीज चुन्याचा वापर केलेले पुरावे आजही दिसतात. यामुळे चून्याच्या संदर्भात देखील रासायनिक प्रक्रिया घडवल्या गेल्या होत्या. यामुळे चुना आणि शिसे या संदर्भात रासायनिक प्रक्रियांचे आत्मभान शिवरायांच्या काळाला होते. त्यामुळे शिवराय आणि शिवरायांचे मावळे यांना रसायनशास्त्राबद्दलचे त्या काळातील उत्तम ज्ञान होते. चार, काही किल्ल्यांवरती शिवरायांच्या काळातील तोफा सापडतात. तोफा बनवण्याचे काम म्हणजेच धातूवरती प्रक्रिया करण्याचे काम होते. शिवराय आणि शिवरायांच्या मावळ्यांना धातु बद्दलची माहिती होती. त्यांनी धातूचा वापर आधुनिक पद्धतीने केला होता. या प्रक्रियेत देखील रसायनशास्त्राचे आत्मभान त्या काळाला होते असे दिसते. पाच, तलवारी, भाले, बरचे बाण अशी युद्धसामुग्री तयार केली जात होती. ही साहित्य सामग्री तयार करण्यासाठी रासायनिक प्रक्रिया यांचे ज्ञान आवश्यक होते. या गोष्टी


स्वराज्यामध्ये तयार करणारा वर्ग परंपरागत पद्धतीची कला वापरत होता. परंतु त्यांच्या परंपरागत कलेमध्ये रासायनिक प्रक्रियांचे त्यांना ज्ञान होते. सहा, १६६४ मध्ये शिवरायांनी आपल्या नावाची तांब्याची नाणी आणि होन पाडण्यास सुरुवात राजगडवर केली होती (शेजवळकर, १९६४: ५०८, पठाण, २०२१: ५४५). हेन्री ऑक्सिंडेन यांनी शिवरायांनी टाकसाळ सुरू केलेल्या घटनेची नोंद सातव्या दशकातील केली होती. थोडक्यात सतराव्या शतकात सहाव्या आणि सातव्या दशकात शिवरायांच्याकडे टाकसाळ ही वैज्ञानिक पद्धती अस्तित्वात होती. नाणी पाडण्याच्या कलेमध्ये रासायनिक प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे. तांबे, चांदी व सोने अशी तीन धातूंची नाणी पाडली होती. बट या नाणकशास्त्रज्ञांच्या मते नाण्यावर सांकेतीक चिन्हे कोरली होती. या उदाहरणावरून देखील रासायनिक प्रक्रियेचे ज्ञान शिवरायांना आणि मावळ्यांना होते, हे सुस्पष्टपणे दिसते. सात, सतराव्या शतकातील सहाव्या आणि सातव्या दशकांमध्ये पोर्तुगीज आणि इंग्रजांनी संरक्षण आणि व्यापार या दोन विषयांना महत्त्व दिले होते. तर शिवरायांनी विज्ञान या गोष्टीला सर्वात जास्त महत्त्व दिले होते. विज्ञानाचे ज्ञान पोर्तुगीज आणि इंग्रजांकडे आहे याचे आत्मभान शिवरायांना आलेले होते. मोगलांच्या तुलनेत पोर्तुगीज आणि इंग्रजांकडे प्रगत विज्ञानाचे ज्ञान आहे ही गोष्ट शिवरायांनी आणि मावळ्यांनी समजून घेतली होती. सतराव्या शतकातील सहाव्या दशकापासून शिवराय दारू गोळ्यासाठी सतत प्रयत्न करत होते. दोरोजी यांनी दाभोळ राजापूर येथे दारू गोळ्यांसाठी प्रयत्न केला होता. दोरोजी हे महाराजांचे एक अधिकारी होते. त्यांना समुद्रशास्त्र आणि जहाजशास्त्र याबद्दलचे आकलन होते. दोरोजीने डिफर्ड व दलालाला काबीज केले होते. तेव्हा शिवरायांची एक महत्त्वाची मागणी दारूगोळ्याची व आरमाराच्या मदतीची होती (इस्माईल पठाण, २०२१: ४४८-४५०). ही मागणी देखील विज्ञानाशी संबंधित दिसते. हेनरी रेव्हिंग्टन, रिचर्ज टेलर, रेडॉल्फ टेलर व फिलिप गेफर्ड यांच्याबरोबरच्या वाटाघाटीमध्ये सातत्याने दारुगोळा आणि आरमार हा विज्ञानाशी संबंधित विषय शिवाजी महाराजांनी ठेवलेला होता. आठ, सतराव्या शतकाच्या सातव्या दशकात देखील दारूगोळा आणि आरमार या दोन गोष्टींच्या बदल शिवराय आणि त्यांचे वकील सुंदरजी प्रयत्न करत होते (९ सप्टेंबर १६७१). शिवरायांनी या वकिलांच्या मार्फत दोन मोठ्या तोफा दारुगोळा व तंत्रज्ञान इत्यादींची मागणी केली होती. या दशकात शिवरायांनी लेफ्टनंट स्टीफन उस्टिक यांच्याशी वाटाघाटी करताना देखील दारुगोळा, आरमार, तोफा असे महत्त्वाचे विषय चर्चेमध्ये ठेवले होते (पठाण इस्माईल, २०२१: ४५२). म्हणजेच थोडक्यात सातव्या दशकात देखिल शिवरायांनी सातत्याने विज्ञानाशी संबंधित गोष्टींना वाटाघाटींमध्ये मध्यवर्ती ठेवले होते. त्यांनी विज्ञानावरती लक्ष केंद्रित केले होते. नऊ, पर्यावरण आणि रासायनिक प्रक्रिया या दोन्हींच्या संबंधांचे शिवरायांना आणि मावळ्यांना उत्तम प्रतीचे आकलन होते. यामुळे पावसाळ्यात तोफांचा वापर पोर्तुगीज, मोगल, आणि इंग्रज यांना नीट करता येत नाही याबद्दलचे आकलन शिवरायांना आणि मावळ्यांना होते. यामुळे पर्यावरणाचा अंदाज घेऊन पोर्तुगीज, मोगल आणि इंग्रज यांच्या तोफांना पोषक नसलेल्या काळात स्वराज्य विस्ताराचा विचार शिवरायांनी विकसित केला होता. पावसाळ्यात तोफांचा फार उपयोग होत नाही. याबद्दल पर्यावरण शास्त्रीय ज्ञान शिवरायांना आणि मावळ्यांना होते. दहा, शिवरायांच्या राज्याभिषेकाच्या वेळी सिंहासन तयार करण्यात आले होते. सिंहासन तयार करताना रासायनिक प्रक्रियांचा वापर केला होता. सोने, चांदी, हिरे अशा वेगवेगळ्या धातूंच्यावरती रासायनिक प्रक्रिया केलेली होती. या घटनांमध्ये विज्ञानाचा वापर केला होता असे सुस्पष्टपणे दिसते.



पुण्याच्या लालमहालात शिवरायांनी शायिस्तेखानाची बोटे कापली.

## बांधकामशास्त्राची चौकट

हिंदवी स्वराज्यामध्ये बांधकामशास्त्राचा वापर केला गेला होता. जवळपास चार-पाच दशके सातत्याने बांधकाम सुरू होते. शिवराय बेंगलोर वरून पुण्यास आल्यापासून बांधकामास सुरुवात झाली होती. राज्यसंस्थेचा बांधकाम शास्त्र हा एक महत्त्वाचा घटक असतो. राज्यसंस्था अतिप्राचीन, प्राचीन किंवा मध्ययुगीन असली तरी बांधकामशास्त्र या गोष्टीवर लक्ष केंद्रित केले जाते. शिवरायांनी देखील बांधकामशास्त्र या गोष्टीवर लक्ष केंद्रित केले होते. शिवराय आणि शिवरायांच्या मावळ्यांनी बांधकामशास्त्राच्या संदर्भातील शास्त्रीय ज्ञानाचा विकास केला होता. त्यांची पुढील चित्तवेधक उदाहरणे सर्वसाधारण ज्ञान म्हणून देखील लिखित स्वरूपात नोंदविली गेली आहेत. एक, आरंभी शिवरायांनी श्यामराज नीळकंठ रांझेकर यांना तोफखान्याची कामे सांगितली होती. हे श्यामराज नीळकंठ रांझेकर पुढे पेशवा केले (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: १७८). तोफाखाना ही शास्त्रीय संकल्पना आहे. दोन, शिवरायांनी भुईकोट, गड (रायगड प्रतापगड पन्हाळगड इत्यादी), आणि दुर्ग (विजयदुर्ग सिंधुदुर्ग) असे तीन प्रकारचे किल्ले बांधण्याचे विज्ञान विकसित केले होते. परिस्थितीनुसार व पर्यावरणानुसार त्यांनी बांधकाम क्षेत्रामध्ये बदल केला होता. थोडक्यात त्यांनी बांधकाम आणि भूविज्ञान यांची सांगड घातली होती. ग्रँड डफने किल्ल्यांच्या संदर्भात भाष्य करताना शिवराय युद्धसामुग्री तयार ठेवत होते अशी नोंद केलेली आहे. युद्धसामग्री याचा अर्थ विज्ञान असाच घेतला पाहिजे. तीन, १६६१ ला प्रतापगडावर भवानीचे देऊळ शिवरायांनी बांधलेले (१६६१). चार, शिवरायांच्या कडे जवळपास तीनशे किल्ले होते. त्यांचे बांधकाम आणि डागडुजी त्यांनी शास्त्रीय पद्धतीने केली होती. उदा. १६६२ ला शिवरायांनी रायगड व सिंधुदुर्ग असे दोन किल्ले बांधले. पाच, कुलाबा किल्ला पुन्हा बांधला. सहा, त्यांनी सुवर्णदुर्ग विजयदुर्ग यांची दुरुस्ती केली (शेजवलकर: ५०८). सात, शिवरायांनी राजापुरी जवळ पद्मदुर्ग नावाचा किल्ला बांधला. या किल्ल्यांसाठी दौलतखान दर्यासारंग यांची नेमणूक केली होती. त्यास समुद्रशास्त्राबद्दलचे ज्ञान होते. शिवराय पद्मदुर्गला दुसरी राजापुरी असे स्थान देत होते (पवार सुधाकर, १९७८ :६७-६८). आठ, शिवरायांनी कारखान्यांचे बांधकाम केले होते. दारुखाना शिवरायांनी उभारला होता. तेव्हा दोन प्रकारचे दारुखाना वैज्ञानिक अर्थाने उभारले जात होते. एक दारूखाना मोगलांच्या वैज्ञानिक पद्धतीने उभारला जात होता. तर दुसरा दारूखाना पोर्तुगीज पद्धतीने उभारला जात होता. मोगल विज्ञान पद्धती आणि पोर्तुगीज विज्ञान पद्धती यापैकी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज विज्ञान पद्धतीने दारूखाना उभारण्याची पद्धत स्वीकारलेली होती (शेजवलकर: ५२६-५२७).





पोर्तुगीजांची विज्ञान पद्धत मोगलांच्या विज्ञान पद्धतीच्या तुलनेत प्रगत होती. या गोष्टीचे आत्मभान शिवराय आणि शिवरायांच्या मावळ्यांना त्या काळात होते. नऊ, रायगडचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की रायगडावरती स्नान गृहाची व्यवस्था आधुनिक पद्धती सारखी केलेली होती. तसेच बाथरूमची देखील व्यवस्था केलेली दिसून येते. सांडपाण्याची व्यवस्थादेखील केलेली होती. तसेच प्रचंड मोठे सभागृह बांधलेले होते. या गोष्टी विविध किल्ल्यांवरती देखील दिसून येतात. हे काम बांधकाम शास्त्र शास्त्रशुद्धपणे माहीत असल्याशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे हिंदवी स्वराज्याला बांधकाम शास्त्राशी संबंधित विज्ञानाची उत्तम जाण होती.

## समुद्रशास्त्राची चौकट

हिंदवी स्वराज्यामध्ये समुद्र शास्त्राच्या मार्गाने विज्ञान खूप खोलवर पसरले होते. तसेच हिंदवी स्वराज्यातील मावळ्यांनी विज्ञान स्वीकारले होते. शिवराय आणि शिवरायांच्या मावळ्यांना समुद्रशास्त्राचे उत्तम ज्ञान होते. शिवरायांच्या जीवनातील सर्वात जास्त काळ देशावर गेला असे वरवर दिसते (७५ टक्के). परंतु तंतोतंत अर्थाने त्यांच्या आयुष्यातील कालखंड कोकण विभागात गेला होता. कारण पुणे, बारा मावळे कोल्हापुर हा भाग कोकणाशी देखील संबंधित होता. यामुळे त्यांच्या आयुष्याचा संबंध केवळ १८ टक्के वेळेच्या संदर्भात कोकणाशी आला हे विधान बरोबर ठरत नाही. शिवरायांचा जवळपास निम्मा आयुष्याचा कालखंड कोकणात गेला होता (शेजवलकर, १९६४ : २६०-२६१). यामुळे त्यांच्या कोकणाशी जोडून असलेल्या समुद्राशी सातत्याने संबंध आला. हिंदवी स्वराज्यांचा जैविक समुद्रशास्त्र, भौतिक समुद्रशास्त्र, रासायनिक समुद्रशास्त्र, आणि भूवैज्ञानिक समुद्रशास्त्र अशा काही समुद्र शास्त्राच्या शाखांशी संबंध आला होता. हे शब्दप्रयोग आधुनिक आहेत. हे शब्दप्रयोग शिवरायांच्या काळात परिचित नव्हते. परंतु या संकल्पनांच्या संदर्भातील घटना मात्र शिवरायांच्या जीवनात आणि त्यांच्या काळातील मावळ्यांच्या जीवनात घडलेल्या होत्या. समुद्रशास्त्राच्या संदर्भातील अनेक घटनांचा स्वतंत्र इतिहासच निर्माण होऊ शकतो. शिवरायांच्या काळातील अनेक घटनांचे विश्लेषण समूद्रशास्त्राच्या संदर्भात पुन्हा नव्याने करण्याची गरज आहे. या गोष्टीचे आत्मभान आजही पुरेसे समुद्रशास्त्राला देखील आलेले नाही. सतराव्या शतकाच्या सहाव्या दशकात शिवरायांनी समुद्रशास्त्राशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. सहाव्या दशकाच्या शेवटी शिवरायांनी वीस गलबते बांधली. त्यांनी कल्याण भिवंडी येथे आरमाराची स्थापना केली (१६५९). त्यांचे नाव संगमिसी ठेवले होते (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: १७६). आरमाराची माहिती विज्ञान म्हणून देखील चित्तवेधक आहे. एक, भौतिक समुद्रशास्त्रात समुद्रतळ, किनारपट्टी आणि वातावरण यांच्यातील संबंधांचा अभ्यास केला जातो. या प्रमुख घटकांशी शिवरायांचा संबंध सततचा आला होता. दोन, दुसरे म्हणजे रासायनिक समुद्रशास्त्र, समुद्राच्या पाण्याच्या रासायनिक रचनेचा परिणाम आणि हवामान, मानवी क्रियाकलाप आणि इतर घटकांवर





त्याचा कसा परिणाम होतो. या गोष्टीचे त्यांना उत्तम ज्ञान होते. यामुळे तोफखाना आणि दारुगोळा बाळगणाऱ्या शत्रुपक्षाच्या विरोधी पावसाळ्यांमध्ये मोहिमा शिवरायांनी राबवल्या होत्या. तीन, शिवरायांनी आरमाराची उभारणी केली. आरमाराची उभारणी ही घटना पूर्णपणे शास्त्रीय स्वरूपाची आहे. वैज्ञानिक ज्ञानावरती आधारित आरमाराची उभारणी त्यांनी केली होती. या संदर्भातील अनेक उदाहरणे त्यांच्या जीवन

चरित्रामध्ये विखुरलेले आहेत. उत्तरेस कल्याण आणि दक्षिणेस राजापूर ही दोन मोठी व्यापारी केंद्रे होती. या दोन्ही भागांत शिवरायांनी आरमाराची उभारणी केली. शिवरायांनी विजयदुर्ग किल्ला बांधला (१६५३). सतराव्या शतकातील सहाव्या दशकात शिवरायांनी कृष्णा लोहकरे आणि मावळे यांच्या मदतीने भिवंडी घेतली. त्यानंतर जहाजांचा संचार कल्याणच्या खाड्यांमधून सुरू केला (१६५७). शिवरायांनी कल्याण जवळ बंदरी कोट बांधला (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: १७३). ही नोंद सरदेसाई यांनी केलेली आहे. म्हणजेच सतराव्या शतकाच्या सहाव्या दशकात विज्ञानावर आधारलेले आरमार शिवरायांनी उभे गेले होते. शिवरायांनी भिवंडी, कल्याण, पनवेल या बंदरात लढाऊ गलबते बांधली. गलबतांची बांधणी आणि समुद्राशी त्यांनी जुळवून घेतले. यामध्ये समुद्रशास्त्राचे ज्ञान दिसते. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. चार, शिवरायांनी सातव्या दशकात बसरुर येथे आरमार उभारले होते. बसरुर हे भटकळच्या दक्षिणेला बंदर आहे तेथे शिवरायांनी मोठे आरमार तयार केले होते (१६६५). शिवरायांनी राजापुरी जवळ पद्मदुर्ग नावाचा किल्ला बांधला. या किल्ल्यांसाठी दौलतखान दर्यासारंग यांची नेमणूक केली होती. शिवराय पद्मदुर्गला दुसरी राजापुरी असे स्थान देत होते (पवार सुधाकर, १९७८ :६७-६८). पाच, भूवैज्ञानिक दृष्टिकोनातून शिवरायांनी डोंगरी किल्ल्यांच्या साह्याने देशाचा बंदोबस्त ठेवला होता. संरक्षणशास्त्र आणि भूविज्ञान यांची सांधेजोड शिवरायांनी केली होती.



राजापुरी जवळील पद्मदुर्ग किल्ला.

## भूविज्ञानाची चौकट

हिंदवी स्वराज्याच्या कानाकोपऱ्यात विज्ञान भुविज्ञान आणि समुद्रशास्त्राच्या पद्धतीने खूप खोलवर रुजले होते. शिवरायांना भूविज्ञान आणि पर्यावरण या दोन गोष्टींची अति उत्तम माहिती होती. शिवरायांनी भूविज्ञान आणि पर्यावरण विषयक माहितीचे रूपांतर राजकीय ताकदीमध्ये केले होते. या संदर्भातील काही उदाहरणे बोलकी आहेत. एक, भूविज्ञान व पर्यावरण विषयक ज्ञानामुळे त्यांनी सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्यांमध्ये एक प्रकारची निसर्गाची ताकद स्वतःमध्ये सामावून घेतली होती. सह्याद्रीच्या कडेकपारीतील परिसंस्था आणि शिवराय एकजीव झाले होते. तसेच कोकण आणि समुद्र यांच्या पर्यावरणाशी देखील शिवराय एकजीव झाले होते. गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे या परिसरात शिवरायांच्या आयुष्यातील जवळपास अठरा टक्के कालखंड गेलेला होता. यामुळे त्यांना या परिसरातील भूविज्ञानाचे अतिसुक्ष्म ज्ञान होते. आरमार व बंदराची उभारणी यामध्ये भूविज्ञानाचे अतिसुक्ष्म ज्ञान होते. दोन, शिवरायांच्या जीवनात सतराव्या शतकातील सहाव्या दशकाच्या शेवटी भूविज्ञान म्हणून सर्वात मोठी घटना घडली. त्या घटनेमुळे हिंदवी स्वराज्याचा आत्मविश्वास प्रचंड प्रमाणात वाढला. कारण अफजलखानांचा भूवैज्ञानिक विचारांच्या मदतीने पूर्ण पराभव केला गेला. अफजलखानावरील



विजय म्हणजे भूविज्ञानाचे अतिसुक्ष्म ज्ञान होय. या घटनेमध्ये विज्ञान मध्यवर्ती होते. वैज्ञानिक दृष्टिकोन हिंदवी स्वराज्याला गती देत होता. ही गोष्ट अधोरेखित झाली. तीन, शिवराय आग्र्याला गेलेले ही कथा जवळपास सर्वांना माहीत आहे. परंतु अग्र्याहून शिवराय पुन्हा राजगडावरती आले. या त्यांच्या प्रवासात त्यांचा संबंध एका व्यापक भूविज्ञानाशी आणि त्याबरोबरच परिसंस्थेशी आला होता. हा प्रवास त्यांनी भुविज्ञानाच्या ज्ञानाच्या मदतीने सहजासहजी केला. याचा अर्थ त्यांना भुगोलशास्त्राची आणि परिसंस्थेचे संपूर्ण माहिती आणि ज्ञान होते. आग्र्याहून शिवराय राजगडावरती कसे आले. याबद्दलच्या मार्गाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभिन्नता असली तरीदेखील आग्रा ते राजगड हा प्रवास भूविज्ञानाच्या ज्ञानाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. भूगोल ही विज्ञानाची एक उपशाखा आहे. यामुळे शिवरायांचा त्यांच्या स्वाऱ्यांमध्ये आणि प्रवासामध्ये देखील विज्ञानाशी जवळून संबंध येत होता. चार, शिवरायांच्या जीवनातील दक्षिण दिग्विजय महत्त्वाचा मानला जातो. शिवरायांच्या जीवनचरित्रातील हा अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे. दक्षिणेच्या भूगोलाची आणि पर्यावरणाचीदेखील त्यांना तंतोतंत माहिती होती. म्हणजेच या स्वारीत देखील त्यांचा विज्ञानाशी संबंधित जवळून आलेला होता. पाच, शिवरायांचा समुद्राशी, कोकणाशी, उत्तरेशी, दक्षिणेशी संबंध आला. तसेच त्यांचा संबंध देशावर देखील आला. देशावर म्हणजेच पठारी भागाचे देखील त्यांच्या आयुष्यातील मोठा कालखंड गेला. यामुळे उत्तर-दक्षिण, कोकण आणि पठार, सह्याद्रीतील कड्या कपारीचा भाग या पर्यावरणाशी त्यांनी जुळवून घेतले होते. विशेषतः येथील हवामानाशी शिवराय आणि मावळे जुळवून घेत होते. वेगवेगळ्या राजवटींच्या विरोधातील त्यांचा हा केवळ लढा नव्हता. शिवरायांच्या आयुष्यातील संघर्ष या सर्व प्रकारच्या पर्यावरणाशी देखील होता. त्यांना पर्यावरणाचे उत्तम ज्ञान असल्यामुळेच त्यांनी या सर्व भूभागांतील पर्यावरणाशी सहजासहजी जुळवून घेतले. या गोष्टीचा मुख्य आधार विज्ञान हा होता. त्यांनी सातत्याने वैज्ञानिक दृष्टी पर्यावरणाच्या संदर्भातील विकसित केली होती. यामुळे ते पर्यावरणाशी शास्त्रीय पद्धतीने जुळवून घेऊ शकले. तसेच संघर्ष करू शकले.



## समारोप

हिंदवी स्वराज्यामध्ये विज्ञानाची पाळेमुळे खुप खोलवर जाऊन पोहोचली होती. हिंदवी स्वराज्य ही एक विज्ञानाची चळवळ होती. विज्ञान आणि विवेक या दोन गोष्टींमुळे हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. हिंदवी स्वराज्यातील विज्ञानाचे राजकीय नेतृत्व शिवरायांनी केले. शिवरायांनी अनेक मावळ्यांना विज्ञानाची दृष्टी दिली.

**संदर्भ–**






शेजवलकर, १९६४, श्रीशिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधनें, मराठा मंदिर प्रकाशन १, मुंबई.

पठाण इस्माईल, २०२१; छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर.

मद्वाण्णा यशवंत दादा, १९७९, स्व. आण्णासाहेब लठ्ठे जीवन आणि कार्य, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली.

गर्गे स. मा.(संपा), १९८८, मराठी रियासत, खंड एक, गोविंद सखाराम सरदेसाई, १९८८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

पगडी सेतू माधवराव, १९७१, (२०१२), शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर.

पवार सुधाकर, १९७८, मराठेशाहीतील पत्ररूप गद्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


■■



आदिवासी हा जंगलचा राजा आहे आणि जंगलसंपत्तीवर त्याचा नैसर्गिक अधिकार मानला जातो. ब्रिटिश सत्तेविरुध्द देखील आदिवासींनी त्यांच्या या मूलभूत हक्क व अधिकारांसाठी संघर्ष केलेला होता. त्यावर आक्रमण करणारी दोन विधेयके भाजपच्या सरकारने आणल्यानंतर आदिवासी समाज खवळून उठणे स्वाभाविक होते. विधानसभेत बहुमताच्या जोरावर ही विधेयके संमत करण्यात भाजप सरकारने यश मिळविले आणि स्वाक्षरीसाठी ती राज्यपाल असलेल्या मुर्मु यांच्याकडे पाठवली. मात्र आदिवासी अधिकारांबाबत जागरूक मुर्मु यांनी ती विधेयके फेटाळून लावली. त्यांच्या या भूमिकेची विरोधी पक्षांनी प्रशंसा केली. परंतु फेटाळलेली विधेयके दुसऱ्यांदा पाठविल्यानंतर राज्यपालांना त्यावर स्वाक्षरी करावी लागते. सध्या झारखंडमध्ये विरोधी पक्षांचे म्हणजे झारखंड मुक्ति मोर्च्याचे हेमंत सोरेन यांचे सरकार सत्तेत आहे. परंतु त्यांचे व मुर्मु यांचे संबंध सौहार्दाचे राहिले आहेत. सोरेन यांनीही त्यांच्या संवेदनशील स्वभावाची तारिफ केली आहे. परंतु सोरेन पडले विरोधी पक्षांचे व विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार यशवंत सिन्हा यांना त्यांनी समर्थन दिले आहे. त्यामुळे झारखंड मध्ये आदिवासी अस्मिता काम करणार काय हा प्रश्न आहे. त्यांच्या राष्ट्रपति होण्याने त्यांना प्रथम आदिवासी राष्ट्रपति होण्याची संधी मिळेल.



# राष्ट्रपतिपदाची सोळावी निवडणूक नवा रंग भरणारी

**अनंत बागाईतकर**

भारतीय राज्यघटनेनुसार राष्ट्रपति हे राष्ट्रप्रमुख असतात. हे देशातले सर्वोच्च पद आहे. राष्ट्रपति हा देशाचा प्रथम नागरिक मानला जातो. राष्ट्रपतिपद हे शोभेचे मानले गेले असले तरी भारताच्या सेनादलांचे ते सर्वोच्च प्रमुख असतात. तसेच केंद्रात सरकार स्थापनेच्या वेळी राष्ट्रपतींची भूमिका ही महत्वाची व निर्णायक मानली जाते. त्यामुळे या पदाचे महत्व, स्थान, प्रतिष्ठा ही विशेष मानली जाते. हे पद भूषविलेल्या व्यक्ती कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या होत्या व त्यांनी त्या पदाची प्रतिष्ठा राखली. त्यामुळेच हे पद शोभेचे मानले गेले तरी त्याची प्रतिष्ठा कायम राहिली आहे.

राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य आणि सर्व राज्यांमधील विधानसभांचे सदस्य मतदान करतात. विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य हे त्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात ठरविले जाते. त्यामुळे केंद्रात एखाद्या पक्षाचे सरकार असले आणि त्यांना संसदेत बहुमत असले तरी देशातील राज्यांपैकी बहुसंख्य राज्यातही केंद्रातील सत्तापक्षाचे बहुमत असणे आवश्यक असते तरच सत्तापक्षाचा उमेदवार विजयी होणे शक्य असते. एकेकाळी देशात दिल्लीपासून गल्लीपर्यंत काँग्रेसचा एकछत्री अंमल असे व त्यामुळे त्यांचा उमेदवार निवडून येण्यात कोणतीच अडचण नसे. परंतु आता देशाचे राजकारण बदलले आहे. ऐंशीच्या दशकापासून विविध राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष सबळ झाले आणि त्यांची सरकारे स्थापन झाली. देशाच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांचा दबदबा निर्माण झाला. त्यामुळे राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतील त्यांची भूमिका महत्वाची आणि काहीवेळेस निर्णायक देखील झाली. त्यामुळे केंद्रात सत्तेत असलेल्या पक्षाला या

प्रादेशिक पक्षांशी मिळतेजुळते घेणे भाग पडत असे. आताही केंद्रातील भाजपला त्यांच्या उमेदवाराच्या विजयासाठी या प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा मिळविण्यास प्राधान्य द्यावे लागत आहे. यासाठीच भाजपने द्रौपदी मुर्मु या आदिवासी महिला नेत्याची केलेली निवड सूचक मानावी लागेल. एकतर त्या आदिवासी असल्याने संसदेतील सर्व पक्षांचे आदिवासी संसदसदस्य, निरनिराळ्या विधानसभांमधील आदिवासी आमदार हे आदिवासी अस्मितेच्या आधारे मुर्मु यांना मते देतील अशी भाजपची अटकळ आहे. त्याचबरोबर महिला या नात्याने देखील त्या महिला आमदार-खासदारांची काही अतिरिक्त मते मिळवू शकतील असेही भाजपला आदिवासी-बहुल आहेत त्याचाही लाभ भाजपला मिळू शकतो. छत्तीसगढ हे एक आदिवासी राज्य आहे. तेथे काँग्रेसचे बहुमत व सरकार आहे. त्यामुळे तेथे मुर्मु किती प्रभाव टाकू शकतात हा एक उत्सुकतेचा विषय आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्येही आदिवासी विभाग आहेत व त्यावरही भाजपची नजर असणे स्वाभाविक आहे.

आतापर्यंत मुर्मु यांच्या उमेदवारीला भाजपखेरीज ओडीशातील बिजु जनता दल, आंध्र मधील वायएसआर काँग्रेस, पंजाबमधील अकाली दल यांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. मुर्मु यांच्या विरोधात भाजपचेच बंडखोर नेते



वाटते. त्या संथाल आदिवासी समूहाच्या आहेत. त्यामुळे या आदिवासी समूहाचे अस्तित्व असलेल्या राज्यांमधील मतदान त्या प्रभावित करु शकतात. संथाल आदिवासी बिहार, झारखंड, ओडीशा, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये प्रामुख्याने पसरलेला आहे. त्यांचे लोकप्रतिनिधी देखील आहेत. त्यामुळेच मुर्मु या राज्यांमधील मतदान प्रभावित करु शकतील. तसेच संपूर्ण ईशान्य भारतातील राज्ये ही

यशवंत सिन्हा यांना विरोधी पक्षांनी आपले संयुक्त उमेदवार केले. यशवंत सिन्हा हे उच्चविद्या विभूषित आहेत. विरोधी पक्षांची सरकारे असलेली राज्ये म्हणजेच पंजाब, राजस्थान, छत्तीसगढ, झारखंड, तेलंगणा, तमीळनाडू, पश्चिम बंगाल व केरळ यांच्यावर त्यांची भिस्त असणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रात ऐनवेळी सत्ताबदल झाल्याने मतांची अदलाबदल होणे स्वाभाविक आहे. सिन्हा बिहारचे असले तरी तेथे

भाजप व नीतीशकुमार यांचे संयुक्त सरकार आहे आणि तेथील मते ते किती प्रमाणात प्रभावित करु शकतात याचेही आकलन महत्वाचे आहे.

सुरुवातीच्या अंदाजानुसार भाजपकडे विजयासाठीच्या काही मतांचा तुटवडा होता परंतु विविध प्रादेशिक पक्षांबरोबरच्या वाटाघाटीनंतर त्यांनी ती तूट भरुन काढल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आकडेवारीच्या पातळीवर हा सामना समसमान असल्याची विरोधी पक्षांची भूमिका असली तरी आतापर्यंतच्या अनुभवानुसार केंद्रात सत्तारूढ असलेल्या पक्षाचा उमेदवार कधीही पराभूत झालेला नाही हे येथे विसरुन चालणार नाही.

अपवाद नाहीत. त्या आदिवासी आहेत. त्या संथाल समूहाच्या आहेत. व्यक्तिगत जीवनात त्यांनी मोठे आघात सहन केले. त्यांची दोन मुले आणि पति यांच्या अकाली व आकस्मिक निधनाची कुऱ्हाड त्यांच्यावर कोसळली. या असह्य आघातांमुळे काहीकाळ त्यांना नैराश्याने घेरले होते. परंतु अध्यात्मामुळे त्यांनी त्यावर मात केली व स्वतःला सावरले. एकुलती एक मुलगी इतिश्री हा आता त्यांच्या जीवनाचा प्रमुख आधार आहे. स्वतः आदिवासी असल्याने आदिवासींच्या समस्या, अडचणी, त्रास याबद्दल त्या विशेष जागरूक आहेत. झारखंडमध्ये भाजपचे सरकार असताना त्या तेथे राज्यपाल होत्या. परंतु तत्कालीन भाजप



द्रौपदी मुर्मु यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी नरेंद्र मोदी, अमित शहा, राजनाथसिंग, नितीन गडकरी, जे.पी. नड्डा हे भाजपचे नेते उपस्थित होते.

## राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) उमेदवार द्रौपदी मुर्मु

कुणाच्याही व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीमध्ये जीवनाच्या प्रवासातील अनेक घटना, प्रसंग व घडामोडींचा अपरिहार्य असा प्रभाव असतो. भाजप व त्यांच्या आघाडीच्या उमेदवार द्रौपदी मुर्मु या देखील या नियमाला

सरकारने आदिवासींच्या हिताविरुध्द आणलेल्या दोन कायद्यांना परवानगी नाकारुन त्यांनी त्यांच्या तटस्थता आणि निःपक्षतेचा परिचय दिला होता. त्या भाजपच्या असूनही त्यांनी दाखविलेल्या या निःपक्षपातीपणाची सर्व विरोधी पक्षांनी प्रशंसा केली होती. त्यांच्याकडून याच तटस्थता व निःपक्षपातीपणाची अपेक्षा भविष्यातही कायम राहील.

२० जून १९५८ हा द्रौपदी मुर्मु यांचा जन्मदिवस

आहे. त्यांनी वयाची चौसष्ठी पार केली आहे. ओडीशा राज्यातील मयूरभंज जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. हा आदिवासी जिल्हा आहे. रायरंगपूर हे त्यांचे गाव. हायस्कूल शिक्षणानंतर त्यांनी भुवनेश्वरला येऊन महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षणानंतर राज्य शासनाच्या वीज व पाटबंधारे विभागात त्यांनी नोकरी केली. चार वर्षे सरकारी नोकरी केल्यानंतर त्यांनी श्री अरबिंदो इंटेग्रल एज्युकेशन सेंटर (रायरंगपूर) येथे शिक्षिकेचे काम सुरु केले. १९८३ ते १९९७ अशी चौदा वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले. या काळातच त्यांना राजकारण व समाजकार्याची आवड निर्माण झाली. १९९७ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. आपल्या राजकारणासाठी त्यांनी भारतीय जनता पक्षाचे माध्यम स्वीकारले. यानंतर लगेचच त्यांनी रायरंगपूर महानगरपालिकेची निवडणूक लढवली. महानगरपालिकेच्या त्या उपाध्यक्ष झाल्या. या



मुलगी इतिश्री व नात यांच्या समवेत द्रौपदी मुर्मु





काळात भाजप आणि नवीन पटनाईक यांच्या बिजु जनता दलाची आघाडी होती. महानगरपालिकेच्या स्तरावर काम केल्यानंतर त्यांनी सन २००० मध्ये प्रथम विधानसभेची निवडणूक लढवली व जिंकली देखील. त्या पहिल्यांदाच आमदार झालेल्या असूनही नवीन पटनाईक मंत्रिमंडळात त्यांना प्रथम वाहतूक व वाणिज्य आणि नंतरच्या काळात मत्स्योद्योग व पशुधन विभागाची मंत्रीपदे देण्यात आली. प्रथमच आमदार होऊनही त्यांच्याकडे खात्यांची स्वतंत्र जबाबदारी देणे हे विशेष होते.

२००९ मध्ये भाजप आणि बिजु जनता दलाची आघाडी संपुष्टात आली. त्यांनी पटनाईक यांच्या लाटेतही आपली रायरंगपूर विधानसभेची जागा राखण्यात यश मिळविले. याच वर्षी त्यांना पंचवीस वर्षाच्या ऐन तारुण्याच्या उमेदातील मुलाच्या आकस्मिक वियोगाचा आघात सहन करावा लागला. या आघातामुळे त्यांना नैराश्य आले. यामुळे त्या

अध्यात्माकडे वळल्या आणि या धक्क्यातून सावरल्या. पण आघातांचे आरिष्ट संपले नव्हते. २०१३ मध्ये त्यांना त्यांचा दुसरा मुलगा आणि पति श्यामाचरण मुर्मु यांच्या अकाली मृत्युचा दुहेरी आघात सहन करावा लागला. आता त्यांच्या कुटुंबात त्यांची एकुलती एक मुलगी इतिश्री हाच त्यांचा आधार राहिली होती. त्या आधारावरच त्यांनी उभारी धरली.

२०१५ मध्ये त्यांना शेजारचे व मुख्यतः आदिवासी बहुल राज्य झारखंड येथे राज्यपाल म्हणून नेमण्यात आले. बिहारपासून झारखंडचे वेगळे राज्य स्थापन झाल्यानंतर या राज्यात राजकीय स्थिरता नेहमीच हुलकावण्या देत राहिली. अस्थिर आणि सतत राजकीय उलथापालथीचे राज्य म्हणून झारखंड ओळखले जाऊ लागले. या राज्याची निर्मिती स्वतंत्र झारखंड राज्य निर्मितीसाठीच्या प्रदीर्घ आंदोलन व चळवळीतून झालेली होती. त्याचा आधार तेथील बहुसंख्याक आदिवासी आणि त्यांचे अधिकार हे होते. अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे सरकारे स्थापन होणे व अल्पावधीत त्यांचे पतन हा खेळ येथेही चालला. त्यामुळे



राज्यपालाचे काम जिकिरीचे बनणे स्वाभाविक होते. परंतु मुर्मु यांनी या पदावर काम करताना नेहमीच आदिवासी हिताला प्राधान्य दिले आणि आपली पाच वर्षांची कारकिर्द यशस्वीपणे पार पाडली. त्यांना २०२१ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती.

मुर्मु जेव्हा राज्यपाल झाल्या त्यावेळी तेथे भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीचे सरकार सत्तेत होते. रघुवर दास हे

मुख्यमंत्री होते. या सरकारने दोन विधेयके संमत केली. छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट(१९०८) दुरुस्ती विधेयक आणि संथाल परगणा टेनन्सी ॲक्ट(१९४९) दुरुस्ती विधेयक. या दोन विधेयकांमुळे आदिवासी विभागातील शेतजमीनीचे व्यापारी हेतुसाठी परिवर्तन करण्यास परवानगी देण्यात आली होती. या दोन्ही विधेयकांना आदिवासींतर्फे कडाडून विरोध झाला होता. आदिवासींशी निगडित आणि अन्य स्वयंसेवी संघटनांनी या विरुध्द आंदोलनाची भूमिका घेतली. ही दोन्ही विधेयके आदिवासींच्या मूलभूत भूमिकेवर आघात करणारी होती. आदिवासी हा जंगलचा राजा आहे आणि जंगलसंपत्तीवर त्याचा नैसर्गिक अधिकार मानला जातो. ब्रिटिश सत्तेविरुध्द देखील आदिवासींनी त्यांच्या या मूलभूत हक्क व अधिकारांसाठी संघर्ष केलेला होता. त्यावर आक्रमण करणारी ही दोन विधेयके भाजपच्या सरकारने आणल्यानंतर आदिवासी समाज खवळून उठणे स्वाभाविक होते. विधानसभेत बहुमताच्या जोरावर ही विधेयके संमत करण्यात भाजप सरकारने यश मिळविले आणि स्वाक्षरीसाठी ती राज्यपाल असलेल्या मुर्मु यांच्याकडे पाठवली. मात्र आदिवासी अधिकारांबाबत जागरूक मुर्मु यांनी ती विधेयके फेटाळून लावली. त्यांच्या या भूमिकेची विरोधी पक्षांनी प्रशंसा केली. परंतु फेटाळलेली विधेयके दुसऱ्यांदा पाठविल्यानंतर राज्यपालांना त्यावर स्वाक्षरी करावी लागते. सध्या झारखंडमध्ये विरोधी पक्षांचे म्हणजे झारखंड मुक्ति मोर्च्याचे हेमंत सोरेन यांचे सरकार सत्तेत आहे. परंतु त्यांचे व मुर्मु यांचे संबंध सौहार्दाचे राहिले आहेत. सोरेन यांनीही त्यांच्या संवेदनशील स्वभावाची तारीफ केली आहे. परंतु सोरेन पडले विरोधी पक्षांचे व विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार यशवंत सिन्हा यांना त्यांनी समर्थन दिले आहे. त्यामुळे झारखंड मध्ये आदिवासी अस्मिता काम करणार काय हा प्रश्न आहे. त्यांच्या राष्ट्रपति होण्याने त्यांना प्रथम आदिवासी राष्ट्रपति होण्याची संधी मिळेल. राष्ट्रपति हा भारताचा प्रथम नागरिक



हेमंत सोरेन झाडाचे रोप देऊन मुर्मु यांचे स्वागत करताना.

असतो आणि देशाचा सर्वोच्च प्रमुख असतो. आदिवासी हा भूमीवरील मूळ रहिवासी मानला जातो त्यामुळे हे सर्वोच्च पद अशा व्यक्तीकडे जाण्याने एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण मानले जाईल. मुर्मु या आदिवासी आणि महिला आहेत. के. आर. नारायणन हे पहिले दलित राष्ट्रपति होते. ग्यानी झैलसिंग हे देखील अतिशय गरीब समाजातील व्यक्ती होते. मुर्मु यांच्या निमित्ताने आणखी एका अशा समाजाला म्हणजेच आदिवासी समाजाला सर्वोच्च पदाचा सन्मान लाभू शकेल.

## यशवंत सिन्हा (विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार)

यशवंत सिन्हा हे मुरलेले - मुरब्बी राजकीय नेते आहेत. त्यांची राजकीय कारकिर्दही प्रदीर्घ आहे. भारतीय प्रशासनिक सेवेतील(आयएएस) ते एक माजी अधिकारी आहेत. बिहारमध्ये ते परिवहन सचिव म्हणून काम पहात असत. देशातील भ्रष्टाचार, एकाधिकारशाहीच्या विरोधात जयप्रकाश नारायण यांनी १९७४-७५ मध्ये जे आंदोलन छेडले त्यामुळे प्रभावित होऊन राजकारण व समाजकारणात ज्यांनी प्रवेश केला त्यात यशवंत सिन्हा यांचा समावेश होतो. भारतीय प्रशासन सेवेच्या राजीनाम्यानंतर त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. जनता पक्षात ते सामील झाले आणि पक्षांतर्गत पातळीवर ते चंद्रशेखर यांचे निकटवर्ति म्हणून ओळखले जाऊ लागले. चंद्रशेखर यांचे जे खास अनुयायी म्हणून ओळखले जात त्यांच्यात सिन्हा यांचा समावेश झाला होता. चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षात त्यांनी अनेक वर्षे संघटनेत आणि सरचिटणीस म्हणून काम केले. विश्वनाथ प्रतापसिंग आणि चंद्रशेखर यांच्यातील संघर्षात त्यांनी चंद्रशेखर यांना साथ दिली. चंद्रशेखर पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी यशवंत सिन्हा यांना अर्थमंत्रीपद दिले. अर्थात चंद्रशेखर यांचे सरकार अल्पजीवि ठरले आणि सिन्हा यांचे अर्थमंत्रीपदही गेले. जनता पक्ष आणि मागाहून जनता दल आणि चंद्रशेखर यांना त्यांनी निष्ठेने साथ दिली परंतु या पक्षांचे अस्तित्व नगण्य असल्याने त्यांना राज्यसभा किंवा लोकसभेत फारशी संधी मिळू शकली नव्हती. १९८८ मध्ये ते प्रथमच राज्यसभेचे सदस्य झाले. या काळातच ते चंद्रशेखर पंतप्रधान असताना अल्पकाळासाठी अर्थमंत्री झाले. १९९४ नंतर त्यांना दोन वर्षे काहीसा राजकीय विजनवास सहन करावा लागला. याच काळात ते चंद्रशेखर यांच्यापासून दुरावू लागले. १९९६ मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त करण्यात आले होते. भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर पक्षाने त्यांच्यावर राष्ट्रीय प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपवली होती. चंद्रशेखर यांच्यासारख्या समाजवादी विचारसरणी असलेल्या नेत्याच्या निकटवर्तीय वर्तुळाचे सदस्य असूनही थेट भारतीय जनता पक्षासारख्या पक्षात त्यांनी प्रवेश करणे हे काहीसे न पटणारे होते. सिन्हा हे भाजपच्या पठडीतील नसल्यानेही त्यांच्या या पक्षांतराबद्दल मतमतांतरे होत राहिली. परंतु अटलबिहारी वाजपेयी यांच्या तुलनेने उदारमतवादी नेतृत्वाखाली सिन्हा यांना भाजपमध्ये



राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी यशवंत सिन्हा उमेदवारी अर्ज दाखल करताना, शेजारी राहुल गांधी, अखिलेश यादव, प्रफुल पटेल

अवघडलेपणा जाणवला नाही. त्यामुळे भाजपला केंद्रात सरकारस्थापनेची संधी मिळाल्यानंतर त्या सरकारमध्ये अर्थमंत्री म्हणून सिन्हा हे स्वाभाविक उमेदवार ठरले. १९९८ मध्ये भाजपने त्यांना हजारीबाग मतदारसंघातून उमेदवारी दिली. हा मतदारसंघ आता झारखंडमध्ये येतो. १९९८, १९९९ आणि २००४ अशा तीन निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून लढविल्या. २००४च्या निवडणुकीत ते पराभूत झाले. २००५ मध्ये भाजपने त्यांना राज्यसभेवर पाठविले. २००९ मध्ये त्यांनी पुन्हा हजारीबागमधूनच निवडणूक लढवली आणि ते विजयी झाले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यांना डावलून त्यांचे पुत्र जयंत सिन्हा यांना उमेदवारी देण्यात आली. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या उदयानंतर मात्र त्यांचे भाजपबरोबरचे संबंध बिघडण्यास सुरुवात झाली. अखेर २०१८ मध्ये त्यांनी भाजपला रामराम ठोकला. 'मोदी राजवटीत भारतातील लोकशाही गंभीर संकटात सापडली आहे' असे कारण सांगून त्यांनी पक्षत्याग केला. यानंतर ते आणि भाजपमधील आणखी एक असंतुष्ट व दुर्लक्षिण्यात आलेले नेते अरुण शौरी यांनी नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात मोहिम सुरु केली. विरोधी पक्षांनी त्यांना पाठिंबा दिला. अलीकडेच त्यांनी ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यशवंत सिन्हा हे उच्चविद्या विभूषित आहेत. उत्तम वक्ते आहेत. भारतीय अर्थकारण आणि परराष्ट्र नीतीचा त्यांचा सखोल अभ्यास आहे. वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांनी प्रथम अर्थमंत्रीपद व मागाहून परराष्ट्रमंत्रीपद अशा दोन महत्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या होत्या. सिन्हा यांच्या टिप्पण्या आणि मतप्रदर्शन हे नेहमीच धारदार राहिले आहे. ते त्यांचे वैशिष्ट्य मानावे लागेल. चंद्रशेखर यांच्या सन्निध्यात राहणाऱ्या व्यक्तीला चंद्रशेखर यांचा हा गुण लागणार हे दिल्लीचे राजकारण जाणणारे बरोबर मान्य करतील.चंद्रशेखरही त्यांच्या धारदार जिभेबद्दल प्रसिध्द होते. त्याचप्रमाणे ते स्वतंत्र आणि स्वतःच्या बुध्दीने चालणारे नेते आहेत. बिहारमध्ये प्रशासनात सचिव पदावर असताना त्यांना महामायाप्रसाद सिन्हा नावाच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत फटकारल्यावर सिन्हा यांनी त्यांना सुनावले होते, 'आयुष्यात मी कधी तरी मुख्यमंत्री होऊ शकतो पण तुम्ही आयएएस अधिकारी होऊ शकणार नाही हे ध्यानात ठेवा !'

अशा स्वतंत्र भूमिकेच्या नेत्याचे मोदी-शहा यांच्यासारख्या नेत्यांबरोबर कदापि पटणे शक्य नव्हते. मोदी-शहा यांना स्वतंत्र बुध्दीचे नेते आजुबाजुला खपत नाहीत. त्यामुळेच सिन्हा यांना मोदी-शहांच्या भाजपमध्ये राहणे शक्य नव्हते. त्यांनी भाजपबाहेर जाणे पसंत केले. पण बाहेर पडल्यानंतर त्यांनी मोदी-शहांच्या भाजप विरुध्द आणि त्यांच्या धोरणांना अतिशय कडाडून विरोध सुरु केला. सिन्हा हे वेगळ्या पार्श्वभूमीतून भाजपमध्ये आलेले नेते होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्यात एक उदारता होती त्यामुळे



**यशवंत सिन्हा यांचा अर्ज भरण्यासाठी जमलेले नेते सर्वश्री मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, शरद पवार आणि अखिलेख यादव**

भाजपमध्ये राहूनही त्यांनी सर्वसमावेशकतेचे राजकारण केले. तोपर्यंत सिन्हा यांना भाजपमध्ये अवघडल्यासारखे झाले नाही. मात्र एकाधिकारवादी प्रवृत्तीचे नेतृत्व आल्यानंतर त्यांची कुचंबणा अपरिहार्य होती व त्याची परिणिती त्यांच्या भाजप सोडण्यात झाली.

यशवंत सिन्हा यांना वाजपेयींच्या सरकारमध्ये मिळालेले अर्थमंत्रीपद काहीसे अपघाताने मिळाले होते. वाजपेयींना अर्थमंत्रीपद जसवंतसिंग यांना द्यावयाचे होते. कारण वाजपेयींना आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम मनमोहनसिंग यांच्या गतीनेच पुढे अमलात आणावयाचा होता. परंतु त्यावेळी अचानक स्वदेशीचा ढोंगी पुळका आलेल्या संघ परिवाराने जसवंतसिंग यांना विरोध केला. त्यामुळे तडजोड म्हणून सिन्हा यांना अर्थमंत्री करण्यास वाजपेयी तयार झाले. सिन्हा यांनी अर्थमंत्री या नात्याने आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम चालू ठेवला परंतु स्वदेशीचे ढोंग घेतलेल्या संघ परिवारालाही त्यांनी थोडी अनुकूलता दाखवत काम केले. सिन्हा यांनी लोकसभेला अर्थसंकल्प सादर करण्याची ब्रिटिशकालीन वेळ (सायंकाळी ५ वा.) बदलून ती भारतीय परिस्थितीला अनुसरुन सकाळी ११ वाजताची केली. यामुळे संघ परिवार खूष होणे स्वाभाविक होते. पण अर्थमंत्री म्हणून त्यांनी काही चांगले निर्णय केले व त्यातील सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे पायाभूत क्षेत्राला त्यांनी मुबलक निधि उपलब्ध करुन रोजगाराला चालना दिली. रस्तेबांधणीचे देशव्यापी प्रकल्प त्यांच्याच काळात सुरु झाले. त्याचा अर्थव्यवस्थेला जो फायदा झाला त्याचे परिणाम दिसू लागले होते. त्यामुळेच वाजपेयी सरकारने ज्या 'शायनिंग इंडिया' आणि 'फील गुड' या दोन लोकप्रिय घोषणांच्या आधारे २००४ च्या लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्याचे ठरवले. दुर्दैवाने परिस्थितीने असे काही वळण घेतले की वाजपेयींना पराभवाचा सामना करावा लागला. परंतु सिन्हा यांना २००२ मध्ये अर्थमंत्रीपद सोडावे लागले. त्यांच्या जागी जसवंतसिंग यांना अर्थमंत्री देण्यात





आले. सिन्हा यांना परराष्ट्रमंत्रीपद देण्यात आले. त्यामुळे एकाच सरकारमध्ये दोन महत्वाची खाती सांभाळण्याची संधी त्यांना मिळाली.

सिन्हा यांचे वय ८४ आहे. परंतु ते अजुनही तल्लख आहेत. जयप्रकाश नारायण आंदोलनाची स्फूर्ति घेऊन ते राजकारणात आलेले असल्याने त्यांच्या राजकीय भूमिका या आग्रही असणे अपरिहार्य आहे. त्यामुळेच मोदी–शहांच्या भाजपमध्ये ते राहणे शक्य नव्हते. ते प्रत्यक्षात घडले देखील आणि आता तर ते विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार झाले आहेत. सिन्हा हे कणखर राजकीय नेते आहेत आणि त्यांनी मोदी–शहा यांच्या विरोधात भूमिका घेण्याचे धाडस दाखवले आहे. त्यामुळेच संयुक्त विरोधी पक्षांना त्यांच्या रुपाने उचित उमेदवार मिळाला असे मानावे लागेल.

■■





शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी झालेल्या विरोधी पक्ष नेत्यांच्या बैठकीला यशवंत सिन्हा उपस्थित होते.






# प्रगतीसाठी ज्ञानाचा उपयोग करून प्रत्यक्ष कृती करावी

## माजी मंत्री सुभाष देसाई यांचे उद्गार

‘राज्याचा भूतकाळ उज्वल होता. आता फारशी प्रगती दिसत नसली तरी त्याबद्दल खंत बाळगून चालणार नाही. त्यासाठी ज्ञानाचा उपयोग करून प्रत्यक्ष कृती करावी लागेल. आपले पाय ओढणारे असतात तसे आपल्याला पाठिंबा देणारेही असतात, असा आशावाद मराठी भाषा आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सोमवारी व्यक्त केला. राज्य सरकारचा मराठी भाषा विभाग आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. हे राज्याचा ६० वर्षांचा लेखाजोखा मांडणारे ग्रंथ आहेत. यामध्ये विविध तज्ञ लेखकांनी प्रगती-अधोगतीबाबत साक्षेपी विचार मांडले आहेत.

मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान, मोहरा महाराष्ट्राचा आणि विज्ञान-तंत्रज्ञानात हीरक महोत्सवी महाराष्ट्र या तीन खंडांचे सुभाष देसाई.डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, वरिष्ठ संपादक आणि पत्रकार राजीव खांडेकर आणि ऋतुरंगचे संपादक अरुण शेवते यांनी प्रकाशन केले.

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या ६० वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, मराठी राज्यातील,मराठीची विविध क्षेत्रातील सद्य:स्थिती, अभ्यासपूर्ण लेखांमधून मांडणारा हा ग्रंथ आहे. डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे विस्तृत संपादकीय, डॉ अजय देशपांडे यांचे प्रास्ताविक आणि डॉ.वि.स. जोग, प्राचार्य आनंद मेणसे, डॉ. रमेश वरखेडे, डॉ.अशोक चौसाळकर , डॉ.प्रकाश पवार, राम जगताप, प्रकाश परब, प्रा. हरी नरके, डॉ.रमेश पानसे, अनिल गोरे, विदेश पांडे, डॉ.निरंजन घाटे, प्रा. वसंत आबाजी डहाके, डॉ. नीलिमा गुंडी ,डॉ.रमेश धोंगडे , डॉ. सतीश बडवे, अनुराधा मोहनी ,ड्.असीम सरोदे ,संतोष शेणई, नीतीन केळकर, डॉ. सुहासिनी कीर्तीकर, डॉ.अजय देशपांडे, रविराज गंधे, डॉ.अनुपमा उजगरे ,अभिषेक जाखडे , डॉ. रावसाहेब काळे, प्रा.जयदेव डोळे , डॉ. विलास चिंतामण देशपांडे, दा. गो. काळे,




**ग्रंथाली आणि महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राच्या हिरकमहोत्सवानिमित्त ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या तीन खंडांचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमातील प्रमुख पाहुण्यांची भाषणे....**

# महाराष्ट्र राज्याचा ६० वर्षाचा प्रवास ग्रंथरुपाने प्रसिद्ध

विजय चोरमारे, डॉ.महेश केळुसकर, शंभू पाटील , दिनकर गांगल ,डॉ.राजशेखर शं. बालेकर ,अरुण जाखडे, सुनीता पाटील या ३६ अभ्यासकांचे दीर्घ आणि अभ्यासपूर्ण लेख या ग्रंथात समाविष्ट आहेत. या विषयावरील अशा प्रकारचा हा पहिलाच आणि एकमेव असा संग्राह्य आणि संदर्भ ग्रंथ असून, हा ग्रंथ म्हणजे एका अर्थाने मराठीच्या संदर्भातील श्वेतपत्रिकाच होय. या ग्रंथाचे प्रकाशन मुंबई येथे मंत्रालयात नुकतेच झाले असून अनेक ठिकाणी त्यावर चर्चासत्रही प्रस्तावित आहेत.

महाराष्ट्र काय आहे हे पुढच्या पिढ्यांना करणे आवश्यक असून, या ग्रंथांच्या माध्यमातून त्यांनी ही ओळख होईल, असा विश्वास डॉ. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. शेवते यांनीही यावेळ्ये या पुस्तकाच्या प्रवासाचा थोडक्यात वेध घेतला, तर खांडेकर यांनी या निमित्ताने मराठी माणसाला मराठीबद्दल अभिमान जास्त आणि प्रेम कमी आहे, असे निरीक्षण नोंदवले. राज्यात मराठीबद्दल बोलताना बाह्य सरसावल्या जातात, मात्र दुकानदार, रिक्षाचालक यांच्याशी मराठीमध्ये व्यवहार होत नाहीत, असे ते म्हणाले. आज देशपातळीवर स्वतःचा ठसा उमटवणारी कार कमी मराठी माणसे आहेत. जी माणसे काम करतात त्यांचे अपेक्षित कौतुक होत नाही, अशी खंत खांडेकर यांनी व्यक्त केली.

मोहरा महाराष्ट्राचा या पुस्तकाचे संपादन रमेश अंधारे यांनी, मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान या पुस्तकाचे डॉ. श्रीपाद जोशी आणि डॉ. अजय देशपांडे यांनी, तर विज्ञान तंत्रज्ञानात हीरक महोत्सवी महाराष्ट्र या पुस्तकाचे संपादन विवेक पाटकर आणि हेमचंद्र प्रधान यांनी केले आहे. या कार्यक्रमामध्ये मराठी विज्ञान परिषदेचे अ.पां. देशपांडे, विवेक पाटकर आणि हेमचंद्र प्रधान यांचा सत्कार करण्यात आला. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी या पुस्तकांच्या निर्मितीमागची भूमिका स्पष्ट केली. तसेच येत्या दीड वर्षात नाटक आणि चित्रपट या विषयांवरील विशेष ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याचे सांगितले

# ग्रंथालीला शक्य ती मदत करू

आज मला विशेष आनंद होतोय, की मोहरा महाराष्ट्राचा हे पुस्तक प्रकाशित झालेलं आहे. याबद्दल प्रथमत: मी ग्रंथालीचं आभार मानतो. थोडंस या पुस्तकाविषयी, हे पुस्तक लिहिताना या पुस्तकाचे लेखक रमेश अंधारे हे २०१९ साली नागपूरला साहित्य संमेलनाच्या एका कार्यक्रमात भेटले होते. त्यांनी मला विनंती केली, की असं असं मी लिखाण केलेलं आहे आणि माझी इच्छा आहे, की हे पुस्तक प्रकाशित व्हावं. त्यांना म्हटलं, की



कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांची ग्वाही

काय हरकत नाही. पुण्याला घेऊन या आणि आपण चर्चा करू. त्यांनी माझ्या टेबलावर तीन-चार मोठी पुस्तकं लिहिलेली बाडं ठेवली आणि मला म्हणाले की मी एवढं पुस्तक केलेलं आहे आणि ग्रंथाली प्रकाशन करणार आहे. तर आपणही मदत करावी. मी म्हटलं, काय हरकत नाही. मग हिंगलासपूरकर सर एकदा आले. त्यांची, माझी चर्चा झाली. हिंगलासपूरकर सर म्हणाले, की मी छापायला घेतोय आणि मग १ मे २०२०ला, म्हणजे खरं म्हटलं तर दोन वर्षापूर्वी पुस्तक प्रकाशित व्हायला



मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते डॉ.पी.डी. पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला तेव्हा शेजारी सुदेश हिंगलासपूरकर




सुभाष देसाई भेटवस्तू देऊन डॉ.पी.डी. पाटील यांचा सत्कार करताना, शेजारी राजीव खांडेकर आणि अरुण शेवते.

हवं होतं. पण या कोरोनाच्या काळामध्ये प्रकाशित झालं नाही. काही कारणानं पुढं गेलं. आज ते प्रकाशित होतंय. याबद्दल मला खरोखर विशेष आनंद होतोय. मी ग्रंथालीचं विशेष करून आभार मानतो.

त्याचबरोबर ग्रंथालीनं अजून दोन खंड प्रकाशित केले आहेत. विज्ञान तंत्रज्ञानात हिरकमहोत्सवी महाराष्ट्र, मराठी राज्यातले मराठी वर्तमान. मला या सर्व लेखकांनाही मनापासून शुभेच्छा द्याव्याशा वाटतात. आदरणीय विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान. प्रा. अरविंद अंधारे, श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. अजित देशपांडे या सर्वांनीच गेल्या ६० वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासामधील इतकी माहिती गोळा करून आपल्या सर्वांसमोर त्यांनी ठेवलेली आहे, म्हणजे आपल्या येणाऱ्या पिढीला महाराष्ट्रामध्ये काय झाले ६० वर्षामध्ये याची ओळख त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे करून दिलेली आहे आणि तिन्ही खंड अतिशय चांगल्या पद्धतीने लिहून महाराष्ट्राला एक चांगली भेट दिलेली आहे. नाहीतर महाराष्ट्र काय आहे हे खरोखरच आपल्याला समजत नाही. या दरम्यानच्या काळामध्ये आमच्या मधुकर भावेंनी महाराष्ट्राच्या हिरकमहोत्सवावर एक पुस्तक छापलं होतं. अशी अनेक लेखकांनी छापलेली आहेत. पण हे जे तीन ग्रंथ आहेत ते खरोखर विशेष करून अतिशय चांगल्या पद्धतीनं मांडणी केलेली आहे. याचा मला आज इथे आनंद वाटतो. हिंगलासपूरकर सरांनी आत्ता सांगितलं, की ग्रंथालीचे अनेक प्रोजेक्ट चालू आहेत. जर चांगला प्रोजेक्ट असेल तर आपण जरूर करणार. त्यांच्या पाठीशी उभे राहू आणि मी शुभेच्छा देतो. नमस्कार!

■■

विज्ञान परिषदेचे कार्यवाह डॉ.अ.पां. देशपांडे यांचा डॉ. पी.डी. पाटील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना.



# भाषेचं सौष्ठव सांभाळण्याची जबाबदारी माध्यमांनी घ्यावी



एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर

ग्रंथालीनं प्रकाशित केलेले तिन्ही ग्रंथ पाहिल्यानंतर आनंदानं मन उसळून यावं इतकं चांगलं काम या तिन्ही ग्रंथांमधून झालेलं आहे. ग्रंथालीच्या पुढाकारातून हिरक महोत्सवाच्या निमित्तानं आणि पी. डी. पाटील यांच्या सहकार्यामुळे अतिशय उत्तम काम झालेलं आहे. मोहरा महाराष्ट्राचा हे पुस्तक तर इतकं उत्तम झालेलं आहे, म्हणजे जर एखाद्या व्यक्तीने हे पुस्तक संपूर्ण वाचलं तर तो महाराष्ट्राचा पंडित म्हणून जगात कुठेही वावरू शकेल. अतिशय समृद्ध करणारा असा हा ग्रंथ आहे. कुठलंही पान वाचलं तर मनाला आनंद देणारं असं मिळतं. तीच गोष्ट मराठी राज्यातलं मराठीचं वर्तमान आणि विज्ञानाच्याबद्दलची सुद्धा. म्हणजे महाराष्ट्रानं या ५०-६० वर्षात काय केलं याचा धांडोळा घेताना सगळ्या संस्थांचा, व्यक्तींचा, विषयांचा या सगळ्यांचा अतिशय उत्तम पद्धतीने अभ्यास आणि त्याची मांडणी झालेली आहे. मला वाटत नाही, की इतर कुठल्याही राज्यामध्ये या प्रकारचं काम झालेलं आहे. त्यामुळं हे तिन्ही ग्रंथ मराठी माणसाला समृद्ध करणारे, ज्याचं मराठी भाषा, संस्कृती यावर प्रेम आहे अशा घरांमध्ये असावेत अशा प्रकारचे हे ग्रंथ आहेत.

खरं तर मराठीच्या वर्तमानाबद्दल बोलायला गेलं तर सगळा वातावरणाता जोश आणि चैतन्यच हरवून जातं. कारण ते इतकं निराशेच्या मार्गाला लागतं, की काय बोलावं. पण मला मराठीबद्दल बोलताना खरंच असं वाटतं, की आपल्याला मराठीच्याबद्दल अभिमान फार आहे. प्रेम थोडं कमी पडत आहे. त्यामुळं मराठीच्या नावानं हातात दगड घ्यायची वेळ आली, की लोकं बाह्या सरसावून घेतात. पण आपल्या भागातल्या दुकानदाराशी, रिक्षावाल्याशी स्वाभाविकपणे मराठीत बोलण्याची वेळ येते तेव्हा मराठीत बोलायला कचरतो किंवा आपल्याला ते कमीपणाचं वाटतं. तो आपल्या स्वभावाचा किंवा एकूण वातावरणाचा भाग आहे असं म्हणूया. मनात प्रश्न निर्माण व्हावेत अशा प्रकारची स्थिती आज मराठीच्याबद्दल आहे.

मला असं खूप वाटायचं, की जेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा सांगलीला यशवंतराव चव्हाणांचं भाषण झालं होतं. त्या भाषणात यशवंतराव महाराष्ट्राबद्दल असं म्हणाले होते, की हे इतक्या अंगानं प्रगत आणि समृद्ध असं राज्य आहे. आता त्याला स्वतंत्रपणानं काम करण्याची संधी मिळतेय. महाराष्ट्राबद्दल जे काय सगळं अनुकूल घडतंय, तर मला असं वाटतंय की याला दृष्ट लागणार नाही ना. यशवंतरावांनी ही जी भीती बोलून दाखवली, ती खरं तर नंतर प्रत्यक्षातच येण्याची भीती तयार झाली. कारण कोणतंही क्षेत्र घेतलं तर त्यामध्ये महाराष्ट्राचं स्थान जे १९६०मध्ये होतं, अपवादानं अशी परिस्थिती निर्माण झाली, की आपण जिथं होतो तिथून दोन पायऱ्या, तीन पायऱ्या वर गेलो. बहुतेक क्षेत्रामध्ये म्हणजे कोणतंही क्षेत्र घेतलं, म्हणजे संगीत असेल, साहित्य असेल, कला असेल, विचार असेल तर त्यावेळचं आपण बघितलं तर प्रत्येक क्षेत्रामध्ये महाराष्ट्रामध्ये त्यावेळेला अशी लोकं काम करत होती, जी देशपातळीवर स्वत:चा ठसा उमटवू शकलेली होती.

आज अशी परिस्थिती आहे, की फार अपवादानं लोकं दिसतात, की जी देशपातळीवर स्वत:चा ठसा


उमटवू शकलेली आहेत किंवा उमटवत आहेत. हे असं का झालं. विज्ञानाच्या पुस्तकामध्ये याचा संदर्भ आलाय, की महाराष्ट्रामध्ये विज्ञानाबद्दलचं प्रेम थांड कमी पडतं आणि त्यामुळं आपण कोणतेही पुरस्कार बघायला जातो, सायंटिस्ट बघतो त्यावेळी त्याच्यामध्ये मराठी नावं फार कमी दिसतात. पण ते फक्त विज्ञानाच्याच बाबतीत आहे असं नाही. उद्योग जगतात आपण बघतो, की भारताचे सीईओ जगभरात पताका फडकवत आहेत, त्यात किती मराठी नावं असतात. कोणी एकेकाळी भारताच्या क्रिकेट टीममध्ये मुंबईचे आठ–नऊ प्लेयर असायचे. आज आपण बघतो तर अपवादानं एखादा दिसतो. तर हे प्रत्येक क्षेत्रामध्ये आपण जिथं होतो, म्हणजे बजाज, गरवारे किंवा किर्लोस्कर असतील अशी औद्योगिक घराणी आज कुठं आहेत असा प्रश्न माझ्या मनामध्ये निर्माण होतो.

सुदैवानं गेल्या काही काळामध्ये उद्योग आणि सगळ्याच क्षेत्रांमध्ये खूप बदल झालेले आहेत आणि त्यामुळे मराठी फर्स्ट जनरेशनचे आपल्याला उद्योजक दिसताहेत आणि आपण काहीतरी करतोय. साहित्यात बोलायचं तर भाषा जगवणं हे काही माध्यमाचं काम नाही. भाषेचं शिक्षण शाळांमधून मिळावं, कुटुंबानी द्यावं आणि माध्यमांचं काम हे माहिती देणं आहे. कुठं तरी भाषा जगवण्याचा जयकार उगाच आपल्या खांद्यावर घ्यायचं काही कारण नाही. कारण तो तुमचा मूळ उद्देशच नाहीये. पण काळानं मला असं जाणवलं, की असं म्हणण्यामध्ये काही हाशील नाही. कारण, फार मोठा प्रभाव तुमची इच्छा असो, नसो तो समाजावर आहे आणि त्यामुळं भाषेचं सौष्ठव सांभाळण्याची जबाबदारी जी काही कारण नसताना माध्यमांच्या खांद्यावर येऊन पडलेली आहे. त्याचा परिणाम असा आहे, की भाषेच्याबद्दल जेव्हा विचार केला जातो तेव्हा एक गोष्ट अशी जाणवते, की तुमची भाषा जर समृद्ध असेल तर त्या समृद्ध भाषेला त्या पद्धतीनं समाजासमोर सतत मांडण्याचं काम माध्यमांनी केलं पाहिजे. माध्यमांची जबाबदारी आहे असं म्हणणार नाही. पण ते व्हायला पाहिजे. मर्यादित शब्द भांडारामुळे मराठीचा समृद्ध प्रवास आता फार आकुंचन पावत चालला आहे. मला असं वाटतं, की माध्यमांकडून ही गोष्ट व्हायला पाहिजे होती. खास करून मुद्रित माध्यमांच्याकडून. टीव्ही माध्यमांच्याकडूनही आहेच. कारण शेवटी तुम्ही काय शब्द वापरताय. तुम्ही जितके शब्द नव्याने वापराला तेवढे लोकांच्या कानावर पडतील आणि लोक ते वापरायला लागतील.



दुसरी एक गोष्ट अशी, की आपल्याकडं कौतुक जे व्हायला पाहिजे, खासकरून साहित्य विचारात असणाऱ्यांच्याबद्दलचं, त्याच्याबद्दल आपण फारच कंजुषपणा करतो. मराठीमध्ये इतकं उत्तम लिहिलं जातंय, पण त्या पद्धतीचं कौतुक त्या लेखकाच्या वाट्याला येतं का? म्हणजे आत्ता ज्या पुस्तकांना यावर्षी साहित्य अकादमी मिळालं, ती पुस्तकं इतकी उत्तम आहेत, त्यांच्या वाट्याला काय कौतुक आलं? किती कौतुक झालं? म्हणजे साहित्य संमेलनाने त्यांना बोलवलंसुद्धा नाही. माझी अशी इच्छा आहे, की प्रत्येक साहित्य संमेलनामध्ये त्यावर्षी ज्यांना साहित्य अकादमी मिळालं आहे त्यांना बोलवून त्यांचं कौतुक व्हायला पाहिजे. त्यांचा सत्कार व्हायला पाहिजे. कारण ते त्यावर्षीचे आपले हिरो आहेत. त्या पद्धतीनं आपण त्यांच्याकडं बघितलं पाहिजे. माध्यमांमध्येही एखाद्या पुस्तकाबद्दल परीक्षण येतं तेव्हा ते थोडक्यात आणि ओळख असेल तर येते. ज्यावेळी तुम्ही पानभर त्याविषयी द्याल तेव्हा समाजाला तो लेखक आणि त्याचे पुस्तक समजेल. पण सध्या व्यवहारच इतका झापडबंद झाला आहे. त्यामुळं ना समाजाकडून, ना माध्यमाकडून पुरेसं कौतुक होतंय. त्यामुळं लेखक आहे, उत्तम लिहितोय पण ते समाजापर्यंत पोहोचत नाहीये. लेखकांना आपण कॉन्फिडन्स देत नाहीये. ही गोष्ट व्हायला हवी.

# लेखक आणि वाचकांमधील दुवा म्हणून ग्रंथालीचे काम


सुरेश हिंगलासपूरकर

महाराष्ट्राचा हिरकमहोत्सव साजरा होणार होता. तर ग्रंथालीने काहीतरी केलं पाहिजे अशी कल्पना माझ्या मनात आली. मग मी ती माझ्या सगळ्या विश्वस्तांना सांगितली. सगळ्यांनी त्याला होकार दिला आणि आम्ही असं ठरवलं, की यानिमित्तानं पाच पुस्तकं तयार करूया. मला अजून दोन पुस्तकं करायची होती. त्यातलं एक होतं नाटकावरचं आणि दुसरं होतं सिनेमावरचं. याच्याबद्दल अशोक राणेंशी माझं बोलणंही झालं होतं. पण ही दोन पुस्तकं करू शकलो नाही. पण येत्या दीड एक वर्षात ती दोन्ही पुस्तकं आम्ही तयार करू.

प्रथम आम्ही रमेश अंधारे संपादित मोहरा महाराष्ट्राचा हा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाचा खर्च मोठा होता. यासाठी आम्ही डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांना भेटलो असता, मी प्रती घेतो, आपण काम सुरू करा, असा धीर त्यांनी मला दिला. त्यामुळं उत्साह वाढला. मग पुढे दोन खंडांची आखणी केली. यातील विज्ञानाच्या खंडाबद्दल मी मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह देशपांडे यांना कल्पना सांगितली. त्यांनी ती लगेच उचलून धरली. संपादक विवेक पाटकर यांना संपादक नेमून हा खंड पूर्ण केला. भाषेच्या खंडाबद्दल डॉ. श्रीपाद जोशी यांना कल्पना सांगितली. त्यांना ती आवडली. डॉ. अजय देशपांडे यांच्यासह त्यांनी तिसऱ्या खंडाचे काम सुरू केले. आज हे तिन्ही खंड प्रकाशित होत आहेत, याचा एक वेगळाच आनंद होत आहे. या तिन्ही खंडांची जी मुखपृष्ठं आहेत, ती सतीश वावचरे यांनी केली आहेत.

या तीन खंडांच्या निमित्ताने महाराष्ट्रातील बारा ठिकाणी, प्रत्येक ठिकाणी तीन दिवसांचं चर्चासत्र आणि व्याख्यान आयोजित करण्याचं ठरवलेलं आहे. कारण, मला असं जाणवलं, की आपण ज्या ज्यावेळी वेगळी गावं करतो, जसं ग्रंथालीनं काम करून ठेवलंय, पण त्या गावातील व्यक्ती किंवा संस्था यातली काही कामं करत आहेत. तर त्यातनं कुठंतरी डॉक्युमेंटेशन झालं, तर खऱ्या अर्थानं तो ग्रंथ परिपूर्ण होऊ शकेल. या सगळ्या उपक्रमाचा समन्वयक कोण, तर माझा मित्र, पुस्तकांवर प्रेम करणारा श्याम जोशी असेल आणि मी त्याला ग्रंथालीची सगळी टीम आम्ही मदत करणार आहोत.

ग्रंथालीनं १९८२ साली ग्रंथयात्रा काढली. यावर्षी जानेवारीत त्याला ४० वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्रात एकाचवेळी ५० ठिकाणी ग्रंथ प्रदर्शनं भरवली. हा कार्यक्रम आपण १९८५ साली केला होता. यावेळी समाजातून व्यक्ती, संस्था यांचं सहकार्य लाभलं. यात सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष कै. एकनाथ ठाकूर यांचा मोठा सहभाग होता. यांच्या पुढाकारानी १९९० साली भारतातली पहिली वाचक परिषद ग्रंथालीनं घेतली होती. भारतातली ही सर्वात मोठी घटना आहे असं मला वाटतं. जशी ८२ची यात्रा काढली भारतात पहिल्यांदा, त्यानंतर ८५ला आपल्याकडं एशियाड झालं होतं, एकाचवेळी ५० ठिकाणी स्पोर्टस् सुरू होतं, तशी ग्रंथ प्रदर्शनं आणि कार्यक्रम तीन दिवस सलग ५० ठिकाणी चालू होते.

आज प्रकाशित होणारे खंड डॉ. पी. डी. पाटील यांनी केलेल्या सहकार्यामुळं आम्ही प्रकाशित करू शकलो,

याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. ग्रंथालीचा रोल हा खूप वेगळा आहे. वाचक आणि लेखक यांच्यातील दुवा आहे. रसिकांपर्यंत उत्तम पुस्तके, कार्यक्रम नेऊन जाणीवा जागृत करण्याचे काम ग्रंथाली करत आहे. आजच्या तीन खंडांचे प्रकाशन महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभागातर्फे व्हावे ही आमची इच्छा होती. याच मराठी भाषेसाठी सुभाष देसाई सरांनी लगेच होकार दिला. तसेच मराठी विभागाचे सचिव भूषण गगराणी यांनी नेहमीप्रमाणे सहज सहकार्य केले. त्यांचे अधिकारी, सहकारी यांचं सहकार्य लाभलं, त्याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो.

ग्रंथालीचं काम १९८३पासून सुरू झालं. मराठी अभ्यास परिषदेने पाच खंड काढले होते. ते पाच खंड ग्रंथालीनं प्रकाशित केले होते. आणि त्या काळात आम्ही स्टीकरही काढले होते. शिव्या द्या पण मराठीत द्या, गोड बोला मराठीत बोला, अशी पाच प्रकारची स्टिकर्स आम्ही काढली होती आणि महाराष्ट्रभर डिस्ट्रिब्यूट केली होती. त्यानंतर ग्रंथालीने सुरेश वाघे यांचा संकल्पना कोष हा प्रकाशित केला. त्याला





डॉ. रमेश अंधारे संपादित 'मोहरा महाराष्ट्राचा' या ग्रंथाचे सुभाष देसाई, डॉ.पी.डी. पाटील, राजीव खांडेकर, अरुण शेवते व सुदेश हिंगलासपूरकर प्रकाशन करताना.

महाराष्ट्र शासनाचा पहिला पुरस्कार मिळाला आणि आता तेच ग्रंथालीला कारीगर सोशलचे पाच खंड करून देणार आहेत. जर्मनसोबत माय मराठी भाषा शिकण्याचा प्रकल्प जो होता, त्याचा पहिला भाग हा ग्रंथालीनं काढला आणि त्यानंतर पुढील भाग शासनाच्या मराठी भाषा विभागाने काढले आहेत. आता ग्रंथाली २०२४ला आपली पन्नाशी पूर्ण करणार आहे. या मधल्या काळात ग्रंथाली काय काय करणार आहे याबद्दल थोडक्यात सांगतो.


ग्रंथाली पुढील काळात पाच बोली भाषांचे कोष करणार आहे आणि पाच आदिवासी भाषांचे कोष करणार आहे. दागिन्यांचा कोष प्रसिद्ध केला जाईल. आत्ता आमचं आगरी भाषेवरचं काम सुरू आहे आणि दागिन्यांवरील कोषाचंही काम सुरू झालेलं आहे. उरलेली कामं काही काळात सुरू होतील. यावेळी पी. डी. पाटील साहेबांनी जशी आम्हाला मदत केली, तशी चांगली मंडळी आमच्याकडं येतील, आम्हाला सपोर्ट करतील आणि चांगलं काहीतरी ग्रंथालीला करता येईल. पन्नासावा वाचक दिन आपण जोरात साजरा करू. ग्रंथाली १९८३पासून दर दोन वर्षांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन होतं, त्याला ती सातत्यानं जात असते. यावर्षी अधिवेशन ऑगस्टमध्ये होणार आहे. ग्रंथाली आपला स्टॉल घेऊन जाणार आहे. जसं ह्युस्टनला अधिवेशन होतं, त्यावेळी पु.लं.चा ७५वा वाढदिवस होता. त्यांची आम्ही ७५ छायाचित्रं, त्यांची पुस्तकं, ऑडिओ-व्हिडिओची कॅसेट्स हे सगळं साहित्य आम्ही तिथं ह्युस्टनला घेऊन गेलो होतो. तर यावर्षी अशोक सराफ यांचा ७५वा वाढदिवस आहे. तर त्यांची आम्ही ७५ छायाचित्रं निवडलेली आहेत. त्यांची आम्ही

मी बहुरूपी हे पुस्तक प्रकाशित केलेलं आहे. त्याशिवाय त्यांच्यावर वीस मिनिटांची फिल्म तयार केली आहे. तर ती फिल्म आणि काही चांगली पुस्तकं, नुसतीच ग्रंथालीची नाहीत, अन्य प्रकाशनांची जी चांगली पुस्तकं आली आहेत ती सगळी घेऊन आम्ही आमचा स्टॉल घेऊन जाणार आहोत.




ग्रंथालीचं हे ४७वं वर्ष आहे. आम्ही साडे बाराशेहून अधिक पुस्तकं प्रकाशित केलेली आहेत. दरमहा आम्ही शब्द रूची मासिक प्रकाशित करतो, त्याची वार्षिक वर्गणी ४०० रूपये आहे. तुम्ही जर ती भरलीत, तर ग्रंथालीच्या संपर्कात राहू शकता. दोन आम्ही विशेषांक काढतो. दिवाळी अंक आम्ही प्रसिद्ध करतो. असे तुम्हाला अकरा चांगले अंक मिळतात. एकत्रित जर हजार रूपये भरले तर तुम्हाला तीन वर्षे अंक घरी येत राहतील. ग्रंथाली बलुतं या पुस्तकाच्या नावाने दरवर्षी पुरस्कार देते. पंधरा हजार रूपये रोख रक्कम असते आणि गोधडी असते. अरूण साधूंच्या नावे आम्ही दरवर्षी तरूण पत्रकाराला दीड लाखाची फेलोशीप देतो आणि त्यातनं जे काही साहित्य निर्माण होतं त्याची पुस्तकं केली जातात.




१ मे २०१९पासून ग्रंथाली डिजिटल माध्यमात आलेली आहे. याद्वारे आम्ही ग्रंथालीचं यू-ट्यूब वॉच हे चॅनेल सुरू केलेलं आहे. त्याच्यावर आत्ता आम्ही तीन कार्यक्रम सादर करतो. पहिला कार्यक्रम म्हणजे साहित्याच्या पारावर. दोन लेखक आणि दोन वाचक यात सहभागी होतात. लेखक आपल्या पुस्तकाबद्दल बोलतो आणि वाचक त्यांनी पुस्तकं वाचलेली असतात, त्याबद्दल आपली प्रतिक्रिया नोंदवतो. दुसरा जो आमचा कार्यक्रम आहे, तो राजू श्रीखंडे सादर करतात. जागतिक साहित्याची अभिजात ओळख तो मराठीतून करून देतो. ग्रामीण भागातली मुलं चांगली शिकलेली आहेत आणि त्यांना जगातील सााहित्याची ओळख व्हावी, काय वाचलं पाहिजे हे समजावं या हेतूनं आम्ही हा कार्यक्रम सुरू केला आहे. याचे आम्ही एकूण शंभर भाग करणार आहोत. या कार्यक्रमाचं नाव आहे ग्लोकल साहित्य सफर. तिसरा जो आमचा कार्यक्रम आहे, तो संजिवनी खेर सादर करतात. देशी-विदेशी महिला लेखिकांच्या अभिजात साहित्याचा परिचय करून देणाऱ्या या कार्यक्रमाचं नाव आहे ग्लोकल लेखिका. याचे आम्ही आत्तापर्यंत सतरा भाग केलेले आहेत. याचेही शंभर भाग करणार आहोत. ऑगस्टपासून या चॅनेलवर आम्ही आणखी दोन कार्यक्रम सुरू करणार आहोत. एकूण पाच कार्यक्रम या चॅनेलवर होतील. हे सगळे कार्यक्रम विनामूल्य आहेत. अशा प्रकारची ग्रंथाली विविध कार्यक्रम करत असते आणि आपला प्रवास चालू ठेवलेला आहे.

■■



Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
A project by
MAGARPATTA CITY

# येवा, आसाम आपलाच आहे!!!




महाराष्ट्रातील फितुरांनी प्रथम गुजरात गाठले आणि त्यानंतर थेट ते आसामची राजधानी गुवाहाटी येथे जाऊन दडून बसले.

गुवाहाटीहून ते प्रथम गोव्यात आले आणि मग त्यांनी मुंबईत पाय ठेवले आणि




भाजपच्या सुरक्षा कवचाखाली त्यांनी आपली गद्दारीची मोहिम पूर्ण करुन आपल्या कार्यभाग साधून घेतला. हे बंडखोर आसामला म्हणजेच गुवाहाटीला गेलेच कसे?

आता त्याबद्दलही तर्कवितर्क होणारच ना?

पहिला योगायोग!

आसामचे सध्याचे मुख्यमंत्री हिमांत बिश्श शर्मा हे एक फुटीरच आहेत.

काँग्रेस पक्षाशी विश्वासघात करुन ते भाजपमध्ये सामील झाले. पाच वर्षे भाजपमध्ये काढल्यानंतर त्यांना मुख्यमंत्री करण्यात आले. त्यामुळे शिवसेनेच्या फुटीरांना दुसऱ्या फुटीराने आश्रय देणे यात काही आश्चर्यच नव्हते.

बाहेरुन आलेल्याला मुख्यमंत्रीपद आणि भाजपच्या एकनिष्ठाला पदावनती हा प्रकार आसाममध्ये देखील झाला.

आसाममध्ये भाजपचे सर्वानंद सोनोवाल मुख्यमंत्री होते. परंतु विधानसभा निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर देखील त्यांना मुख्यमंत्रीपद नाकारुन विलक्षण महत्वाकांक्षी अशा हिमांत बिश्श शर्मा यांना भाजपने मुख्यमंत्री केले व सोनावाल यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देऊन राज्यातून गच्छंति केली.

असे अनेक योगायोग सांगता येतील. परंतु ही सर्व फुटीर मंडळी जेव्हा गुवाहाटीमधील पंचतारांकित आतिथ्यावर ताव मारत होती तेव्हा खुद्द आसामच्या जनतेवर कोणती आपत्ती कोसळली होती?

पावसाळा सुरु झाल्यानंतर आसाम आणि बिहार या राज्यांवर महापुराचे संकट सतत येतच राहते.



पावसाळ्याच्या सुरुवातीच्या तडाख्यातच आसामच्या जनतेला महापुराच्या संकटाचा वेढा पडला आणि जनता हवालदिल झाली.

पण फितुरी करुन आसामचे मुख्यमंत्री झालेले शर्मासाहेब काय म्हणत होते? त्यांनी महाराष्ट्रातील फुटीरांची










भलावण करताना म्हटले की या मंडळींच्या गुवाहाटीमधील वास्तव्याचा आसामला फारच मोठा फायदा झाला. त्यांच्या फितुरीच्या बातम्या राष्ट्रीय पातळीवर रोज झळकत होत्या आणि त्यामध्ये ते वास्तव्याला असलेल्या आसाम, गुवाहाटी आणि हॉटेलचाही उल्लेख होत होता, त्याची सर्व दृष्ये लोकांना पाहण्यास मिळत होती. याचा फायदा आसाममधील पर्यटन व्यवसायाला होईल. या कारणामुळे पर्यटकांसाठी आसामची आपोआपच मोठी जाहिरात झालेली आहे आणि त्याचा लाभ आम्हाला मिळेल अशी आशा आहे!

पहा, कुणाला कशात फायदा दिसतो ते!

म्हणजे, कुणी राजकीय व्यभिचार केलेला आहे, फंदफितुरी केली आहे याचे सोयरसुतक किंवा लज्जा वाटण्याचे दूर, यामुळे आपल्या राज्याच्या पर्यटन क्षेत्राला फायदा होण्यात हे दुसरे फुटीर मुख्यमंत्री आनंद मानून टाळ्या पिटत होते!




व्वा व्वा, काय पण राजकारणाची तऱ्हा!

एकाने या महा-फुटीरांवर टिप्पणी करताना म्हटले की भाजपने या फितुरांना खरे तर श्रीनगरमध्ये ठेवायला हवे होते. तो केंद्रशासित प्रदेश असल्याने थेट केंद्राचेच सुरक्षा कवच त्यांना मिळाले असते आणि त्यांनाही भूतलावरील किंवा भारतातील नंदनवनाची सैर करण्याची संधी मिळाली असती.

परंतु अजुन भाजपचेच नेते तेथे जायला कचरतात तेथे हे फुटीर किंवा फितूर जाण्याचे धाडस कसे करतील?

या फुटीरांना सुरुवातीला गुजरात किंवा गोव्यातही ठेवण्याचे योजण्यात आले होते. परंतु कदाचित चिडलेले शिवसेना कार्यकर्ते तेथे पोहोचू शकतील या भीतीने त्यांना तिकडे दूर लांब गुवाहाटीला ठेवण्यात आले.

तेथेही भाजपचे सरकार असल्याने 'येवा आसाम आपलाच आहे' असे म्हणत हे फितूर तिकडे आश्रयाला गेले!

# खरी तुकडे तुकडे गँग कोण??

जागतिक पातळीवर शीतयुध्द चालू असताना अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय संबंधाविषयक तज्ञ व विश्लेषक जीन कर्कपॅट्रिक यांनी भारत आणि भारतीय उपखंडाच्या संभाव्य शकलांचा सिध्दांत मांडला होता. कदाचित नव्या जागतिक रचनेत तो अप्रस्तुतही मानला जाईल. कारण हा सिध्दांत मांडला त्यावेळी अमेरिका व चीनचा मधुचंद्र चालू होता. आता परिस्थिती उलट आहे. अमेरिकेला मजबूत भारताची गरज सध्या निर्माण झाली आहे व ती देखील चीनच्या विरोधात!

कर्कपॅट्रिक यांचा सिध्दांत मागे पडलेला असला तरी आपल्या देशातील 'स्वदेशी कर्कपॅट्रिक'नी 'लहान राज्ये व बळकट केंद्र' ही कल्पना सोडलेली नाही. ही स्वदेशी मंडळी म्हणजे रा.स्व.संघ! हा सिध्दांत प्रत्यक्षात आणण्याचे स्वप्न हा परिवार मनाशी बाळगून आहे.




तुम्ही म्हणाल पुरावा काय?

ठीक आहे, हा घ्या पुरावा!

कर्नाटकचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री उमेश कट्टी यांनी नुकतेच एक विधान केले व त्यामध्ये त्यांनी आगामी काळात कर्नाटकचे विभाजन करण्याची गोष्ट जाहीरपणे बोलून दाखवली. दक्षिण व उत्तर अशी कर्नाटकची विभागणी करण्याची कल्पना त्यांनी बोलून दाखवली.

२०२४मध्ये केंद्रात पुन्हा नरेंद्र मोदी यांना निवडून दिल्यास हे विभाजन करण्यात येईल असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले अशा स्पष्टोक्तीची प्रतिक्रिया होणे अपेक्षितच होते.

विशेषतः दक्षिण कर्नाटकात त्याबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटली. नागरिकांनी उत्स्फुर्तपणे या विधानाच्या विरोधात निषेध प्रकट केला.

कर्नाटकातील दोन प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाला तर भाजपच्या विरोधात आयते हत्यारच मिळाले.

माजी मुख्यमंत्री सिद्रामय्या यांनी तर अत्यंत कडवट प्रतिक्रिया देताना, 'हे माता, मातृभूमि आणि मातृभाषेचे विभाजन व विश्वासघात आहे' असे म्हटले.






प्रकरण आणखी पेटण्यापूर्वीच मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी हस्तक्षेप करुन उमेश कट्टी यांच्या विधानात तथ्य नाही आणि कर्नाटकाचे विभाजन केले जाणार नसल्याचे स्पष्ट करुन विरोध व निषेध वाढण्यापूर्वीच त्यास आवर घातला.

परंतु भाजप व संघ परिवाराच्या अशा विधानांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

ते त्यांच्या मनातील कल्पना काळजीपूर्वक आणि योजनाबध्द रीतीने अमलात आणत असतात.

आता महाराष्ट्राचेच उदाहरण घ्या. भाजपला वेगळा विदर्भ हवा आहे. असा तुकडा पाडल्याने महाराष्ट्राची लोकसभेतील ताकद व संख्याबळ कमी होईल. महाराष्ट्र सध्या उत्तर प्रदेशा खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे आणि तो दर्जा व स्थानच या तुकडे करण्यामुळे नष्ट होणार आहे. त्याचबरोबर भाजपचे काही छटाक नेते मुंबईला केंद्रशासित करुन ती महाराष्ट्रापासून तोडण्याचे कारस्थान रचत आहेत.

त्यांनी तसे एक सादरीकरणही गृह मंत्रालयाला केले आहे.

थोडक्यात काय तर ज्या सरदार वल्लभभाईंचा अतिउंच पुतळा उभारुन त्यांचा वारसा मिरवण्याचे ढोंग जी मंडळी करीत आहेत त्यांना वल्लभभाईंनी संस्थाने खालसा करुन हा देश एकत्रित केला याचा विसर पडला आहे आणि हा संघ परिवार पुन्हा एकदा लहालहान राज्ये निर्माण करुन देशाचे तुकडे करायला सरसावला आहे.

त्यामुळे या देशात खऱ्या अर्थाने 'तुकडे तुकडे गँग' कोण आहे हे जनतेने ओळखण्याची वेळ आली आहे!

त्याचप्रमाणे शिवसेनेचे जे फुटीर भाजपला जाऊन मिळाले आहेत त्यांनीही महाराष्ट्राचे तुकडे करणाऱ्यांशी हातमिळवणी केली त्याबद्दल पश्चाताप करण्याची वेळ आल्याखेरीज राहणार नाही.

दिल्लीतले राज्यकर्ते आणि संघ परिवाराने डाव्या लोकशाहीवादी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांसाठी 'तुकडे तुकडे गँग' अशी संज्ञा प्रचलित केली आहे कारण ही मंडळी जम्मू-काश्मीरमध्येही लोकशाही मार्गाने परिवर्तन करु इच्छितात. भाजप व संघ परिवाराला अर्थातच असले अतिलोकशाही मार्ग पसंत नाहीत हे उघड आहे. त्यामुळेच अशा उदारमतवाद्यांची 'तुकडे तुकडे गँग' म्हणून हेटाळणी करण्याचा प्रचार ही भाडोत्री प्रचारकी मंडळी नेहमीच करीत असतात.

पण, देशाचे खऱ्या अर्थाने तुकडे करणारी मंडळी कोण हे आता समजून घ्यावे लागेल.



# व्यथा कुणाची कथा कुणाला???

अरे चकित झालात?

'कथा कुणाची व्यथा कुणा' या वाक्प्रचाराऐवजी हा उलटा प्रकार कशाला असा प्रश्न पडला असेल!

त्यासाठीच ही कथा!

महाराष्ट्रात जे ताजे तोडफोड, मोडतोडीचे राजकारण झाले त्यापासून कुणाला प्रेरणा मिळाली असावी?

उत्तर माहिती आहे?

बिहारमधल्या आमदारांना!

बिहार विधानसभेत भाजप, राष्ट्रीय जनता दल आणि मुख्यमंत्री नीतीशकुमार यांचा संयुक्त जनता दल या तीन पक्षांचे संख्याबळ वैशिष्ट्यपूर्ण आहे. भाजपचे संख्याबळ ७७ तर राष्ट्रीय जनता दलाचे संख्याबळ ७६ होते. परंतु नुकताच एमआयएमच्या चार आमदारांनी राष्ट्रीय जनता दलात प्रवेश केल्याचे जाहीर केले व त्यामुळे आता राष्ट्रीय जनता दलाचे संख्याबळ आता ८० झाले आहे आणि आता बिहार विधानसभेत सर्वाधिक संख्याबळाचा पक्ष झाला आहे. नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाचे संख्याबळ ४३ आहे. भाजप, नीतीशकुमार आणि अन्य पक्षांच्या 'महागठबंधन'चे संख्याबळ १२७ आहे तर राष्ट्रीय जनता दलासह विरोधी पक्षांचे संख्याबळ ११५ आहे.






महाराष्ट्रात ज्या प्रकारे फाटाफूट झाली आणि नवीन सरकार स्थापन झाले त्या सर्व घडामोडींनंतर बिहारमधील आमदारांनी बोलक्या प्रतिक्रिया व्यक्त करताना बिहारमध्येही या धर्तीवर काही गडबड होऊ शकते असे भविष्य वर्तविले आहे.

बिहारमध्ये गेल्या काही महिन्यांपासून नीतीशकुमार आणि भाजपमधील संबंध तणावले आहेत.

ओबीसी जनगणना असो किंवा अग्निपथ किंवा अग्निवीर योजना असो नीतीशकुमार यांनी भाजपपेक्षा वेगळी भूमिका घेऊन आपली नाराजी, नापसंती आणि आपण भाजपपेक्षा वेगळे असल्याचे सातत्याने दाखवून दिले आहे.

भाजपने आपले संख्याबळ अधिक असूनही केवळ दिलेल्या शब्दाखातर नीतीशकुमार यांना मुख्यमंत्रीपद देण्याचे उपकार केले आहेत.

नीतीशकुमार यांना त्या उपकाराचे ओझे आहेच आणि त्याहीपेक्षा त्यात असलेली मानहानीची भावनाही दिवसेंदिवस असह्य होत आहे. त्यामुळेच ते वेळोवेळी भाजपपेक्षा वेगळी भूमिका घेऊन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याचे प्रयत्न करीत असतात.

त्यामुळेच महाराष्ट्रातल्या घडामोडींनंतर बिहारच्या आमदारांनी त्यापासून प्रेरणा घेण्याबद्दल जी विधाने करण्यास सुरुवात केली आहे ती सूचक मानावी लागतील.

बिहार हे अति-राजकारण-प्रेरित राज्य आहे व तेथील जनताही अति-राजकारण-प्रिय आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा कित्ता बिहारमध्ये गिरवला जातो की काय अशी शंका आता येऊ लागली आहे. प्रतीक्षेत राहू!

# हा दैवाचा खेळ निराळा........!

राजकारणात दिवस फिरायला वेळ लागत नाही.

महाराष्ट्रातील घडामोडींनतर ते आणखी विशेषत्वाने ठसले गेले आहे.

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचेच उदाहरण घेऊ या.

काँग्रेसमध्ये राहूल व प्रियंका गांधी यांच्याकडे निर्णायक अधिकार आल्यानंतर गेहलोत यांना पक्षात फारसे कुणी विचारीनासे झाले.

राजस्थानातील मुख्यमंत्रीपदाचे दावेदार व तरुण काँग्रेसनेते सचिन पायलट यांनी एकदा त्यांच्या विरोधात केलेल बंड फसले होते.

पायलट यांना राहूल व प्रियंका यांचा पाठिंबा होता.

गेहलोत यांनी हा पेचप्रसंगही चतुराईने हाताळला परंतु ते दुखावले गेले होते.

एवढे दुखावूनही त्यांनी कधीही राहूल किंवा प्रियंका यांच्याबद्दल चकार शब्दानेही नाराजी व्यक्त केली नाही. त्यांनी मुकाट्याने राजस्थानचा राज्यकारभार करणे पसंत केले.

या परिस्थितीतच काँग्रेसने उदयपूरला चिंतनशिबिर घेतले.

तेथे त्यांनी यजमान म्हणून काँग्रेसच्या नेत्यांची उत्कृष्ट बडदास्त ठेवली. हे चिंतनशिबिर यशस्वी झाले.


यानंतर राहूल आणि सोनिया गांधी यांच्या विरोधात नॅशनल हेराल्ड प्रकरणात ईडीच्या नोटिसा आल्या. त्याविरुध्द काँग्रेस पक्षाने आंदोलन केले. यामध्ये काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांची भूमिका महत्वाची होती.

अशोक गेहलोत यावेळीही आघाडीवर राहिले.



दिल्लीत त्यांनी स्वतः निषेध मोर्च्याचे नेतृत्व केले. एवढेच नव्हे तर दिल्लीत काँग्रेसतर्फे जी आंदोलने व निदर्शने झाली





त्यात सर्वाधिक काँग्रेस कार्यकर्ते हे राजस्थानातील होते.

सर्वसाधारणपणे काँग्रेसचा दिल्लीत काही कार्यक्रम असल्यास कार्यकर्ते आणि गर्दी जमविण्यात हरयानाचे नेते भुपिंदरसिंग हुड्डा हे नेहमी बाजी मारत. पण यावेळी गेहलोत यांनी बाजी मारली. गेहलोत आताच्या नेत्यांमध्ये एक वरिष्ठ नेते म्हणून गणले जातात आणि त्यांनी जो पुढाकार घेतला त्यामुळे काँग्रेस पक्षश्रेष्ठी संतुष्ट झाले यात शंका नाही.

या सर्व गोष्टीत गुलाम नबी आझाद व आनंद शर्मा यांच्यासारखे वरिष्ठ नेते पार निष्प्रभ ठरले. अगदी कमलनाथ देखील!

या नव्या परिस्थितीत गेहलोत यांच्या बरोबरीने पी.चिदंबरम, छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल, रणदीप सुरजेवाला, अजय माकेन, शक्तिसिंह गोहिल, जयराम रमेश, वेणुगोपाल ही नेतेमंडळी आघाडीवर दिसून येऊ लागली आहेत.

त्यामुळे आता काँग्रेसच्या या नव्या अवतारात कुणाला महत्व मिळू लागले आहे हेही यानिमित्ताने स्पष्ट झाले.

# नुपुर शर्माचा फायदा कुणाला?

नुपुर शर्मा या भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्त्या होत्या. त्यांनी प्रेषित महमंद पैगंबर यांच्यासंदर्भात केलेल्या अनुचित उद्गारांनंतर केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्याची प्रतिक्रिया उमटली. आखाती देशांनी तर भारतीय मालावर बहिष्कार टाकण्यापासून भारतीयांना नोकऱ्यांमधून काढून टाकण्यापर्यंत इशारे दिले. अनेक इस्लामी राष्ट्रांनी भारताच्या राजदूतांना पाचारण करुन अधिकृत निषेध नोंदवले.

या आंतरराष्ट्रीय प्रतिक्रियांनंतर भारतातले कोडगे सरकार जागे झाले.

तोपर्यंत त्यांनी नुपुर शर्माच्या वक्तव्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष चालू ठेवले होते.

आता सर्वोच्च न्यायालयाने या महिलेला देशाची माफी मागण्यास सांगितले आहे.

पण......................!

या महिलेचे समर्थक अजुनही अस्तित्वात आहेत.

जेव्हा या महिलेला भाजपच्या प्रवक्तेपदावरुन काढून टाकण्याचे नाटक करण्यात आले तेव्हा ही कट्टरपंथी मंडळी भाजपवर विलक्षण खवळली होती. परंतु आपलेच दात आणि आपलेच ओठ! त्यांनी या कारवाईबद्दल नाराजी व्यक्त केली पण मोदी-शहा जोडगोळीवर थेट टीका करण्याचे हुशारीने टाळले.

पण हे कट्टरपंथी देखील कोडग्यांचे राजे शोभावेत!

त्यांनी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांची प्रशंसा करण्यास सुरुवात केली. आदित्यनाथ हे कसे हिंदुत्वाचे खरे रक्षणकर्ते आहेत आणि त्यांनी त्यांच्या राज्यात हिंदूंना कसा सन्मान प्राप्त करुन दिला आहे वगैरे आशयाच्या पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर टाकून भाजपबद्दलची आपली नाराजी व्यक्त करण्यास प्रारंभ केला. आदित्यनाथ हेच हिंदू समाज व हिंदुत्वाचे रक्षणकर्ते असल्याचे सांगून त्यांनी मोदी-शहा यांना आपले मत कळविले.






बहुधा त्यामुळेच या बेताल महिलेविरुध्द जी पोलिसी कारवाई होणे अपेक्षित होते ती मोदी सरकारने केली नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्याबद्दलही टिप्पणी करताना इतर कुणी काही वक्तव्य केल्यास त्या व्यक्तीच्या विरोधात तत्काळ कारवाई होते परंतु या महिलेच्या विरुध्द अधिकृत कारवाई केली जात नाही याचा अर्थ तिला सत्तेचे पाठबळ आहे असा निघतो का आणि त्यामुळे ही महिला बेमुर्वतखोरपणे कारवाईला आव्हान देते काय असा सवाल केला आहे. कट्टरपंथींनी केलेल्या आदित्यनाथ यांच्या स्तुतीने भाजपमध्ये अस्वस्थता वाढणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच भाजप नेतृत्वाने आदित्यनाथ यांना त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या

कारकिर्दीत उत्तम प्रशासक म्हणून राज्यकारभारावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पण आदित्यनाथ हे स्वयंभू असल्याने त्यांनी तो सल्ला जुमानलेला नाही आणि त्यांच्या राजवटीचे प्रतीक असलेल्या बुलडोझरच्या साह्याने ते कारभार करीत आहेत. एकेकाळी हुकुमशाहीचा वरवंटा असे म्हटले जात असे. आता वरवंट्याची जागा बुलडोझरने घेतली आहे असे म्हणावे लागेल!

## दिल्लीत नायब राज्यपालांचा शब्द अंतिम

दिल्ली हे देशातले महानगरीय राज्य (मेट्रोसिटि स्टेट) आहे.

सिंगापूर हे देखील याच स्वरुपाचे आहे. दिल्लीला विधानसभा आहे परंतु पूर्ण राज्याचा दर्जा नाही.

कायदा व सुव्यवस्था, नगरविकास यासारखी खाती केंद्राच्या अधिकारात येतात. तसेच येथे नायब राज्यपालांचा शब्द अंतिम मानला जातो.

मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ असूनही त्यांना मर्यादित अधिकारच आहेत. यामुळे दिल्लीतले केजरीवाल सरकार आणि नायब राज्यपाल यांच्यातील संघर्ष हा एक नियमित प्रकार झालेला आहे.

सिंगापूरच्या धर्तीवर दिल्लीचा विकास करण्यासाठी सिंगापूर दौऱ्याचा निर्णय मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला.

परंतु काही महिने होऊनही नायब राज्यापालांनी त्यांच्या या दौऱ्याला संमती दिलेली नाही.

यावरुन केजरीवाल व त्यांच्या आम आदमी पार्टीने नायब राज्यपालांना टीकेचे लक्ष्य केले आहे.

भाजपच्या मंडळींचे म्हणणे आहे की आम आदमी पार्टीचे नेते मुद्दाम परदेशात निरनिराळ्या कारणांनी जातात आणि स्वतःची टिमकी वाजवून येतात. भाजपच्या पोटात असे दुखण्याचे कारण म्हणजे आम आदमी पार्टीची परदेशस्थ भारतीयांमधील लोकप्रियता हे आहे.

आम आदमी पार्टीला परदेशी भारतीयांनी आर्थिक आणि इतरही प्रकारची मोठी मदत केलेली आहे.

त्यामुळेच या पक्षाचे नेते वेगवेगळ्या मिषाने परदेशात जाऊन स्वतःचा भाव वाढवून येतात अशी भाजपची पोटदुखी आहे. त्यामुळेच अरविंद केजरीवाल यांचा सिंगापूर दौरा होऊ नये यासाठी भाजपने नायब राज्यपालांच्या मार्फत खोडे घातलेले आहेत. आता या मुद्यावरुन दिल्लीत पुन्हा एकदा नायब राज्यपाल आणि आम आदमी पार्टीत धुमश्चक्री सुरु झाली आहे.

भाजपच्या या अत्यंत कोत्या व संकुचित राजकारणाचा फटका सर्वच विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांना बसत आहे.

दिल्ली त्याला अपवाद नाही.

अशा धादांत कोत्या मनाच्या राज्यकर्त्यांचे काय करायचे याचा विचार करायची वेळ आली आहे! ■■



# पक्ष सोडणाऱ्यांबद्दल आमच्या मनात प्रेमाचीच भावना : खासदार सुप्रिया सुळे यांचे उद्गार



**मुंबई–** जे सगळे आज पुढे येऊन बोलत आहेत ते आधी राष्ट्रवादीतच होते हे विसरुन चालणार नाही. आम्ही नात्यात कधी कटुता आणू दिली नाही. जरी पक्ष सोडून गेले तरी आमच्या मनात त्यांच्याविषयी प्रेमाच्याच भावना राहतील अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मांडली.

आपल्या नेत्याच्या, वडीलांच्या आयुष्यात एखादा माणूस दोन मिनिटाचा आनंदाचा क्षण देऊन गेला असेल तर मी कधीही त्या व्यक्तीच्या विरोधात बोलणार नाही कारण माझ्या आईची व मला महाराष्ट्रातील संस्कृतीची जाणीव आहे. ज्या नात्यामध्ये कधीतरी एकत्र एका ताटात जेवलो असू त्या मिठाला जागायची सवय आहे असे सांगतानाच माझी स्वतःची संस्कृती हेच छत्रपतींनी मला शिकवले आहे त्यामुळे वेदना एकाच गोष्टीची होते की जे लोक अनेक वर्षे राष्ट्रवादीत होते आम्ही त्यांचा मानसन्मानच केला व प्रेमाचं नातं ठेवले माझ्या मनात त्यांच्याविषयी कालही प्रेम होते आणि आजही आहे व उद्याही राहिल असेही सुप्रियाताई सुळे यांनी स्पष्ट केले. नाती व सरकारे टेलिव्हिजनवर चालत नाही. ज्या काही मागण्या असतील त्या समोरासमोर मांडल्या पाहिजेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव आपण घेतो तर संविधानाचा आपल्याला सार्थ अभिमान

* आम्ही नात्यात कधी कटुता आणू दिली नाही. जरी पक्ष सोडून गेले तरी आमच्या मनात त्यांच्याविषयी प्रेमाच्याच भावना राहतील.
* एकत्र एका ताटात जेवलो असू तर त्या मिठाला जागायची सवय आहे...
* नाती व सरकारे टेलिव्हिजनवर नाही तर समोरासमोर चर्चा करुन टिकतात...
* उध्दव ठाकरे यांनी मोठा भाऊ म्हणून पोटात घेण्याची दानत दाखवली आहे याच्यापेक्षा काय हवं अजून...

असला पाहिजे. त्यामुळे संविधानाच्या मार्गाने जायला नको का? छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेता मग समोरासमोर बसले पाहिजे ना जी काही मते असतील किंवा नसतील ती संविधानाने जगावी टेलिव्हिजनने नाही ओ, असे खडेबोल खासदार सुप्रियाताई सुळे यांनी बंडखोर आमदारांना सुनावले आहेत. तुम्ही लोकप्रतिनिधी आहात. नाती असतात, जबाबदाऱ्या असतात. माझे मतभेद असतीलही परंतु चर्चेतून मार्ग निघतो. चर्चा तर झाली पाहिजे नाहीतर ती दडपशाही होते. एखादं मुल रुसलं म्हणा... चूकलं म्हणा परंतु आज उध्दव ठाकरे मोठा भाऊ म्हणून पोटात घेण्याची दानत दाखवत आहेत. मोठा भाऊ सगळं विसरुन... पोटात




घ्यायला तयार असेल तर याच्यापेक्षा काय हवं अजून असे सांगतानाच संविधानावर देश चालतो त्यामुळे चर्चा करा असे आवाहनही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केले.

खासदार संजय राऊत यांना ईडीची नोटीस आली यावर बोलताना हे दुर्दैवी आहे. ईडी ही पाच वर्षापूर्वी कुणाला माहीत होती. मात्र आज गावापर्यंतही ईडी माहीत झाली आहे अशी खोचक टीकाही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केली आणि एकंदरीत केंद्रीय यंत्रणांच्या दुरुपयोगाबद्दल तीव्र नाराजीही व्यक्त केली.

## पुस्तकांची संततधार...

# यशवंतराव चव्हाण सेंटरची पुस्तकदूत योजना


**रविंद्र झेंडे,** समन्वयक,पुस्तकदूत योजना

महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात यशवंतराव चव्हाण सेंटरचं मोलाचं योगदान आहे. स्थापनेपासून एक विहितकार्य म्हणून सेंटर साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात नियमित आणि नेटाने सहभागी होत आहे. वाचनसंस्कृती जोपासत आहे. वाचणारा आणि विचार करणारा समाज घडवा यासाठी प्रयत्नशील आहे. आपले कार्यक्रम आणि उपक्रम केवळ समारंभी न राहता त्यातून महाराष्ट्राच्या एकंदर सांस्कृतिक व्यवहारात एक सकारात्मक बदल घडावा असा सेंटरचा कटाक्ष असतो. यशवंतराव चव्हाण सेंटरची पुस्तकदूत योजना हे त्याचेच एक उदाहरण आहे.

मला भेटायला येताना पुष्पगुच्छ अथवा भेटवस्तू आणू नये,आणि आणायचीच असतील तर भेट म्हणून पुस्तकं द्यावीत, असं सुप्रिया सुळे यांनी जाहीर केलं आहे. त्यामुळे ताईंकडे भेट म्हणून आलेल्या पुस्तकांचा ओघ सुरु झाला आहे. ही पुस्तकं योग्य वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी

चव्हाण सेंटरने 'पुस्तकदूत' ही योजना सुरु केली आहे. मा.खा. सुप्रिया सुळे आणि आदरणीय शरद पवार साहेब यांना भेट म्हणून मिळालेली पुस्तके इच्छुक वाचकांपर्यंत विनामुल्य पोहोचवणं असे या योजनेचे मुळ स्वरूप आहे. आलेली पुस्तकेवाचून आणि पाहून झाल्यावर सुप्रियाताई ती पुस्तके सेन्टरच्या ग्रंथालयाकडे सुपूर्द करतात. तिथे त्यांची छाननी आणि वर्गवारी करून वाचकांना देण्यायोग्य पुस्तकांची यादी केली जाते.

या योजनेचे स्वरूप असे आहे;दर महिन्यातून दोनवेळा उपलब्ध पुस्तकांची यादीयशवंतराव चव्हाण सेन्टरच्या फेसबुक पेजवर प्रसिद्ध केली जाईल. एका वाचकाला एकाच पुस्तकाची मागणी नोंदवता येईल. पुस्तिका स्वरूपातील साहित्य किंवा कमी पानांची पुस्तकं असल्यास एका क्रमांकावर एकत्रित २०० ते २५० पानांच्या पुस्तकांचा संच उपलब्ध असेल. एक वाचकाला एकाच पुस्तकाची किंवा एकाच संचाची मागणी करता येईल. पोस्ट प्रसिद्ध होताच खाली कॉमेंट करून वाचकांनी आपली मागणी नोंदवायची आहे. यादीत पुस्तकाच्या नावाआधी असलेला क्रमांक हा पुस्तकाचा किंवा पुस्तक संचाचा क्रमांक आहे. कॉमेंट करताना या पुस्तक क्रमांकाचा उल्लेख असणं जरुरी आहे.पोस्ट वरील कॉमेंट्सची छाननी करून,'आधी कॉमेंट करणाऱ्यास आधी' या तत्वावर पुस्तक मिळालेल्या वाचकांची यादी प्रसिद्ध केली जाईल आणि फक्त त्यांनाच पैसे भरण्याचे तपशील कळवले जातील.



यादीमध्ये नाव असलेल्या वाचकांनी पोस्टेज आणि हाताळणी खर्च म्हणून रु. ४५ योजनेच्या अकाऊंटवर ऑनलाईन भरायचे आहेत. पैसे भरल्यावर सात ते दहा दिवसात पोस्टाने पुस्तक घरपोच पोहोचवले जाईल. फक्त यादीत नाव असलेल्या वाचकांशी संपर्क साधला जाईल.


आजवरया योजनेत पहिल्या दोन याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. योजना जाहीर करणारी पहिली पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. जवळजवळ दोन लाख फेसबुक वाचकांनी ती पोस्ट पहिली. पहिल्या यादीतील वाचकांना पुस्तकं रवाना झाली आहेत. आता दुसऱ्या यादीतील पुस्तकं ज्यांना मिळणार आहेत त्यांची नावे जाहीर होणार आहेत. अगदी योजना जाहीर झाल्यापासून ते आजतागायत कार्यकर्ते, चाहते आणि वाचक यांनी या योजनेला उदंड प्रतिसाद दिला आहे. यावर्षीच्या वाढदिवसाला तर कार्यकर्त्यांनी ताईंची पुस्तकतूला करून ती सर्व पुस्तके भेट म्हणून दिली आहेत. दरदिवशी योजनेत पुस्तकांची भर पडत आहे.

अनेक खाजगी संग्राहक,ग्रंथालये आणि विविध संस्था यांना वेळोवळी त्यांच्याकडील अतिरिक्त पुस्तके योग्य वाचकांपर्यंत पोहोचवायची असतात. या पुस्तकांचा पुस्तक दूत योजनेच्यापुढील टप्प्यात समावेश केला जाणार आहे. अशी पुस्तके चव्हाण सेन्टरच्या जिल्हा तसेच विभागीय केंद्रावर स्वीकारली जातील. पन्नासपेक्षा अधिक पुस्तके असल्यास जागेवर जाऊन ही पुस्तके स्वीकारली जातील. याचे तपशील लवकरच जाहीर होतील.

वाचकांची यादी तयार करण्याचे जिकीरीचे काम अभिषेक धनगर (वॉल्डेन बुक स्टोअर) आणि प्रदीप कोकरे( टिंब बुक शॉप) यांनी स्वीकारले आहे. हे दोन तरूण ऑनलाईन पुस्तकविक्री व्यवहारासाठी फेसबुक पेज चालवतात. या दोघानांही चव्हाण सेंटरची साहित्यविषयक फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या अनुभवातून या योजनेला बळ मिळाले आहे.सेंटरचे ग्रंथपाल अनिल पाझारे यांच्या सह, ग्रंथालयसहायक भक्ती आणि अनिल चिंदरकर या योजनेसाठी पुस्तकांची यादी करण्यापासून वाचकांना पुस्तके पोस्ट करेपर्यंत सर्व जबाबदाऱ्या काळजीपूर्वक पार पाडतात. ही योजना दिवसेंदिवस अधिक लोकप्रिय होईल आणि वाचकांना माफक खर्चात दर्जेदार पुस्तकं मिळत राहण्याची संततधार सुरु राहील असा विश्वास आम्हा सर्वांना आहे.

■■

# वाढदिवसानिमित्त सुप्रियाताईंची ग्रंथालय सेलतर्फे 'ग्रंथतुला'



आदरणीय खासदार संसदरत्न सौ.सुप्रियाताई सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे राष्ट्रवादी ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथतुला करण्यात आली. तसेच सन्मानचिन्ह व पुस्तकांची भेट राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्री.उमेश पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. त्याप्रसंगी राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, महिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती विद्याताई चव्हाण, सोशल मिडियाच्या अध्यक्षा आदितीताई नलावडे, ग्रंथालय विभागाच्या प्रदेश समन्वयक सौ.रिता बाविस्कर, जळगाव जिल्हा समन्वयक श्री.विकास पवार, प्रदेश उपाध्यक्ष श्री. अक्रुर सोनटक्के, प्रदेश सरचिटणीस श्री.प्रंशात लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष श्री. महेश उबाळे, प्रदेश सरचिटणीस श्री.राहुल पाटील, ग्रंथ राज्य निवड समिती सदस्य श्री.संतोष दगडगावकर, प्रदेश सरचिटणीस युसुफ चौगुले, ठाणे जिल्हाध्यक्ष श्री. रमेश दिनकर, प्रदेश चिटणीस सौ.पार्वतीताई पवार औरंगाबाद जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र खंडेलवाल, नागपूर जिल्हाध्यक्ष श्री.विशाल गाडबैल, परभणी जिल्हाध्यक्ष श्री. प्रभु वड , युवा नेते श्री.अक्षय पाटील तसेच सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**वाढदिवसानिमित्त खासदार सुप्रिया सुळे यांचा राष्ट्रवादी ग्रंथालय सेलचे राज्य अध्यक्ष उमेश पाटील हे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना, शेजारी विकास पवार, रिता बाविस्कर व इतर मान्यवर.**

# ताटीच्या अभंगांचं काऊन्सिलिंग



**अकरा वर्षांची एक धाकटी बहीण तिच्यापेक्षा चार वर्षांनी मोठ्या भावाला प्रेरणा देते. जगाविषयीची उदासिन वृत्ती काढून नैराश्य घालवते आणि कामाला लावते. जवळपास ७२० वर्षांपूर्वी घडणारं हा प्रसंग बघून आपण आश्चर्यचकीत होतो.**

**सचिन परब**

**योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥**
**विश्व रागें झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ॥**
**शब्दशास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ॥**
**विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥**

हा अभंग आहे, वारकरी संतपरंपरेत प्रसिद्ध असणाऱ्या ताटीच्या अभंगांचा. ही बारा अभंगांची एक मालिका आहे. संत मुक्ताबाईंचे हे अभंग तत्त्वज्ञानाची चर्चा करतातच पण निराश झालेल्यांना जागं करून कामाला कसं लावावं, याचंही उदाहरण घालून देतात. आजच्या भाषेत ज्याला काऊंन्सिलिंग म्हणतात, तेच मुक्ताईंनी त्यांच्या मोठ्या भावाचं म्हणजे ज्ञानदेवांचं केलंय.

संत ज्ञानेश्वर, ज्यांनी महाराष्ट्राला ज्ञानाचा सूर्य दाखवला. त्याच्या प्रकाशकिरणांत महाराष्ट्र गेली सातशे वर्षांहून अधिक न्हाऊन निघत आहे. पण त्या ज्ञानदेवांनाही एका निराश क्षणी प्रेरणा देण्याचं काम त्यांचे थोरले भाऊ आणि गुरू निवृत्तीनाथ यांनी नाही, तर धाकट्या बहिणीने म्हणजे मुक्ताईंनी केलंय. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई यांच्यात खरं तर धाकटं थोरलं असा भेदच नव्हता. सगळ्यांनी एकमेकांचा उल्लेख सखा किंवा सखी म्हणून केलाय. त्यांच्यातलं नातं खरंतर मैत्रीचं होतं. घट्ट मैत्रीचं. ही मैत्री एकमेकांचा हात धरून चालण्याची होती. एकमेकांना खऱ्या सत्यापर्यंत नेण्याची होती. त्यातून ताटीच्या अभंगांनी आकार घेतलाय.

त्यासाठी आपल्याला ताटीच्या अभंगांची गोष्ट आजच्या भाषेत समजून घ्यावी लागेल. ही गोष्ट शोधत आपल्याला आळंदीच्या सिद्धबेटावर जावं लागतं. तिथे

गावाबाहेर कष्टकऱ्यांच्या वस्तीत राहणाऱ्या या भावंडांच्या झोपडीत ज्ञानदेव ताटी म्हणजे दार बंद करून बसलेले आहेत. मुक्ताई दार ठोठावतात, आवाज देतात, हट्ट विनवणी करतात. पण ज्ञानदेव प्रतिसाद देत नाहीत. विषय खोल आहे हे साधारण अकरा वर्षांच्या मुक्ताईंच्या लक्षात येतं. त्यामुळे त्या थेट तत्त्वज्ञानाच्या चर्चेला हात घालतात.

तुम्ही संत आहात आणि संताने कसं असायला पाहिजे, हे मुक्ताई ज्ञानदेवांना सांगायला सुरवात करतात.

**राग धरले कवणाशी। आपण ब्रह्म सर्वदेशी॥**

**ऐशी समदृष्टि करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥**

संत आहात तर बोलणं सहन करावं लागेल. अहंकार गेला तर थोरपण येतं. थोरपण असेल तर भूतदया येते आणि भूतदया असेल तर राग कसा? पहिल्यात ताटीच्या अभंगात त्या परफेक्ट लॉजिक मांडतात.


ताटीच्या अभंगांमधला दुसरा अभंग सर्वात प्रसिद्ध आहे. '**योगी पानन मनाचा**' हा तो अभंग. पावन मनाच्या योग्याने लोकांचे अपराध सहन करायलाच हवेत. जग जर रागाने आग झालं, तर संतांना पाणी व्हावंच लागतं. कुणाच्या शब्दांनी त्रास झाला, तर त्याला उपदेश मानायला हवं. कारण विश्व हे ब्रह्म या दोऱ्याने विणलेलं कापड आहे. म्हणजेच सर्वत्र ब्रह्म भरून राहिलेलं आहे. जे ब्रह्म तुझ्यात आहे, तेच माझ्यात आहे, निसर्गात आहे, प्राण्यांत आहे, त्यामुळे इथे सगळे समान आहेत. एकच आहेत. ज्ञानदेवांनी पुढे ज्ञानेश्वरीमधून मांडलेलं चिद्विलासवादाचं तत्त्वज्ञान इथे मुक्ताईंनी सांगिलं आहे.

ज्ञानी झालात म्हणून स्वतःला उंच समजता म्हणजे इतरांना हलकं लेखता ना? मनावर कंट्रोल नसेल तर भगवे कपडे घालून काय फायदा? अशावेळेस प्रत्येक घासाला विष प्यालं तरच विवेक शाबूत राहतो. मुक्ताई थांबत नाहीत. संत तोचि जगी। क्षमा दया ज्याचे अंगी॥ अशी संतांची लक्षणं सहज सांगून जातात. आपला हात आपल्याला लागला, तर तो आपण तोडत नाही. दाताने जीभ चावली तर बत्तिशी फोडत नाही. तसंच हे जग एक आहे. दुसरं कुणीच नाही. मग राग कशाला? हे लोखंडाचे चणे खाण्यासारखं असेल, तरी ते करावं लागेल.

**कोणी कोणास शिकवावे। सारासार शोधूनि घ्यावे॥**

**तुम्ही तरोनी विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥**

हे ऐकून आत बसलेल्या ज्ञानदेवांना उपरती झाली नसती तरच नवल. ते बाहेर आले ते माऊली बनूनच. जगाच्या उद्धाराचा संकल्प करूनच. डॉ. सदानंद मोरे ताटीच्या अभंगांविषयी लिहितात, ते महत्त्वाचं आहे, ''संत या संज्ञेचा उल्लेखे वारकरी पूर्व काळात होत असला तरी ही संकल्पना विशेषतः वारकरी संस्कृतीमध्ये विकसित झालेली असून तिचा पहिला उच्चार संत मुक्ताईंनी केला. महाभारतात भगवद्गीतेला जे स्थान, तेच वारकरी साहित्यात ताटीच्या अभंगांना आहे. श्रीकृष्णाने गीतोपदेश करून अर्जुनाचा मोह दूर केला आणि त्याला युद्धप्रवृत्त केले. त्याप्रमाणे मुक्ताईंनी ज्ञानदेवांना पुनश्च लोकांमध्ये आणून उपदेश प्रवृत्त केले. श्रीकृष्णाने गीतेत कर्मयोग सांगितला. तर मुक्ताईंनी ज्ञानोबारायांना संतत्व सांगितले.''



संतसाहित्याचे आणखी एक अभ्यासक अविनाश गोसावी यांनी ताटीच्या अभंगांतून आपल्याला काय शिकता येईल याची एक यादीच केली आहे. ती अशी. क्षमाशीलला स्वीकारूया. शब्द जपून वापरूया. शांततापूर्ण जगूया. प्रामाणिकपणे काम करूया. मनाचे उन्मन म्हणजे सातत्याने विकास करूया. तरणोपाय म्हणजे समस्येचं खरं समाधान शोधूया. योग्य मार्गाने जीवन जगूया. हृदय मन पवित्र ठेवूया. सगळ्यांना बरोबर घेऊन जगूया. मोठ्या मनाने विचार करूया.


एखाद्या सेल्फ हेल्प पुस्तकात आनंदी जीवनाची दहा सूत्रं म्हणून ही सहज चालून जातील. पण आजच्या युगात आपलं काऊन्सिलिंग करायला कुणी येणार नाही. आपल्यालाच आपलं काऊन्सिलिंग करावं लागणार आहे. त्यासाठी संतांचे विचार उपयुक्त ठरणार आहेत.

■■

# बखर अभ्यासक हेरवाडकर



**महाराष्ट्रातील बखर वाङ्मयाच्या अभ्यासकांच्या क्षेत्रात सर्वश्रेष्ठ कामगिरी बजावणारे आणि मराठी बखर या ग्रंथाचे निर्माते र.वि. उर्फ रघुनाथ विनायक हेरवाडकर यांचे स्मरण आपण या लेखाद्वारे करणार आहोत. २० जुलै १९९४ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.२० जुलै १९९४ पर्यंत त्यांचे अखंड वाचनच चालू होते.दवाखान्यात दाखल करण्यापूर्वी घरी रुग्णवाहिका येईपर्यंतच्या वेळात ते आपल्या कन्येकडे वाचायला पुस्तक मागत होते. आपले आवडते पुस्तक डॉ.जॉन्सन यांचे चरित्र त्यांनी वाचायला घेतले.त्याच दिवशी हेरवाडकरांनी संध्याकाळी अखेरचा श्वास घेतला.असा हा अवलिया संशोधक**



**- प्रा.गणेश द.राऊत**

हेरवाडकर मूळचे ग्वाल्हेरचे परंतु कारकीर्द फुलली महाराष्ट्रात.ग्वाल्हेरवरून मुंबईत आल्यावर काही दिवस त्यांनी रेशनिंग ऑफिसमध्ये नोकरी केली. नोकरीत मन रमेनासे झाल्यावर राजीनामा देऊन ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, ढवळे प्रकाशन, खार येथील शाळा, बालमोहन विद्यामंदिर आणि सगळ्यात शेवटी मराठी विभाग प्रमुख, सेंट झेविअर्स कॉलेज, मुंबई असा त्यांचा प्रवास झाला. एक माणूस जिद्दीच्या जोरावर काय करू शकतो हे हेरवाडकरांच्या उदाहरणावरून आपण समजू शकतो.

**साधी राहणी** – उच्च विचारसरणी हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य. त्यांच्या पत्नी निर्मला हेरवाडकर यांनी त्यांच्या लग्नाचा अनुभव एका लेखात (‘बखर वाङ्मयाचे गाढे अभ्यासक’) लिहिला आहे. त्यानुसार हुंडा, देणे-घेणे, मानापमान, मेजवान्या झोडणे या सगळ्याला हेरवाडकरांचा विरोध होता. मुलीला वडील नाहीत तेव्हा तिच्या आईवर खर्चाचा बोजा नको असाही र.वि. यांचा विचार होता. सगळे त्यानुसार ठरले परंतु घरातील ज्येष्ठांच्या आग्रहामुळे आणि मित्रपरिवार (जुन्या काळातील सरदार घराणी) यांच्यामुळे वरात काढण्याचे ठरले. बँडबाजा, हत्ती, घोडे, फौजफाटा घेऊन वरात निघाली. ऐन वरातीत हेरवाडकरांनी सूचना देऊन मोटार ड्रायव्हरला गाडी बाहेर काढायला लावून ते पत्नीसह तडक घरी पोहोचले. काही वेळाने मिरवणूक हेरवाडकरांच्या घरापाशी पोहोचली तर हे नव दाम्पत्य स्वागताला हजर होते. आपणच आपल्या पत्नीला शिकवून मोठे करायचे ही जिद्द त्यांनी मनात ठेवली आणि स्वतः पत्नी आणि मुलगी असे सगळेच घराण्यात शिक्षक झाले.

हेरवाडकरांनी पुढे पीएच.डी करायचे ठरवले. या संदर्भात ते महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांना भेटले. ‘बखर हा विषय वाङ्मयीन अभ्यासाचा विषय होऊ शकत नाही’ अशा शब्दात इतिहासाचार्यांनी हेरवाडकरांच्या मनसुब्यावर पाणी ओतले. माघार घेतील ते हेरवाडकर कसले. ते अधिकच जिद्दीला पेटले. मुंबईस्थित मार्गदर्शक महेश्वर अनंत करंदीकर यांच्या हाताखाली त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली.या संदर्भात करंदीकर ‘मराठी बखर’ या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत पुरस्कार मध्ये लिहितात –


.... मराठी बखरींची एकत्र व पूर्ण चिकित्सा मराठी अभ्यासकांस भासतच असे त्या अनुषंगाने हा विषय मूलतः दृष्टीसमोर आला.

डॉ.हेरवाडकर यांनी आपल्या ग्रंथात बखरींची छाननी

दोन दृष्टींनी केलेली आढळेल. ग्रंथाची मूळ बैठक बखरींचा वाड्मयीन अभ्यास अशीच होती; परंतु तो अभ्यास होत असताना अनुषंगाने त्यातील ऐतिहासिक माहितीचा बिनचूकपणा पारखण्याची संधी आपोआप आली; व हाही भाग ह्या ग्रंथाचा विषय नसतानाही ह्यात आलेला दिसेल. ह्या विषयावरील डॉ. हेरवाडकरांचे परिश्रम सर्वस्वी मूलग्राही, स्वतंत्र व नवीन आहेत. हे वाचकांस आढळून येईल पीएच.डी च्या मार्गदर्शकांकडून असे गौरवास्पद शब्द मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांस आणखी काय हवे असते?

या सगळ्या काळात हेरवाडकरांनी इतिहास,संस्कृत,इंग्रजीचा अभ्यास जोपासला.काही काळासाठी सरकारने त्यांची सेन्सॉर बोर्ड वर नेमणूक केली होती.संपादकाचे आवडते काम म्हणजे लेखनावर कात्री चालविणे ते त्यांनी चित्रपटांच्या संदर्भात आवडीने केले.जे काम त्यांना आवडत नसे त्यास ते स्पष्टपणे नकार देत असत.या बाबत ते 'एक नन्ना छत्तीस रोग दूर' (एका नकाराने पुढील ३६ प्रकारचे ताप,रोग पळून जातात) असा शब्दप्रयोग करीत असत. त्यांना संगीताची आवड होती. स्वतःच्या गायनाच्या आवडीसाठी त्यांनी काही परीक्षा दिल्या. पहाटे ४-५ ला उठून ते भूपाळ्या आणि स्तोत्र म्हणत असत.रूढी,अंधश्रद्धा यांना नकार देऊन दादरचे ग्रंथसंग्रहालय हेच त्यांनी देवालय मानले.रोजचे २-३ मैल फिरणे त्यांनी कधी टाळले नाही.नियमित व्यायाम,योग्य आहार आणि शांत डोके या बळावर त्यांनी स्वतःला राखले. पुस्तकांना पुठ्ठ्यांचे कव्हर घालण्याचा त्यांना छंद होता.मिळेल तेथून जुनी, दुर्मिळ पुस्तके खरेदी करण्याची त्यांची आवड होती.एकदा रद्दीच्या दुकानात एका दुर्मिळ पुस्तकावर प्रख्यात लेखक ह.ना.आपटे यांची सही होती. दुकानदाराने सांगितलेल्या भावापेक्षा जास्त पैसे देऊन त्यांनी ते पुस्तक विकत घेतले. रद्दीवाल्याला आश्चर्य वाटले. हेरवाडकर म्हणाले पैशापेक्षा सहीला जास्त मोल आहे. आपल्या अटींवर जगण्याची मौज काही वेगळीच असते. हेरवाडकरांनी ते केले म्हणून इतिहासकार निनाद बेडेकर त्यांच्याविषयी लिहितात - "हेरवाडकर मृण्मय होते पण त्यांचे बखर वाड़मय चिन्मय आहे, चिरंतन आहे."




ख्यातनाम अभ्यासक श्री.ना.बनहट्टी हेरवाडकर यांच्या संदर्भात लिहितात, "डॉ.र.वि.हेरवाडकर आणि त्यांचा व्यासंग याबद्दल लिहिणे कठीण वाटते. प्रशंसा करावी तर तसले शब्द गुळगुळीत व पांचट बनून गेलेले, इतर अडचणीही कमी नाहीत. त्यांचा व्यासंग झटपट संशोधनात जमा होण्याजोगा नाही. चुटपुटत्या आधारावर तर्कांचे मोठे-मोठे इमले उभारण्याची त्यांची सवय नाही. बळकट आधार असला, तरी त्यावरून सावधपणे जपून अनुमान काढावयाचे अशी त्यांची पद्धत दिसते. जातीय अभिमान किंवा पूर्वग्रह यांचा किंचितसुद्धा वास त्यांच्या संशोधनाला लागलेला दिसत नाही. सत्ताधीशांकडे नजर ठेवून त्यांचे लेखन वा संशोधन होताना दिसत नाही. असा निर्गंध,निर्लेप संशोधनाची प्रशंसा तरी करावयाचे कशी? एखाद्या मुद्द्यावर किंवा प्रसंगावर सर्व ठिकाणचे, सर्व बाजूंचे आधार ते शोधून काढतात. आणि समतोल मनाने त्यांचा विचार करतात. असेच त्यांच्या इतर बाबतीतही दिसते. प्राध्यापक झालो, डॉक्टरेट मिळविली तेव्हा आता इतिकर्तव्यता झाली, असे त्यांनी मानल्याचे दिसत नाही. अनेक विषयात शिरून अभ्यासाचा अथवा लेखनाचा फापटपसारा मांडल्याचेही आढळत नाही. संशोधकीय पदवी करता जो विषय निवडला त्याच विषयाचा निष्ठापूर्वक व्यासंग चालू ठेवून अतिशय उपयुक्त निर्मिती त्यांनी केली आहे...


बखरींचे संपादन करताना त्यांनी एक नमुनेदार साचा बनविलेला दिसतो. बखर ज्या विषयावर किंवा व्यक्तीवर असेल, त्याचा वृत्तांत किंवा तिचे चरित्र ते स्वतंत्र रीतीने निरूपण करतात. नंतर त्याच्या अभ्यासाची साधने सांगून संपादनाकरिता घेतलेल्या बखरीचे ऐतिहासिक महत्त्व विशद करतात. पुढे बखरींचे वाङमयीन स्वरूप आणि भाषिक स्वरूप यांचे विवेचन करून प्रस्तावना संपवितात. खुद्द बखरीची मूळ संहिता येते, तिथे अर्थद्योतक टिपा पानाच्या खालच्या अंगाला देतात. त्यात शब्दाची व्युत्पत्ती देण्यास ते विसरत नाहीत. मुख्य ग्रंथ संपल्यावर ऐतिहासिक माहिती देऊन योग्यायोग्य विवेचन करणाऱ्या टिपा, यात डॉक्टर हेरवाडकरांच्या सखोल अभ्यासाचा प्रत्यय येतो !


र.वि.हेरवाडकर यांचे इतिहासक्षेत्राला सगळ्यात मोठे योगदान म्हणजे 'मराठी बखर' हा ग्रंथ होय. हा ग्रंथ पुणे

शहरातील व्हीनस प्रकाशन यांनी प्रसिद्ध केला. सेंट झेविअर्स कॉलेज, मुंबई येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून काम करणाऱ्या रघुनाथ विनायक हेरवाडकर यांचा हा ग्रंथ अभूतपूर्व होय. या ग्रंथाची पहिली आवृत्ती १९५७ मध्ये तर दुसरी आवृत्ती १९७५ मध्ये प्रसिद्ध झाली. दुसरी आवृत्ती सुधारून वाढविण्यात आली होती. या ग्रंथाचे एक वैशिष्ट्य म्हणजे या ग्रंथाची अर्पणपत्रिका ती पुढीलप्रमाणे– 'उत्कट भव्य त्येंची घ्यावे' या बखरकारांच्या रामदासी बाण्याने ज्यांनी तीन तपे सरस्वतीची निस्सीमपणे आराधना करून महाराष्ट्र – इतिहास – संशोधक परंपरेचा पहिला पाया घातला. त्या कै.विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या स्फूर्तीदायक नि पवित्र स्मृतीस–

राजवाडे यांना यापेक्षा दुसरी कोणती चांगली गुरुदक्षिणा असेल. या ग्रंथात एकोणिस प्रकरणे आहेत. विषय–प्रवेश, बखर : इतिहास की वाङ्. मय?, बखरी: लेखनकाल, लेखक व नामकरण, शिवपूर्वकालीन बखरी, शिवकालीन बखरी, पेशवेकालीन बखरी, इतिहासेतर बखरी, बखरींची शैली, बखरींतील विभक्तीप्रत्ययप्रक्रिया, बखरींतील सुभाषिते, वाकसंप्रदाय व म्हणी, बखर आणि ऐतिहासिक कादंबरी, बखरीतील काही ऐतिहासिक यक्ष प्रश्न, बखरींची सामाजिक फलश्रुती, मध्ययुगीन आंग्ल बखरी, उपसंहार, मराठी बखरी, बखर वाङ्मयाच्या अभ्यासाची साधने, सूची, संदर्भ ग्रंथ अशी एकोणिस प्रकरणे आहेत.

सदर ग्रंथ म्हणजे लेखकाने मुंबई विद्यापीठाच्या डॉक्टरेटसाठी सादर केलेल्या मराठी बखर वाङ्मय (Literature Called Marathi Bakhars) या प्रबंधाचे छोटेखानी रूप होय. बखर विषयाचे आणि बखर ग्रंथ विषयाचे महत्त्व लेखकाने एकाच गोळीबंद वाक्यात दिले आहे ते म्हणजे 'बखरग्रंथ' म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होत.! या एकाच वाक्यात विषयाचे मर्म दडले आहे.









**इतिहास–** हेरवाडकरांच्या मते बखर शब्द 'खबर' या अरबी शब्दापासून आला असून तो वर्णविपर्यय आहे. खबर म्हणजे वार्ता, माहिती, समाचार असा आहे. त्यापूर्वी आपल्याकडे इतिहास हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जात असे. महाभारताच्या आदिपर्वात स्वतः ग्रंथकारानेच महाभारताला इतिहासोत्तम असे म्हटले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पुराण, आख्यायिका, इतिवृत्त, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र यांचा समावेश आहे. अमरकोशात इतिहास = इति+ ह+आस म्हणजे पुरावृत्त असा अर्थ दिला आहे. पुरावृत्त म्हणजे मागे घडलेली गोष्ट. पुराणांमध्ये जगाची उत्पत्ती, चराचर सृष्टी, निरनिराळे वंश व त्यांच्या कामगिरी, कालाचे विभाग यांची माहिती येते. आज आपण इतिहास हा शब्द ज्या शास्त्रीय चौकटीत वापरतो त्या चौकटीत पूर्वी इतिहास नसला तरी खूप मोठे व्यापक क्षेत्र त्यात समाविष्ट होतेच. प्राचीन भारताचा इतिहास आपणास परकीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनातून घेता येतो. तो अर्थातच तपासून घ्यावा लागतो. पुढे गुप्तकालीन 'हर्षचरित', 'काव्यग्रंथ' बाराव्या शतकातील कश्मीरच्या कल्हणाचा 'राजतरंगिणी' ग्रंथ ही मर्यादित अर्थाने ऐतिहासिक साधने होत. हीच परंपरा पुढे प्रबंधचिंतामणि, प्रबंधकोश यांनी चालविली.

मध्ययुगात तेराव्या शतकात 'चचनामा' ग्रंथ लिहिला गेला. हा मूळ अरबीतून पर्शियन भाषेत गेला. याचे लेखन सिंध प्रांतात झाले. अरबांची सिंध प्रांतावर स्वारी हा ग्रंथाचा मूळ विषय आहे.

या ग्रंथास 'तारिखे हिंद' उर्फ 'चचनामा' म्हणतात. याचा भाषांतरकार मुहम्मद अली बिन हमीद बिन अबू बकर कुफी होय. पुढे गजनीच्या सुलतानाचा समकालीन अबुरिहान उर्फ अलबेरूनी याने इतिहास क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावली. मुघल बादशहांची चरित्रे वा आत्मचरित्रे हा पुढचा टप्पा होय. त्यात दैनंदिन राज्यकारभार, पत्र व्यवहार, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या घटनांची नोंद, घटना क्रमबद्ध, बातमीपत्रे या गोष्टी आपणास मिळतात. याच काळाच्या आगे–मागे राज्यस्थानातील भाट किंवा दरबारी कवी यांचा 'रासा' ग्रंथप्रकार

विशेषतः चंदबरदाई यांचा ‘पृथुराजरासा’ ग्रंथ पृथ्वीराज चव्हाण अथवा चौहान यांची माहिती देतो. राजस्थानची जुनी डिंगल भाषा, बंगाली वाड्मयातील धर्ममंगल काव्ये, आसामी इतिहास- बुरुंजी ही आपली परंपरा तर परकीय प्रवासी लेखन आणि पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज व्यापाऱ्यांची वा वखारींची ( ईस्ट इंडिया कंपनी) वृत्ते महत्त्वाची होत. या सगळ्या इतिहासलेखनात राजा हाच ईश्वराचा अंश, सोयीस्कर तेवढेच लेखन हा भाग आपणास दुर्लक्षून चालणार नाही.




महाराष्ट्र- भारतीय पातळीवरचा हा आढावा घेतल्यावर आपणास महाराष्ट्राकडे वळावे लागेल. बखर हा महाराष्ट्रीय इतिहासाचा विशेष होय. बखरींच्या संदर्भात महाराष्ट्रेतिहासात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचे नाव महत्त्वाचे आहे. त्यांनी बखर या व्यापक संज्ञेत टिपणे,यादी,रोजनिशा, हकीगती, ऐतिहासिक लेखसंग्रह, संतचरित्र या सगळ्याचाच समावेश केला आहे. असे असले तरी राजवाडे लिहितात- ‘अस्सल कागदाचे एक चिठोरे अवघ्या बखरींचे प्रमाण हाणून पाडण्यास समर्थ आहे’.

या भूमिकेला छेद देणारी भूमिका हेरवाडकर अभ्यासांती मांडतात ती अशी की - "स्वकीयांच्या पराक्रमाचे नोंद करण्याच्या हेतूने मराठी बखरींचे लेखन झाले, म्हणूनच ते इतिहासाचे एक साधन आहे. त्याला इतिहास हे बडे नाव देता आले नाही तर इतिहासाचे त्याचे जवळचे नाते आहे. बखरीतील घटनांच्या जुळणीत इतिहासाचे अंग स्पष्ट दिसते तद्वतच त्याच्या निवेदनात वाङ्मयाचे अंग दिसते. बखरकार हा पक्षीय दृष्टिकोणातून ऐतिहासिक घटनांकडे बघतो या कारणामुळे त्याच्या लेखनाला भावनेचा स्पर्श झाला आहे. बखर सजवण्याचे त्याचे काम असल्याने त्याचे काम वाङ्मयीन स्वरूपाचे झाल्यास नवल नाही. वाङ्मय लेखनाला आवश्यक असलेली आत्मनिष्ठा त्याच्या ठायी निश्चित आहे. ऐतिहासिक व्यक्ती व घटना याबद्दलची त्याची कल्पनात्मकच प्रतिक्रिया कित्येक वेळा सखोल किंवा व्यापक आढळत नसली, तरी त्या प्रतिक्रियेशी मात्र त्याने अविचल इमान राखले आहे. याचा प्रत्यय येतो. बखरीत सत्याचा अपलाप जाणून-बुजून कोठेही केलेला नाही.....!"

यावर अधिक भाष्य पुन्हा नव्याने करण्याची गरज नाही.

**बखर म्हणून समजल्या गेलेल्या वाङ्मयाचे विषयदृष्ट्या पुढील प्रकार कल्पिता येतील :**

१. चरित्रात्मक - उदाहरणार्थ, कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र, मल्हार रामराव चिटणीसविरचित शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज ह्यांचे सप्त प्रकरणात्मक चरित्र इ.

२. प्रसंगात्मक उदा., रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर, खर्ड्याच्या स्वारीची बखर इ.

३. विशिष्ट घराण्याचा इतिहास - उदा., दाभाडे सेनापती यांची हकीगत, गायकवाड यांची हकीगत, इ.

४. विशिष्ट काळातील इतिहास उदा., पेशवाईच्या अखेरची अखबार, शके १७३८ सालची हकीगत इ.

५. आत्म चरित्रात्मक- उदा., नाना फडणविसाचे आत्मचरित्र, बापू कान्हो यांचे आत्मवृत्त.

६. एका विशिष्ट पक्षाची बाजू - उदा., होळकराची थैली.

७. कलमी बखर - उदा.,९१ कलमी किंवा ९६ कलमी बखर.

८. केवळ बातमी म्हणून झालेले लेखन- उदा शके १७४० तील माहिती.

९. उत्पन्न चालू राहावे यासाठी लिहिलेल्या बखरी- उदा., करीने, सरकारात गुजरलेल्या कैफियती इ.

१०. सांप्रदायिक- उदा., समर्थांची बखर, वडगांवकर जयरामस्वामी यांची बखर इ.

११. शैक्षणिक-- उदा., सवाई माधवरावांच्या साठी मुद्दाम तयार करविलेली बकासुराची बखर.

१२. भाषांतरित - उदा., बुंदेल्याची बखर. सोनपत पानपत येथील मराठे-दुराणी युद्ध ( काशीराज पंडित ) इ.

१३. स्थल वर्णनात्मक - उदा., महाबळेश्वराची जुनी माहिती.

१४. पौराणिक - उदा., कृष्ण जन्मकथा बखर, माघमाहात्म्य इ.

१५. धर्मविषयक - उदा., ख्रिस्ती मंडळींची बखर इ.

■■



# सत्तेत असणं आणि नसणं हा ऊन-पावसाचा खेळ

खर तर जून महिन्यात पक्षाचा वर्धापन दिन असल्यामुळे वातावरण खूप प्रसन्न होत. परंतु अचानक वादळ वारा आला आणि मित्र पक्षात बंडखोरांची ढगफुटी झाली. राज्यामध्ये एक महाप्रचंड सत्तान्तर नाटक रचले गेले होते. त्याचा शेवटचा अंक राज्याला नवे मुख्यमंत्री निवडण्यामध्ये झाला. सहाजिकच आपण विरोधी पक्षाच्या भूमिकेसाठी सज्ज झालो. राजकीय पक्षाच्या आयुष्यात असे प्रसंग नेहमीच येत असतात. पण आपण सर्व एका दृष्टीने भाग्यवान आहोत की सत्तेच्या या ऊनपावसाच्या खेळात आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब हे खंबीरपणे आलेल्या परिस्थितीशी सामना देण्यासाठी सज्ज असतात. कधी कधी माझ्या मनात विचार येतो की साहेब अस्वस्थ होत असतील ना ?, मग त्यातून बाहेर कस पडायच ?, मला वाटत अशा कसोटीच्या काळामध्ये साहेब ज्या माननीय यशवंतराव चव्हाणांचा वारसा चालवतात त्यांच्या चारित्राकडे वळून चव्हाण साहेबांच्या आयुष्यातल्या घटना डोळ्यासमोर आणून साहेब स्वतःला सिद्ध करतात. खर तर आपल्या सर्वांसाठी हा एक महत्वाचा संदेश असू शकतो. आपण आपल मन शांत करण्यासाठी अशावेळी केव्हा तरी माननीय चव्हाण साहेबांचे साहित्य, पवार साहेब, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांचा संघर्षमय जीवन प्रवास पुन्हा एकदा





त्या ग्रंथामधून जवळचा करावा. मीही तो प्रयोग केला आणि चव्हाण साहेबांच्या चरित्रातील त्यांच्या सन १९३२ साली झालेल्या पहिल्या तुरुंगवासाची कहाणी माझ्यासमोर आली. त्याकाळी मा. चव्हाण साहेब शाळेत शिक्षण घेत होते आणि त्याकाळच्या मॅट्रिकच्या परीक्षेसाठी तयारी करत होते. परंतु त्यांनी गावातल्या कचेरीवर मध्यरात्री तिरंगा फडकवला होता. शाळेच्या वर्गात असताना त्यांना पोलीस घेऊन गेले होते. त्याकाळी अशा सत्याग्रहींना ३ ते ६ महिन्यांची शिक्षा होत असे. पण अवघ्या १९ वर्षाच्या मा. यशवंतरावांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांचे एक शिक्षक आणि मा. चव्हाण साहेबांच्या मातोश्री, कुटुंब त्यांना माफी मागण्यास आणि सुटका करून घेण्यास सांगत होते. शिक्षकांचे म्हणणे असे होते की मा. यशवंतराव गरीब कुटुंबातील असून त्यांना मॅट्रिक होणे आवश्यक आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी यशवंतरावांची भेट घेण्यासाठी त्यांच्या मातोश्री तुरुंगात पोहोचल्या. दोन पोलीस त्यांना बाहेर घेऊन आले. तेव्हा त्या मातेच्या डोळ्यात अश्रु उभे राहिले होते आणि शिक्षक त्यांना पोलीसांची माफी मागण्यास सांगत होते. त्यांनी आईकडे बघितले त्यांच्या डोळ्यात अश्रू होते. या अशा कठीण प्रसंगी मातोश्रींनी सांगितले मी तुला माफी माग असे सांगण्यासाठी अजिबात आलेली नाही. आयुष्यामध्ये कोणतीही अशी गोष्ट करू नकोस की तुझ्या भावी आयुष्यात तुला मान खाली घालावी लागेल." एवढाच तिचा सल्ला होता. आयुष्यभर चव्हाण साहेबांनी मातोश्रीचा हा धडा अखेरपर्यंत गिरवला.

आज कल्पना करा, आपण आंदोलने करतो, कधी कधी शिक्षेलाही सामोरे जातो पण पोलादी मन संस्कारातून घडत गेले तर आपणही अशा प्रसंगी स्वतः ला सावरत संघर्षाला सिद्ध होतो. आदरणीय पवार साहेबांनी आपल्याला अनेक वेळेला सांगितले आहे की एकदा राजकारणात पडल्यानंतर सत्तेत असण आणि नसण हा ऊनपावसाचा खेळ आहे. आपण सातत्याने राजकारणापलिकडे पहायला शिकले पाहिजे. समाजातल्या प्रत्येक माणसापर्यंत आपण पोहोचले पाहिजे. त्याच्या जीवनात परिवर्तन घडायला आपण कारणीभूत ठरल पाहिजे. त्यामुळे सत्तेत राहूनच समाजकारण करता येते अशा भ्रामक कल्पनेत न रहाता आपण निश्चितपणे साहेबांनी सांगितलेला वसा पुढे चालवू. सामान्य जनतेशी एकरूप होऊन भविष्यातल्या वाटचालीला कणखरपणे सामोरे जाऊ.

